


# हाकारा

वर्ष : तेविसावे • अंक दुसरा–तिसरा

एप्रिल - सप्टेंबर २००२





## पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प

## अहवाल : महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : प्रा. रा. के मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : डॉ. विजय भानू |
| मुख्य सचिव | : डॉ. सुधाकर मोराणकर |
| सह सचिव | : पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : जयवंत मंत्री |
| सभासद | : ॲड. पद्माकर वळवी (आमदार) |
| | : डॉ. मिलिंद बोकील |
| | : सुधीर जोग |
| | : गणपत पंडित |
| | : आरती कौलगेकर |
| | : सुमेध गुर्जर |

*दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.*

**– ग. बा. सरदार**

सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई
आणि
नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च, नवी दिल्ली

# पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प

## अहवाल

# महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७

वर्ष २००२

# ❋ संशोधन गट ❋

| | | |
|---|---|---|
| प्रमुख मार्गदर्शक | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| संशोधन समन्वयक | : | पुरुषोत्तम आगाशे |
| माहिती विश्लेषण | : | नीलकंठ कान्हेरे |
| संशोधन सहाय्यक | : | मृदुल पाटील |

क्षेत्र संशोधन सहाय्यक

## गडचिरोली जिल्हा

| | |
|---|---|
| (अ) **सिरोंचा तालुका** | राजेश रंगुवार<br>रमण गट्टुवार<br>विजय दुर्गे |
| (ब) **एटापल्ली तालुका** | किशोर उसेंडी<br>आशिष रामटेके<br>गिरीधर कालंगा |

## कोल्हापूर जिल्हा

| | |
|---|---|
| (अ) **चंदगड तालुका** | मोईनुद्दीन लतिफ<br>मधुकर कांबळे |
| (ब) **हातकणंगले तालुका** | वैभव कुलकर्णी<br>राजकुमार काकिर्डे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता!

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

वर्ष तेविसावे : अंक - दुसरा-तिसरा

# हाकारा

एप्रिल-सप्टेंबर २००२

## अनुक्रमणिका


- संपादकीय : ७
- Editorial : ९
- Basic Rural Infrastructure Project : ११
- Summary Findings : १४
- प्रस्तावना : १९
- पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : २१
- महाराष्ट्र : अभ्यास निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा : २३
- संक्षिप्त जिल्हा ओळख - कोल्हापूर : २९
  - गडचिरोली : ३२
- संशोधन पद्धती : ३५
- अभ्यास करताना आलेल्या अडचणी : ३७
- क्षेत्रकार्य निरीक्षणे : ३८
- महाराष्ट्र : अभ्यास पाहणीचे निष्कर्ष : ४४
  - रस्ते आणि वाहतूक क्षेत्र : ४८
  - दूरसंचार क्षेत्र : ६०
  - विद्युत क्षेत्र : ६८
  - पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्र : ८२
  - क्षेत्र सुधारणा प्राधान्यता : ९७
- समारोप : १०१


**❋ पत्रव्यवहाराचा पत्ता-**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ - ००७
दूरध्वनी - ५८८४१५०

**❋ संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**❋ कार्यकारी संपादक**
लेखन, छायाचित्रे, मांडणी
पुरुषोत्तम आगाशे

**❋ प्रकाशक**
रा.के.मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग,
५१०, सदाशिव पेठ, पुणे -३०.
येथे छापून प्रसिद्ध केले.

**❋ मूल्य रु. ५०/-**

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

## तक्त्यांची क्रमवारी


| तक्ता क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | जिल्हावार अभ्यासण्यात आलेली लोकसंख्या | ४४ |
| २ | गावाची सरासरी लोकसंख्या | ४५ |
| ३ | अनुसूचित जातींची लोकसंख्या | ४५ |
| ४ | अनुसूचित जमातींची लोकसंख्या | ४६ |
| ५ | गावातील घर संख्या व स्थलांतर | ४७ |
| ६ | राष्ट्रीय व राज्य महामार्गांपासूनचे सरासरी अंतर | ४८ |
| ७ | गावात ये-जा करणारे दैनंदिन प्रवासी | ४९ |
| ८ | सरासरी किमान व कमाल प्रवास खर्च | ५० |
| ९ | सरासरी किमान व कमाल मालवाहतूक खर्च | ५० |
| १० | प्रवासासाठीची वाहतुकीची साधने | ५१ |
| ११ | गावातील अंतर्गत रस्त्यांचा दर्जा | ५२ |
| १२ | अंतर्गत रस्त्यांची देखभाल | ५३ |
| १३ | गावाला जोडणाऱ्या रस्त्यांचा दर्जा | ५४ |
| १४ | गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती | ५५ |
| १५ | रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे | ५६ |
| १६ | गावातील रस्ता सुधारणेसाठी उपाययोजना | ५८ |
| १७ | गावातील उपलब्ध सार्वजनिक दूरध्वनी उपलब्धता | ६० |
| १८ | खाजगी दूरध्वनींची उपलब्धता | ६१ |
| १९ | दूरध्वनी सेवेचा वापर | ६२ |
| २० | संभाषणासाठी द्यावे लागणारे सरासरी मूल्य | ६३ |
| २१ | मोबाईल दूरध्वनीबद्दलची माहिती | ६३ |
| २२ | इंटरनेटबद्दलची माहिती | ६४ |
| २३ | दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे | ६५ |
| २४ | दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना | ६७ |
| २५ | घरगुती वीज जोड टक्केवारी | ६८ |
| २६ | गावातील किरकोळ धंद्यासाठी वीज वापर | ६९ |
| २७ | औद्योगिक कारणांसाठी विजेचा वापर | ७० |

| | | |
|---|---|---|
| २८ | विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर | ७१ |
| २९ | विजेच्या मागणीची पूर्तता | ७२ |
| ३० | दर दिवसाची विजेची उपलब्धता | ७३ |
| ३१ | आठवड्यातील विजेची उपलब्धता | ७३ |
| ३२ | पावसाळ्यात विजेची उपलब्धता | ७४ |
| ३३ | वीज देयकाची रक्कम | ७५ |
| ३४ | नविन वीज जोड घेण्यासाठी लाच | ७६ |
| ३५ | वीज जोड : लाचेची रक्कम | ७७ |
| ३६ | वीज पुरवठा अनियमिततेची कारणे | ७८ |
| ३७ | सुरळीत वीज पुरवठ्यासाठी उपाययोजना | ८० |
| ३८ | पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत | ८२ |
| ३९ | एकूण व चालू हातपंप | ८३ |
| ४० | नळ पाणी पुरवठा योजना | ८५ |
| ४१ | पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे अंतर | ८६ |
| ४२ | दुर्भिक्ष असताना उन्हाळ्यात पाणी खरेदी | ८६ |
| ४३ | ग्रामपंचायतीला द्यावी लागणारी पाणीपट्टी | ८७ |
| ४४ | पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधान | ८८ |
| ४५ | गावातील अंतर्गत रस्त्याच्या बाजूची गटारे | ८९ |
| ४६ | घरातील सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था | ९० |
| ४७ | एकूण संडास व त्यांचा वापर | ९१ |
| ४८ | संडास बांधकामास अर्थसहाय्य | ९३ |
| ४९ | मलनि:सारणाची सोय | ९३ |
| ५० | पावसाळ्यातील मुख्य समस्या | ९४ |
| ५१ | पाण्याची समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना | ९५ |
| ५२ | गावामधील चार क्षेत्रांच्या सुधारणेसाठीचा प्राधान्यक्रम | |
| | (अ) पहिली प्राधान्यता | ९७ |
| | (ब) दुसरी प्राधान्यता | ९८ |
| | (क) तिसरी प्राधान्यता | ९९ |
| | (ड) चौथी प्राधान्यता | १०० |

# ❖ ऋणनिर्देश ❖

पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्पाअंतर्गत कोल्हापूर व गडचिरोली जिल्ह्यातील १२ गावांमधून माहिती गोळा करण्यात आली. सर्व गावातील लोकांनी स्वत:च्या कामातून वेळ काढून अत्यंत उत्साहाने संशोधन गटाबरोबर चर्चा केली, पायाभूत सोयी सुविधांची सद्यपरिस्थिती सांगून आवश्यक माहिती उपलब्ध करून दिली. या लोकांच्या सहकार्याशिवाय असा अभ्यास करणे केवळ अशक्य होते. या सर्व लोकांचे शतश: आभार.

नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च, नवी दिल्ली या संस्थेने महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यातील अभ्यासाची जबाबदारी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेवर अतिशय विश्वासपूर्वक सोपवली, एन.सी.ए.ई. आर. या संस्थेच्या संचालकांनी अभ्यास प्रकल्पाच्या बैठकांमध्ये सहभागी होऊन सर्व राज्यातील संशोधन गटांना मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. प्रकल्प सल्लागार डॉ. ज्योत्स्ना बापट यांनी वेळोवेळी चर्चा करून, गडचिरोलीमधील गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन संशोधन गटाचा उत्साह वाढवला आम्ही त्याबद्दल त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. त्याचबरोबर एन.सी.ए.ई.आर. संस्थेचे संशोधक, कर्मचारी वर्ग व अन्य राज्यातील संशोधन गट यांनी दिलेले बहुमुल्य सहाय्यदेखील विसरता येणार नाही.

महाराष्ट्रामध्ये गडचिरोली जिल्ह्यात क्षेत्रकार्य करताना श्री. मोहन हिराबाई हिरालाल, श्री. रामाराव दुदीवार, श्री. राजू आतकमवार तसेच कोल्हापूर जिल्ह्यात चंदगड येथील श्री. र. भा. माडखोलकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य सावंत यांनी आपुलकीने मदत केली त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. प्रत्यक्ष क्षेत्रकार्य करताना तरुण संशोधकांनी सळसळत्या उत्साहाने भाग घेऊन अभ्यास पूर्णत्वास नेण्यात मोलाची कामगिरी केली आहे. त्यांच्या कामाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

पर्यायी उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी अनेक लोक, संस्थांनी माहिती उपलब्ध करून दिली, चर्चा केली अशा सर्वांचे आभार मानणे हे आम्ही आद्य कर्तव्य समजतो.

अभ्यास प्रकल्पाला ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे हातभार लावला अशा सर्व व्यक्ती व संस्थांचे मन:पूर्वक आभार.

**पुरुषोत्तम आगाशे**
- संशोधन समन्वयक -

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशत: अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या मतांशी मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

# ❖ संपादकीय ❖

भारताला स्वातंत्र्य मिळून पाच दशके उलटून गेली आहेत. स्वतंत्र भारताचा विकास झपाट्याने होण्याच्या दृष्टीने आपण पंचवार्षिक योजनांद्वारे नियोजनबद्ध कार्यक्रम आखून वाटचाल सुरू केली. आतापर्यंत झालेल्या नऊ पंचवार्षिक योजनांचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की पाच दशकांमध्ये आपण अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती केली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विविध शाखा, व्यापार, औद्योगिक विकास या क्षेत्रांमधील प्रगतीमुळे भारत अनेक गोष्टींमध्ये स्वयंपूर्ण झाला असून त्यामुळे जगामध्ये मानाचे स्थान मिळाले आहे. ग्रामीण भागामध्ये झालेल्या हरित व धवल क्रांतीमुळे देशातील अन्नधान्याचे उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढले. एकोणिसशे पन्नासच्या दशकात अन्नधान्याची आयात करावा लागणारा भारत राखीव साठा ठेवून धान्याची निर्यातदेखील करू लागला. हरित व धवल क्रांतीमुळे ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर सुधारण्यासदेखील मदत झाली.

गेल्या ५०-५५ वर्षात देशाचा झपाट्याने विकास झाला खरा, मात्र हा विकास असमतोल होता. या विकासाचा केंद्रबिंदू आर्थिक, व्यापारी व औद्योगिक केंद्रे हाच राहिला त्यामुळे नगरांची शहरे व शहरांची महानगरे बनून तेथेच विकास एकवटला गेला. हरित व धवल क्रांतीचा लाभदेखील ग्रामीण भागातील काही विशिष्ट विभागांपर्यंतच व त्यातही विशिष्ट जातीवर्गापर्यंतच पोहोचू शकला. इतर भागातील लोक त्यापासून वंचितच राहिले. अशाप्रकारे शहरी भाग व ग्रामीण भाग यामध्ये विकासाची मोठी दरी निर्माण झाली. त्याचबरोबर ग्रामीण भागातही निरनिराळ्या विभागात पण असंतुलित विकास झाला. आरोग्य, शिक्षण व त्याचबरोबर पायाभूत सोयीसुविधांचा विकासदेखील त्याला अपवाद नाही.

नवी दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एन.सी.ए.ई.आर.) या संस्थेने देशाच्या ग्रामीण भागातील पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी एक राष्ट्रव्यापी प्रकल्प हाती घेतला होता. या अभ्यास प्रकल्पामध्ये १० राज्यांमधील सुमारे ११०० गावातून रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत आणि पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता अशा चार पायाभूत क्षेत्रांसंबंधी माहिती गोळा करण्यात आली. ग्रामीण भागामध्ये पायाभूत सोयीसुविधांवर आतापर्यंत पंचवार्षिक योजनांमधून कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले आहेत, या योजना पूर्ण झाल्या असल्याचे राज्य सरकारांची आकडेवारी सांगते. प्रत्यक्षात चित्र मात्र वेगळे असते. ग्रामीण भारतात किती योजना कागदोपत्री वा प्रत्यक्षात पूर्ण झाल्या, पायाभूत सोयीसुविधांची सद्यस्थिती काय आहे, देखभाल दुरुस्ती होते की नाही, ग्रामीण जनतेला कोणकोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, त्यावर मात करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत,

सामान्य लोकांची काय मतं आहेत या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या अभ्यास प्रकल्पातून करण्यात आला. या सर्व माहितीवरून देशाच्या ग्रामीण भागातील पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्यासाठी आपण कुठवर मजल गाठली आहे व अजून किती पल्ला गाठायचा आहे याची कल्पना येते.

या देशव्यापी अभ्यास प्रकल्पासाठी माहिती गोळा करण्याचे काम वेगवेगळ्या राज्यातील मानव शास्त्रातील तज्ञ वा संस्थांवर सोपविण्यात आले होते. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचा या क्षेत्रातील असलेला अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्र व मध्यप्रदेश अशा दोन राज्यांची जबाबदारी एन.सी.ए.ई.आर. ने परिषदेवर सोपवली.

हाकाराच्या या अंकामधून वर्ष २००१ मध्ये केलेल्या महाराष्ट्रातील अभ्यासाचे निष्कर्ष मांडले आहेत. एन.सी.ए.ई.आर.ने निर्देशित केलेल्या कोल्हापूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यातील ९२ गावातून पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यात आला. गडचिरोली हा विदर्भातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील अत्यंत मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यामध्ये आदिवासींचे प्रमाणदेखील लक्षणीय आहे. याउलट पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा राज्यामधील प्रगत जिल्हा म्हणून गणला जातो असे हे विकासाच्या मोजपट्टीवर दोन विरुद्ध टोकांना असलेले जिल्हे. या दोन्ही जिल्ह्यांची तुलनात्मक आकडेवारी बघितली असता त्यामधली विकासाची दरी किती खोल आहे, किती रुंद आहे याचे चित्र ठळकपणे आपल्या समोर उभे रहाते. राज्यातील इतर जिल्ह्यांचा अभ्यास केला तरी ती आकडेवारी या दोन्हींच्या मध्ये कुठेतरी असल्याचे दिसेल. म्हणूनच या अतिप्रगत व अति मागास अशा दोन टोकाच्या जिल्ह्यांच्या आकडेवारीची सरासरी काढली तर आपल्याला महाराष्ट्राचे प्रातिनिधीक रूप पहायला मिळते.

ग्रामीण भागात जिल्ह्या-जिल्ह्यात, विभागा-विभागात असलेली विकासाची दरी कशी भरून काढायची हाच यक्षप्रश्न आहे. त्यासाठी संशोधक, नियोजनकर्ते, लोक प्रतिनिधी व नोकरशाहीने एकत्र येऊन विचारपूर्वक नियोजनाद्वारे कंबर कसून प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्यथा मागास भागाचा विकास हे केवळ स्वप्नच राहिल.

हाकाराचा हा जोडअंक सामान्य वाचक, कार्यकर्ते, अभ्यासक यांना आवडेल अशी आशा आहे. या अभ्यासासंदर्भातील आपल्या प्रतिक्रिया आम्हाला जरूर कळवाव्यात, त्याचे स्वागतच होईल.

**पुरुषोत्तम आगाशे**

# ❖ Editorial ❖

More than five decades have passed since Independence. India, through its five year plan approach has achieved many developmental objectives. It has made advancement in the fields of science and technology, trade & commerce, industries, education, health etc. Green and white revolutions have led to the self-sufficiency in foodgrain production and milk production.

Although the country has made rapid progress, the development has been asymmetrical. The main focus of development has remained on centres of commerce, trade and industries. As a result, the towns got transformed into cities and cities into metropolis and development has remained confined only to these large urban areas. Benefits of green and white revolution have reached only in certain pockets of the rural India and benefited certain castes and communities only. Other areas and communities have not gained from the agriculture advancement. Thus big gap has been created between urban and rural areas and also within the rural areas.

National Council of Applied Economic Research ( NCAER ), New Delhi undertook a nationwide research project to study basic rural infrastructure. Under this project information about 4 major sectors viz. - Roads & Transportation, Telecommunication, Electricity and Drinking water & Sanitation was collected from 1100 villages across 10 States.

Millions of rupees have been spent on the infrastructure development schemes in rural areas. State government records show that all schemes have been completed as per Plan estimates. But the ground realities are different. To find out the ground situation in rural areas and to collect more details about the 4 major sectors, the research project was undertaken. This information tells us about what are our achievements in basic rural infrastructure and how far we have to go.

Anthropology experts and Organisations from different States were involved in studies for the research project. The Maharashtra Association of Anthropological Sciences ( MAAS ) was entrusted with the responsibility of Maharashtra and Madhya Pradesh.

In this special issue of Hakara, research findings from the State of Maharashtra have been presented. Primary data from 92 villages in Kolhapur and Gadchiroli districts was collected . Gadchiroli is known as most backward district not only in Vidharbha region but also in the State of Maharashtra. The district comprises of mainly tribal population. On the other hand Kolhapur is considered as one of the progressive districts in Western Maharashtra. On the development scale these two districts are placed at two extremes. So when we look at the comparative figures, huge gap between the two could be made out easily. The other districts are midway between the two.

How to fill the large gap that exists between two districts or two regions is a major question. Researchers, planners, people's representatives and bureaucrats should come together and make sincere efforts to achieve the goal. Otherwise development will prove to be an elusive distant dream for the backward regions.

**Purushottam S. Agashe**

❑❑❑

# ❖ Basic Rural Infrastructure Project ❖

## Introduction

Even though 70% of the country's population is living in rural area, undue attention has been paid to the development of urban and industrial centres. Basic rural infrastructure which is a prerequisite for development remains one of the most neglected area and needs immediate attention.

Roads are the lifelines of the villages. Good roads and transportation facilitates the development. Good roads leads to the increased mobility, which in turn leads to increase in transportation facilities and also opportunities for villagers to engage in gainful activities. Good roads also facilitate marketing of agriculture produce. Today, in almost all the States rural roads are in sorry condition.

Regular electricity supply could change the rural life in big way. Electricity could run tubewells for irrigation, could be used for modern agricultural equipment's. It will also assist in building cold storage infrastructure in rural areas. Electricity is also prerequisite for running of rural water supply schemes. As the gap between electricity generation and demand is increasing very rapidly rural areas are the worst sufferers of frequent power cuts, low voltage power supply and load shedding.

Telephone is no more a luxurios gadget in the era of Information Technology. In rural areas telephone is an handy tool to send messages in emergency. It saves time, money and manpower. However till date, most of the telecom services have been developed in urban and semi urban areas. In rural areas spread of public and private telephones is very limited. And having a good working telephone is a distant dream.

Safe drinking water is the basic need of human life. However there are many villages in India where people do not even get safe drinking water supply for whole year. During summer women spend major part of their time in water collection, it also affects their health. Morbidity and mortality due to impure drinking water is also regular phenomenon for interior villages in rural areas during monsoon as well as in summer. Several man days and valuable lives are lost due to spread of water borne communicable diseases. In India, most of the villages are devoid of latrines and waste water disposal system.

During last 54 years Central and State Governments have spent billions of rupees on rural basic infrastructure – roads, electricity, telephones, drinking water & sanitation. Many international funding agencies have also funded infrastructure projects. What has happened to that money? Does the benefits have reached to the Indian villages? If yes, what changes

have been brought out in villages ? If not, what are the main hurdles? What do the common man think about the basic infrastructure? How does the villages are coping with situation? What needs to be done to improve the situation? Are there any alternatives to develop infrastructure? What is the process and what are the costs involved in the alternative solution? Can that alternative be replicated elsewhere in the country?

To answer above questions and find out the solution to the problem NCAER undertook a nationwide research project on basic rural infrastructure.

## The Project

Sir Ratan Tata Trust (SRTT), Mumbai funded NCAER to undertake the research project on rural infrastructure in India, mainly focussing on issues related to physical infrastructure. The four main sectors covered in this project were - Rural roads & transportation, Power, Telecommunication and Drinking Water and Sanitation.

The data about the rural infrastructure was collected in phased manner to get the complete picture of rural India.

1. Primary Data collection
2. Case studies
3. Secondary data collection

1. **Primary Data collection** :- Data about four sectors viz. Rural roads & transportation, Power, Telecom and Drinking Water and Sanitation was collected from ten major Indian states. In each state two districts were selected on the basis of the socio-economic indicators. Considering the large geographical area, 4 districts were covered each from Madhya Pradesh and Uttar Pradesh. From among the selected districts, two taluks each were selected using the same criteria. In Maharashtra, Sironcha and Etapalli taluks ( Dist. Gadchiroli ) and Chandgad and Hatkanagale taluks ( Dist Kolhapur ) were covered. From each taluk, infrastructure data from 20-25 villages was collected. The selection of the villages was carried out at local level. Villages along the longest road from taluk headquarter to taluk boundary were selected as per the sample design. Schedule was used to collect data from the villages. Primary data has given first hand information about the four sectors from rural India.

2. **Case Studies:** Two case studies from each sector were also collected from every state from which primary data has been collected. Case studies highlighted the alternative solutions used by the people to overcome the problem infrastructure development. Economics, feasibility, replicability of the alternatives was also looked into. Case studies have shown us the efforts made by the people and also guides us to adopt new ways for improving rural infrastructure.

3. **Secondary data:** Secondary data from all the states was collected for the period of last 5 years (i.e. for 1995 - 2000). The data was collected to find out the official targets and achievements, financial outlays and expenditure for the four sectors. However in most of the States data was poorly maintained, it was difficult to get the required data from the concerned departments. Secondary data has given the idea about the targets achieved by the State Governments and backlog of development.

As part of this all India project, The Maharashtra Association of Anthropological Sciences was entrusted with the responsibility of primary data collection from Maharashtra and Madhya Pradesh and secondary data from Maharashtra, Madhya Pradesh, Gujarat and Rajasthan. Case studies were also carried out in these four states.

In this issue of Hakara summary findings of primary data from Maharashtra has been discussed.

## Methodology

Research Coordinator from MAAS went to the study area. Considering local situation, language barrier and other factors two or three local graduate youths were hired as investigators in each taluk.. Investigators were given rigorous training about the schedule. English schedule was translated into local language / dialect. Each question in the schedule was discussed at full length.

Taluk map was collected from the PWD office. Longest route in the taluk, from the taluk headquarter to the taluk boundary was selected in consultation with local key informants. Local jeep was hired for the study. On first day, tour was made on the selected route, mapping all the villages, distances and approximate population. From among the mapped villages, study villages were selected as per the criteria laid down by the NCAER.

Selected villages were visited. Meeting was called at the common place in village like Chavadi, village temple. Village Sarpanch, Grampanchayat members, teachers and other dignitaries in the village were invited. Purpose of visit was explained to the villagers.

Questions were asked to the villagers in local dialect. One investigator asked questions while other recorded the answers. Where ever necessary questions were explained to the villagers in details. Filled schedules were checked by the Research Coordinator regularly.

Transect walk was made through the village. Observations about quality of internal road, public telephones, non metered electricity connections, drinking water source, sanitation & hygiene etc. were recorded.

❑❑❑

# ❖ Summary Findings ❖

As part of the nationwide project, field work for the State of Maharashtra was undertaken by MAAS ( The Maharashtra Association of Anthropological Sciences ), Pune in the year 2001. The summary findings of the research study for the State of Maharashtra are given below. The statistics gives us average picture of rural Maharashtra about the basic rural infrastructure.

## Population

In Maharashtra, total 92 villages were covered during the study, out of that 47 were from Gadchiroli district and 45 from Kolhapur district. The total population Coverage was 111561.

Out of the total population covered 14.5% belonged to Scheduled Castes and 11.6% belonged to Scheduled Tribes.

On an average 10 individuals from village migrated to the cities to earn livelihood.

## Roads & Transportation

The average distance of the State Highway from the surveyed villages was 16.2 Km. while that of National Highway was 108.6 Km.

On an average 39 individuals who commute daily to and from the village to earn their livelihood.

Most of the people travel by State Transport buses. The minimum cost paid by the people for transportation ranged from Rs. 0.55 – 0.82 / Km. and the average was Rs. 0.69 / Km. and the maximum cost ranged from Rs. 0.63 – 0.98 / Km. the average cost paid by the people was Rs. 0.81 / Km.

The average minimum and maximum cost of good transportation per Km. per quintal is Rs. 7.55/- and Rs. 8.92/- respectively.

**Mode of Intermediate Public transport :** The use of different IPT modes for general purpose is as follows :- by foot /cycle ( 92% ), ST bus ( 65% ) bullock cart ( 25% ) Rickshaw / Jeep ( 23% ) and motorcycle ( 15% )

**Internal Roads :** 54% villages responded that internal road in village is Kachha and of bad quality, while 30% reported that the internal road is of very bad quality. 5% villages reported that even though road is pucca it is of bad quality. In only 2% villages villagers said that internal roads are of good quality.

Internal village roads are repaired and maintained by Grampanchayat in 89% villages in 3% villages by PWD/ Government & in 2% by villagers only, in 7% villages the reply was nobody maintains roads.

**External Roads :** The external roads of the villages are also in bad condition. 40% external roads are Kachha and of bad quality, while in 5% villages road was pucca but of bad quality. In 37% it was reported that external roads are of very bad quality. In only 10% villages it was told that road is pucca and also of good quality.

In most of the cases, Public Works Department of the State Government maintains external roads ( 65% ). In some villages it was reported that Zilla Parishad maintains external roads ( 32% ).

The reasons for the poor condition of the roads are as follows :- ignorance by the Government ( 54% ), non availability of funds ( 50% ) corruption (14% ) lack of road maintenance ( 15% ) no maintenance of the quality while preparing the roads ( 7% )

**Solutions for good village roads :** People have made many suggestions for constructing and maintaining internal and external roads. 60% villages demanded funds for road construction, 24% expected good quality work from the government, 21% said that government should closely monitor the road construction work and 13% villages expected peoples involvement in monitoring. Villagers suggested formation of 'Peoples Committees' for monitoring the work. Its interesting that only 4 villages have demanded removal of corruption. The other suggestions are work be given to PWD and Grampanchayat than to contractors, proper information be given to people, and work guarantee from contractors.

## Telecommunication

In Maharashtra there were 0.45 Public telephones per village, while the average number of Private telephones per village was 21.6. The average number of individuals making at least one call in a week was 24.5. Outgoing call cost was Rs. 2.40/- for a three minute local call.

In 91% villages no body knows about cellular phones. Only in 5% villages some people have knowledge about it, in other villages some peoples have just heard about it.

Just like cellular phones, people don't have knowledge about internet technology and cyber dhabas ( 98% ). They have not even heard the words. Only 1% each answered that some persons in village are knowledgeable and have seen it on TV.

28% villages are satisfied with the telecom services and do not have any complaints about it. 25% villages reported that telephones are not working properly because of the ignorance of the telecom department. The other reasons were – no maintenance 7%, corruption 3%, less manpower 2%, small exchange 1%, lack of funds 1%. In 23% villages ( all from Gadchiroli ) people were unable to give reasons.

**Solutions to improve telephone service :** 25% villages have demanded that phone should be installed in village Grampanchayat where anybody will have access to it. 22% villages demanded improvement in telecom services. Other suggestions are - good maintenance 5%, increase in staff 3%,removal of corruption 2%, underground cables should be laid for good connectivity 2%. In 48% villages people were unable to suggest any solution.

## Electricity

In Maharashtra, about 6% households have the connections that are non metered and 60% have metered connections, thus there are 66% households with electricity and 34% families in rural area still depend on chimneys and lanterns to light their houses. There are only 1.3 business connections per village that use electricity.

On an average, villagers in rural area get electricity for 16 hours per day and it was available only for 4.2 days in a week. During monsoon months ( 90 days ) in the year 2000 the electricity was available for 46 days only.

All the villages where electricity is available, electricity bills are paid. But people complained about the billing system. Average bills issued without taking any reading. Electricity bill ranges from Rs. 50- 200. On average villagers are paying Rs. 125/- per month towards the electricity bill.

In Maharashtra 58% villages reported that they have to pay bribe for getting new electricity connection. The average amount of bribe paid to the linemen was Rs. 190/-.

**Domestic gadgets** : The instruments used in the villages are – Television 64%, Tape recorder 59%, Radio 33%, Fan 42%, Mixer 15%. These figures only represent spread of these gadgets in the rural area.

In Maharashtra only 4 villages ( 9% ) have industries. For electric supply industries have to depend on MSEB for continuous supply. Only 2 industries ( 2% ) have generators as back up provision. In case of electricity shortage households or local businesses do not have any provision.

The reasons given by the villagers about the electricity supply were – ignorance by MSEB staff (26% ), falling of trees on wires disrupts the electricity supply ( 25% ) less production of electricity in the state and hence shortage ( 18% ) linemen don't visit ( 14% ) corruption in MSEB ( 13% ) complaints are not entertained ( 6% ) more supply to cities and industries and load shading in rural areas ( 4% )

**Solutions for good electric-supply** : The summary of suggestions given by the good electricity supply is as follows :- improvement in work and proper supervision 57%, installation of powerful transformers in villages 11% removal of corruption 10%, increase in production of electricity 8%, theft be stopped 4%.

## Drinking Water & Sanitation

**Source of drinking water** : The main drinking water sources are : hand pumps 88%, dug wells 73% and river 13%. Piped stand posts have been installed in 39% villages while in 32% villages piped house connections have been provided.

It was observed that for the surveyed villages over all functioning rate of hand pumps was 81.5%

During summer, villages face water shortage. The average distance of water source from where people fetched water was 1.15 Km. In 9% villages drinking water was purchased. The average cost of purchased water was Rs. 8.60/- per 100 liters.

There were 45% villages with the water scheme, 55% are still devoid of it.

In all the villages water tax is paid to the Grampanchayat regularly. The rate of water tax for the hand pump and piped stand post varied from Rs. 20 – Rs. 80 per year. For piped household connection it was fixed at Rs. 360 per year. The average water tax paid by the people was Rs. 74/- per year.

Only 18% villages expressed satisfaction about the existing drinking water provisions. 82% villages said they are unhappy with the drinking water supply.

In Maharashtra, 14% villages had full nullahs along the road side, in 22% villages there was partial existence and 55% villages had no drainage system at all. 9% villages had choked nullahs.

In 64 % villages there was no waste water disposal system for the houses. In 18% villages gutters were present, in 7% water was sent to the bio gas plant and in 7% to kitchen garden. In only 4% villages soak pits were present.

Maharashtra has one latrine per 41 individuals. Out of the total constructed latrines 75.20% are in current use.

Panchayat Samiti or Zilla Parishad have constructed 63% latrines, while Grampanchayat & individuals have contributed for 8%, and 9% have been built by individuals on their own. 29% latrines are attached to septic tank, while 30% have been attached to the bio gas plant.

**Special problems related to monsoons :** Main problems during rainy season are :- impure drinking water 37%, muddy roads 36%, mosquito menace 24% and inconvenience due to non availability of latrines 24%

**Solutions to problems** :In 30% villages people recommended tap water schemes, 25% demanded new dug wells or bore wells, 21%villages asked for funds, 9% demanded lift irrigation schemes, 13% expressed their need to construct water storage tank, 7% suggested repair of existing sources, and.

**Priority** : People prioritized their needs for improvement in these four sectors. Priorities vary from village to village depending upon the local conditions. However, considering the averages, four sectors could be arranged in following manner -

1. **Drinking water & sanitation including latrines.**
2. **Internal & external village roads**
3. **Electricity**
4. **Telephones**

❑❑❑

# ❖ प्रस्तावना ❖

स्वातंत्र्यानंतरच्या ५०-५५ वर्षामध्ये देशाने विज्ञान व तंत्रज्ञान वाणिज्य व व्यापार, उद्योग तसेच आरोग्य, शिक्षण यासारख्या सामाजिक क्षेत्रांमध्ये प्रगती केली आहे. कृषी क्षेत्रामध्ये हरित तसेच धवल क्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादनामध्ये देश स्वयंपूर्ण तर बनलाच परतु त्याची निर्यातही करू लागला.

देशाने आर्थिक व सामाजिक क्षेत्र विकासामध्ये मोठी झेप घेतली असली तरी हा विकास असंतुलितपणाने झाला असल्याचे दिसते. ७०% जनता ग्रामीण भागातून रहात असून देखील विकास कामांचा ओघ शहरी व औद्योगिक भागाकडे सुरु असल्याचे पहायला मिळते. या चुकीच्या धोरणामुळे ग्रामीण जनता आजही विकासाचे प्रश्न मार्गी लागावेत म्हणून झगडताना दिसते. रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत तसेच पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता यासारख्या पायाभूत सोयीसुविधा खेडेगावांपर्यंत पूर्णपणे पोचलेल्या नाहीत.

चांगला पक्का डांबरी रस्ता ही गावाची जीवनरेखाच असते. अशा रस्त्यांमुळे वाहतूक वाढून लोकांना ये-जा करणे सुलभ होते. त्यायोगे गावातील लोकांना निरनिराळ्या व्यवसायांची संधी उपलब्ध होते. अशा रस्त्यावरून नाशवंत शेतीमाल जलदगतीने जवळच्या बाजारपेठेत पोहोचवणे शक्य होते. चांगले रस्ते असणे हे गावाच्या विकासाच्या दृष्टीने, लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक आहे. नविन रस्ते बांधणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणे ही मुख्यत्वाने राज्य सरकारची जबाबदारी आहे. आज सर्व राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते बघितले असता त्यांची अवस्था दयनीय आहे असेच म्हणावे लागेल.

ग्रामीण भागाला अखंडितपणे वीज पुरवठा झाला तर त्याचा पूर्णपणे कायापालट होऊ शकेल. कृषी पंपाने योग्य दाबाने नियमित वीजपुरवठा झाला तर सिंचनाद्वारे भरघोस अन्नधान्य उत्पादन होऊ शकेल. शेतीसाठी लागणाऱ्या यांत्रिक उपकरणांसाठी, शीतगृहात शेतीमालाचा साठा करण्यासाठी विजेची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील नळ पाणीपुरवठा योजना सुलभपणे चालण्यासाठी देखील वीज आवश्यक आहे. विजेची मागणी व उत्पादन यामध्ये असलेली दरी रूंदावत चालल्याने त्याचा फटका ग्रामीण भागाला मोठ्या प्रमाणावर बसला आहे. ग्रामीण भागातील जनता सतत खंडित होणाऱ्या विजेमुळे त्रस्त झाली असल्याचे चित्र सर्वच राज्यातून दिसते.

दूरध्वनी ही आता चैनीची वस्तू न रहाता गरजेचे साधन बनलेले आहे. ग्रामीण भागातदेखील दूरध्वनी आवश्यक बनू लागला आहे. दूरध्वनीवरून कामे झाल्यास वेळ, पैसा व मनुष्यबळाची बचत होऊ शकते. संगणक व इंटरनेटच्या युगात गावातूनच सरकारी कामे करता येऊ शकतात. मात्र दूरसंचार खात्याच्या सोयीसुविधांचा लाभ प्रामुख्याने शहरी, उपनगरी व निमशहरी भागांनाच मिळत असल्याचे दिसते. ग्रामीण भागामध्ये सार्वजनिक व खाजगी दूरध्वनींचा प्रसार मर्यादित स्वरूपात झालेला दिसतो. तेथेदेखील सेवा खंडित होण्याचे प्रमाण मोठे आहे.

स्वच्छ पिण्याचे पाणी ही मुलभूत गरज आहे. आजही देशातील अनेक गावांमधून स्वच्छ पिण्याचे पाणी वर्षभर मिळू शकत नाही. उन्हाळ्यामध्ये स्त्रियांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागते. अशुद्ध पिण्याच्या पाण्यामुळे होणारे आजार व त्यामुळे होणारे मृत्यू ही तर काही खेडेगावांसाठी नित्याचीच बाब बनली आहे. त्यामुळे उत्पादकतेवर परिणाम तर होतोच त्याशिवाय करोडो मनुष्य दिवसांची व अमूल्य अशा मानवी जीवनाची हानी होत आहे. शुद्ध पाणी पुरवठा करून हे सहज टाळता येऊ शकते. बहुसंख्य गावातून संडास व निचऱ्यासाठी गटारांची वानवा असल्याने सार्वजनिक स्वच्छतेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गेल्या ५४ वर्षामध्ये केंद्र व राज्य सरकारांनी ग्रामीण पायाभूत सुविधांसाठी करोडो रुपये खर्च केले. आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांनी पण त्यासाठी अनुदान व कर्ज स्वरुपात मदत केली. या पैशाचा विनियोग कसा केला गेला? त्याचा फायदा खेडेगावांपर्यंत पोहोचला का? जर का असेल तर त्यामुळे कोणकोणते बदल घडून आले? जर का नसेल तर कोणकोणते अडथळे आले? सामान्य माणसाची पायाभूत सोयीसुविधांबद्दल काय मते आहेत? लोक परिस्थितीशी कसे जुळवून घेत आहेत? परिस्थिती सुधारण्यासाठी काय केले पाहिजे? पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत का? पर्यायी उपाय योजनांची पुनरावृत्ती इतर ठिकाणी करता येणे शक्य आहे का?

वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च या संस्थेने पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प हाती घेतला होता. या प्रकल्पाचा आराखडा पुढील प्रमाणे -

# ❖ पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प ❖

सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई या संस्थेने देशाच्या ग्रामीण भागातील पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ अॅप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एन.सी.ए.ई.आर.) या संस्थेला संशोधन अनुदान दिले. या संशोधन प्रकल्पाचा मुख्य हेतू ग्रामीण भागातील भौतिक सोयीसुविधांचा अभ्यास करणे हा होता. या अभ्यास प्रकल्पामध्ये पुढील चार महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश होता. रस्ते व वाहतूक क्षेत्र, दूरसंचार, विद्युत आणि पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता.

या चार क्षेत्रातील प्रगतीची माहिती टप्प्याटप्प्याने अनेक राज्यातून विविध संस्था व तज्ज्ञांच्या मदतीने गोळा करण्यात आली. ही माहिती प्रामुख्याने तीन स्वरुपात होती -

१. प्राथमिक माहिती

२. पर्यायी उपाय योजना अभ्यास

३. दुय्यम माहिती

**१. प्राथमिक माहिती** - रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या चार क्षेत्रातील ग्राम पातळीवरची माहिती भारताच्या दहा मुख्य राज्यातून गोळा करण्यात आली. प्रत्येक राज्यातील दोन जिल्हे त्यासाठी निवडण्यात आले होते. या दोन जिल्ह्यांची निवड करताना सामाजिक व आर्थिक निकषांचा प्रामुख्याने विचार करण्यात येऊन राज्यामधून अति मागास व अति प्रगत असा एक एक जिल्हा निवडण्यात आला. उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश यासारख्या आकारमानाने मोठ्या असलेल्या राज्यातून ४ जिल्ह्यांची निवड करण्यात आली.

निवड केलेल्या जिल्ह्यामधून आर्थिक निकषांच्या आधारे प्रत्येकी दोन तालुक्यांची निवड करण्यात आली.

राज्यामधील जिल्हा, तालुका निवडीची प्रक्रिया एन.सी.ए.ई.आर. संस्थेनेच पूर्ण केली होती.

या तालुक्यातील प्रत्येकी सुमारे २०-२५ गावांची निवड करून त्यातून सर्व क्षेत्रांसंबंधित माहिती गोळा करण्यात आली. ही गावे निवडण्याचे स्वातंत्र्य माहिती गोळा करणाऱ्या संबंधित संस्थांना देण्यात आले होते. मात्र त्यासाठीचे निकष ठरवून देण्यात आले होते ते पुढीलप्रमाणे - तालुक्याच्या मुख्यालयापासून तालुक्याच्या हद्दीपर्यंत अनेक रस्ते असतात त्यापैकी सर्वात जास्त लांबीचा रस्ता निवडायचा. या रस्त्याचे

चार समान विभाग करायचे आणि प्रत्येक विभागातून साधारणपणे सहा गावे निवडायची त्यापैकी निम्मी रस्त्याच्या डाव्या बाजूची तर निम्मी उजव्या बाजूची. निवडलेल्या गावाची लोकसंख्या ५००० पेक्षा कमी असावी.

गावामधील पायाभूत सोयीसुविधांची माहिती गोळा करण्यासाठी एस.सी.ए.ई.आर. संस्थेने प्रश्नावली तयार केली होती. या प्रश्नावलीच्या मदतीनेच सर्व राज्यांमधून निवडलेल्या गावांमधून लोकांकडून प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली. त्यामुळे ग्रामपातळीवर उपलब्ध असलेल्या पायाभूत सोयीसुविधा व त्यांची सद्यस्थिती याचे पूर्णपणे आकलन होते.

**२. पर्यायी उपाय योजना अभ्यास –** प्राथमिक व दुय्यम माहितीच्या बरोबरीनेच सरकारी योजनांना पर्याय म्हणून ज्या काही वेगळ्या उपाय योजना करण्यात आल्या आहेत अशा प्रत्येक क्षेत्रातील दोन योजनांचा अभ्यास प्रत्येक राज्यातून करण्यात आला. लोकांनी केवळ सरकारी मदतीवर अवलंबून न रहाता पायाभूत सोयीसुविधा विकासासाठी कोणता पर्यायी मार्ग निवडला त्याचे अर्थशास्त्र, व्यवहार्यता, पुनरावृत्ती क्षमता वगैरे गोष्टींचा समावेश या अभ्यासात होता. या पर्यायी उपाययोजना अभ्यासातून लोकांनी सुधारणेसाठी केलेले प्रयत्न तर दिसून येतातच त्याचबरोबर भविष्यकालीन पायाभूत सोयीसुविधा सुधारणेसाठी विविध पर्यायांच्या उपलब्धतेची दिशा पण मिळते.

**३. दुय्यम माहिती –** चारही पायाभूत क्षेत्रांसाठीची गेल्या पाच वर्षासाठीची माहिती देशातील सर्व राज्यांमधून गोळा करण्यात आली. या आकडेवारीवरून राज्य सरकारचे अपेक्षित उद्दिष्ट व साध्य झालेले उद्दिष्ट, करण्यात आलेली अर्थ तरतूद व प्रत्यक्षात झालेला खर्च याविषयीची माहिती मिळाली.

मात्र दुय्यम माहिती गोळा करताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले. बऱ्याचशा राज्यातून नोंदी अद्ययावत नसल्याचे तर काही ठिकाणी राज्य सरकारकडेदेखील आकडेवारी एकत्रित स्वरुपात नसल्याचे आढळले. संबंधित विभागातून माहिती मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेला मध्य प्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्यातून प्राथमिक माहिती गोळा करण्याची तसेच वरील दोन राज्यांच्या जोडीला गुजरात व राजस्थान राज्यातून दुय्यम माहिती मिळवण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

हाकाराच्या या अंकामध्ये महाराष्ट्र राज्यातून गोळा करण्यात आलेल्या प्राथमिक माहितीबद्दल चर्चा करण्यात आली आहे.

# ❖ महाराष्ट्र : अभ्यास निष्कर्षांचा संक्षिप्त आढावा ❖

सर रतन टाटा ट्रस्ट, मुंबई या संस्थेने देशातील ग्रामीण पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी दिल्लीच्या नॅशनल कौन्सिल ऑफ ॲप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एन.सी.ए.ई.आर.) या संस्थेला अर्थसहाय्य दिले. या प्रकल्पामध्ये देशाच्या ग्रामीण भागात असलेल्या पायाभूत सोयीसुविधांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला. अभ्यासण्यात आलेली चार मुख्य क्षेत्रे पुढीलप्रमाणे - रस्ते व वाहतूक, वीज, दूरसंचार, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता.

देशाच्या दहा राज्यातून प्राथमिक माहिती (सुमारे १२०० गावातून) तर दुय्यम माहिती सर्व राज्यातून गोळा करण्यात आली. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने महाराष्ट्रातील गडचिरोली व कोल्हापूर या जिल्ह्यातून माहिती गोळा केली. या माहितीचे विश्लेषण केल्यानंतर महाराष्ट्राचे जे चित्र उभे राहते त्याचा संक्षिप्त गोषवारा येथे दिला आहे; तर त्यासंबंधीची सविस्तर जिल्हावार आकडेवारीनुसारची चर्चा पुढील प्रकरणात केली आहे.

## लोकसंख्या

पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील ४७ तर कोल्हापूर जिल्ह्यातील ४५ अशा एकूण ९२ गावातून प्राथमिक माहिती गोळा करण्यात आली. या सर्व सर्वेक्षित गावांची लोकसंख्या १,११,५६१ एवढी होती. तर एका गावाची सरासरी लोकसंख्या १२१२ होती.

एकूण सर्वेक्षित लोकसंख्येपैकी १४.५% लोकसंख्या अनुसूचित जातीची तर ११.६% लोकसंख्या अनुसूचित जमातीची असल्याचे दिसले.

सर्वेक्षित गावांमधून सरासरी १० लोक शहरांकडे अर्थार्जनासाठी स्थलांतर करत असल्याचे पहायला मिळाले.

## रस्ते व वाहतूक क्षेत्र

सर्वेक्षित गावांपासून राज्यमहामार्ग सरासरी १६ किमी तर राष्ट्रीय महामार्ग १०९ किमी दूर असल्याचे दिसले.

गावांमधून दररोज नोकरी-व्यवसायानिमित्त ये-जा करणाऱ्यांची संख्या ३९ असल्याचे आढळले.

ग्रामीण भागातील बहुतांश लोक राज्य परिवहन मंडळाच्या बसमधूनच प्रवास करतात. एक

किलोमीटर प्रवासासाठीचा कमीत कमी भाडेखर्च ५५ ते ८२ पैसे एवढा असल्याचे तर कमीत कमी सरासरी भाडे ६९ पैसे प्रति किलोमीटर एवढे होते. याच प्रवासासाठी जास्तीत जास्त भाडेखर्च ६३ ते ९८ पैसे एवढा असल्याचे तर जास्तीत जास्त सरासरी ८१ पैसे प्रति किलोमीटर एवढे भाडे लोकांना खर्च करावे लागत असल्याचे आढळून आले.

माल वाहतुकीसाठी एक क्विंटल माल एक किलोमीटर वाहून नेण्यासाठी कमीत कमी येणारा खर्च ७.५५ रुपये तर जास्तीत जास्त ८.९२ रुपये एवढा होता.

आसपासच्या गावांमध्ये बाजारासाठी, नातेवाईकांकडे जाण्यासाठी वगैरे वापर केल्या जाणाऱ्या वाहतुकीच्या साधनांची टक्केवारी पुढीलप्रमाणे - चालत किंवा सायकल (९२%), एस.टी.बस (६५%), बैलगाडी (२५%), रिक्षा/जीप (२३%), मोटारसायकल (१५%).

५४% गावातून गावातील अंतर्गत रस्ता कच्चा व खराब असल्याची तर ३०% अंतर्गत रस्ता अति खराब असल्याची तक्रार गावकऱ्यांनी केली. गावातला अंतर्गत रस्ता पक्का डांबरी असला तरी त्याची अवस्था दयनीय असल्याचे ५% गावातून सांगण्यात आले. केवळ २% गावातून अंतर्गत रस्ते चांगल्या दर्जाचे असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

८९% गावातून अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायत करत असल्याचे तर ३% गावातून पी.डब्ल्यू. डी. करत असल्याचे सांगितले. मात्र बहुतांश ग्रामस्थांची अशी तक्रार होती की पैशाअभावी देखभाल व दुरुस्ती होतच नाही आणि हेच कारण ७% गावातील लोकांनी तर सरळपणे सांगितले तर २% गावांनी आम्ही स्वत:च देखभाल करतो असे सांगितले.

गावाला जोडणाऱ्या बाह्य रस्त्यांची अवस्थादेखील दयनीय आहे. ४०% गावातून बाह्य रस्ते कच्चे व खराब दर्जाचे तर ५% गावातून पक्के (डांबरी) पण खराब दर्जाचे आहेत. ३७% गावातून बाह्य रस्ते अति खराब असल्याचे - त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याचे सांगितले. केवळ १०% गावातून बाह्य रस्ते पक्के व डांबरी असल्याचे व त्यांची अवस्था चांगली असल्याचे पाहणीत आढळून आले.

६५% गावातील रस्ते पी. डब्ल्यू. डी. तर्फे तर ३२% गावातील रस्ते जिल्हा परिषदेतर्फे देखभाल व दुरुस्त करण्यात येत असल्याचे लोकांनी सांगितले.

गावातील अंतर्गत व बाह्य रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे पुढीलप्रमाणे - राज्य सरकारचे दुर्लक्ष (५४%), निधी उपलब्ध होत नाही (५०%), भ्रष्टाचार (१४%), रस्त्यांच्या योग्य देखभालीचा अभाव (१५%), रस्ता तयार करताना कामाचा दर्जा राखला जात नाही (७%).

रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांनी अनेक उपाय सुचवले आहेत ते पुढीलप्रमाणे -

रस्ते बांधणीसाठी निधी उपलब्ध करून देणे (६०%), रस्ते बांधताना चांगल्या दर्जाचे काम (२४%), सरकारकडून रस्ते बांधणीच्या कामावर काटेकोरपणे देखरेख (२१%). याचबरोबर १३% गावातील लोकांनी रस्ते बांधणीच्या कामाच्या देखरेखीसाठी जनतेलादेखील सहभागी करून घेतले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. लोकांनी त्यासाठी लोक समित्या स्थापन करण्याची सूचना केली आहे. केवळ ४ गावातून (२%) भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे सुचवले आहे. इतर काही सूचना अशा - कंत्राटदारांना काम देण्यापेक्षा ग्रामपंचायत अथवा पी.डब्ल्यु.डी. ने काम करावे, लोकांना रस्ते बांधणी संदर्भातील सर्व माहिती द्यावी, काम करून घेताना कंत्राटदाराकडून कामाच्या दर्जाची हमी घ्यावी.

## दूरसंचार क्षेत्र

महाराष्ट्रामध्ये सरासरी एका गावामधून ०.४५ इतके सार्वजनिक दूरध्वनी होते. म्हणजेच दोन गावांमागे एक दूरध्वनी. या सार्वजनिक दूरध्वनींपैकी बहुतांश दूरध्वनी ग्रामपंचायतीत बसवलेले होते व त्यापैकी जवळजवळ सर्वच बंद होते. गावातील खासगी दूरध्वनींची सरासरी संख्या २२ एवढी होती. एका आठवड्यामध्ये किमान एकदा तरी दूरध्वनीचा वापर करणाऱ्यांची संख्या गावामागे २५ व्यक्ती अशी होती. तर तीन मिनिटांच्या संभाषणासाठी लोकांना सरासरी २.४० रुपये द्यावे लागत असल्याचे दिसले.

ग्रामीण भागातील ९१% गावातून असे आढळून आले की गावातील कोणालाच मोबाईल दूरध्वनीबद्दल माहिती नाही. केवळ ५% गावातून गावातील काही लोकांना त्याबद्दल थोडीफार माहिती असल्याचे दिसले.

मोबाईल दूरध्वनीप्रमाणेच इंटरनेट विषयीचा प्रसार ग्रामीण भागामध्ये अजिबातच झाला नसल्याचे दिसते. ९८% गावातील लोक इंटरनेटबद्दल अनभिज्ञ आहेत. तर १% गावातील काही लोकांना माहिती असल्याचे दिसून आले.

दूरध्वनी सेवेबाबतदेखील लोकांकडून तक्रारी ऐकायला मिळाल्या - दूरसंचार खाते ग्रामीण भागातील सेवेकडे दुर्लक्ष करत असल्याचे २५% गावातील लोकांनी सांगितले. इतर कारणे पुढीलप्रमाणे - देखभाल नाही (७%), भ्रष्टाचार (३%), कमी मनुष्यबळ (२%), कमी क्षमतेचे दूरध्वनी केंद्र (१%), निधीचा अभाव (१%).

याचबरोबर २८% गावातील लोकांनी दूरध्वनी सेवा अत्यंत सुरळीत असल्याचे व त्याबद्दल कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले.

दूरध्वनीसेवेत सुधारणा करण्यासाठी लोकांनी पुढील उपाययोजना सुचवल्या - २५% गावांनी ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक दूरध्वनी बसवण्याची सूचना केली जेणेकरून सर्व लोकांची सोय होईल. दूरध्वनी सेवेत सुधारणा व्हावी (२२%), चांगली देखभाल करावी (५%), मनुष्यबळ वाढवावे (३%), भ्रष्टाचारास आळा (२%), चांगल्या सेवेसाठी भूमिगत वाहिन्या (२%).

## विद्युत क्षेत्र

महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये ६% घरामधून मीटर विना वीज जोड घेतलेले आहेत. यामध्ये दुसऱ्याच्या मीटर वरून वीज जोड घेणाऱ्यांचा तसेच वीजवाहक तारांवर आकडे टाकून वीज घेणाऱ्यांचा समावेश आहे. ६०% घरातून अधिकृत मीटरसहित वीज जोड घेतलेले आहेत. अशाप्रकारे एकूण ६६% घरांमधून वीज पोहोचलेली आहे तर ३४% कुटुंबातून चिमणी कंदिलाचाच वापर केला जात आहे. गावामधून वीजेवर चालणारे सरासरी १.३ किरकोळ धंदे असल्याचे आढळले.

खेडेगावामध्ये दिवसातून सरासरी केवळ १६ तास वीज उपलब्ध असते तर आठवड्यातून केवळ ४.२ दिवसच वीज मिळते. वर्ष २००० मधील पावसाच्या तीन महिन्याच्या काळात (९० दिवस) केवळ ४६ दिवसच वीज उपलब्ध होती.

ज्या ज्या गावांमधून वीज उपलब्ध आहे तेथील वीज ग्राहक नियमितपणे वीज देयक भरतात. मात्र सर्व गावातून वीज देयकासंबंधी तक्रारी ऐकायला मिळाल्या - वीज मीटर रिडिंग न घेता सरासरी देयक आकारले जाते. बरेच वेळा ती रक्कम फार असते, तक्रारींची दखल घेतली जात नाही. महिन्याला ५० ते २०० रुपयापर्यंत वीज देयकाची रक्कम असते तर सरासरी १२५ रुपये इतकी रक्कम वीज देयकापोटी भरावी लागते.

महाराष्ट्रातील सुमारे ५८% गावातून नविन वीज जोड घेताना कर्मचाऱ्यास लाच द्यावी लागत असल्याचे सांगण्यात आले. कर्मचाऱ्याला द्यावी लागत असलेली सरासरी लाच १९० रुपये एवढी होती.

ग्रामीण भागामध्ये विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर फारसा नाही. केवळ काही घरातूनच वापरल्या जाणाऱ्या या उपकरणांची गाववार टक्केवारी अशी - दूरदर्शन (६४%), टेपरेकॉर्डर (५९%), रेडिओ (३३%), पंखा (४२%), मिक्सर (१५%).

केवळ ९% गावातूनच कारखाने असल्याचे दिसले हे कारखाने अखंडित वीज पुरवठ्यासाठी विद्युत मंडळावरच अवलंबून असतात. केवळ ४ पैकी २ कारखान्यांमधून वीज पुरवठा खंडित झाल्यास जनरेटरचा वापर केला जातो.

अनियमित वीज पुरवठ्याची लोकांनी सांगितलेली कारणे पुढीलप्रमाणे - म.रा.वि. मंडळाच्या कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष (२६%) झाडाच्या फांद्या वीजवाहक तारांवर पडल्याने पुरवठ्यात व्यत्यय (२५%) कमी वीज उत्पादनामुळे तुटवडा (१८%), तक्रारींचे निवारण करण्यासाठी कर्मचारी येत नाहीत (१४%), भ्रष्टाचार (१३%), तक्रारींची दखल घेतली जात नाही (६%), शहर व कारखान्यांसाठी नियमित वीज पुरवठा व त्यामुळे ग्रामीण भागात भारनियमन (४%).

वीज पुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी लोकांनी पुढील उपाय सुचवले आहेत - कामात सुधारणा व योग्य देखरेख (५७%), अधिक क्षमतेचे रोहित्र बसवणे (११%), भ्रष्टाचारास आळा (१०%), वीज उत्पादन वाढवणे (८%), वीज चोरीस आळा घालणे (४%).

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्र

पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत पुढीलप्रमाणे -

हातपंप (८८%), विहिरी (७३%), नदी (१३%). त्याचबरोबर ३९% गावांमधून सार्वजनिक नळाद्वारे पाणी पुरवठा केला जातो तर ३२% गावातून घरगुती नळजोडदेखील उपलब्ध आहेत.

राज्यामध्ये प्रत्येक गावामागे सरासरी ३.७ हातपंप होते. एकूण उपलब्ध हातपंपांपैकी ८२% हातपंप चालू स्थितीत असल्याचे आढळले.

४५% गावांमधून नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पिण्याचे पाणी लोकांना पुरवले जाते. ५५% गावे अजूनही त्यापासून वंचित आहेत.

लोकांना जास्तीत जास्त सरासरी १.२ किलोमीटर वरून पिण्याचे पाणी आणावे लागते.

उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असताना ९% गावातील लोकांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. १०० लिटर पाणी खरेदी करण्यास ८.४० रुपये इतका खर्च येतो.

सर्व गावातील लोक ग्रामपंचायतीकडे नियमितपणे पाणीपट्टी भरतात. पाणीपट्टीचा वार्षिक दर हातपंप व सार्वजनिक नळासाठी २० ते ८० रुपये एवढा तर घरगुती नळासाठी ३६० रुपये एवढा होता. ग्रामीण भागातील लोकांना सरासरी ७४ रुपये वार्षिक पाणीपट्टी भरावी लागते.

राज्यातील केवळ १८% गावातूनच सध्याच्या उपलब्ध असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. ८२% गावातील लोक त्याबद्दल असमाधानी असून त्यांना आणखीन सोयी गावात व्हाव्यात असे वाटते.

पिण्याचे पाणी वर्षभर उपलब्ध व्हावे म्हणून लोकांनी पुढील सूचना केल्या - गावामध्ये नळ पाणी पुरवठा योजना (३०%), नविन विहिर किंवा हातपंप (२५%), अधिक निधी (२१%), नदीवरून उपसा पाणीपुरवठा योजना (९%), पाण्याची साठवण टाकी बांधणे (१३%), सध्याच्या स्त्रोतांची दुरुस्ती (७%).

महाराष्ट्र राज्यातील १४% गावांमधून अंतर्गत रस्त्याच्या बाजूने सर्व गावातून गटारे बांधली गेली असल्याचे आढळले तर २२% गावातून थोड्या रस्त्यांवरच कडेला गटारे बांधली होती. ९% गावातून बांधलेली गटारे बुजली होती तर ५५% गावांमधून अंतर्गत रस्त्याच्या बाजूने गटारांचे काम अजिबातच झाले नसल्याचे आढळले.

घरातील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी ६४% गावांमधून कोणत्याही प्रकारची व्यवस्था केलेली नव्हती. १८% गावांमध्ये घरातील सांडपाणी गटारांमध्ये, ७% गावांमध्ये बायोगॅस संयंत्र व परसबागेत सोडले जात असल्याचे आढळले. ४% गावातून शोषखड्डे बघायला मिळाले.

महाराष्ट्रामध्ये ४१ व्यक्तींमागे एक संडास असल्याचे दिसले. एकूण बांधलेल्या संडासांपैकी ७५% संडासांचा वापर होत असल्याचे पाहणीत आढळून आले.

६३% संडास बांधण्यासाठी जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीने अर्थसहाय्य केले आहे तर ८% संडास ग्रामपंचायत व लोकांनी मिळून बांधले आहेत. ९% संडास लोकांनी स्वखर्चातून बांधले आहेत.

पावसाळ्यामध्ये ग्रामीण भागातील जनतेला पुढील समस्यांचा मुख्यत्वे सामना करावा लागतो - अशुद्ध पिण्याचे पाणी (३७%), चिखलमय रस्ते (३६%), डासांचा प्रादुर्भाव (२४%), संडास नसल्याने विशेष करून महिलांची होणारी गैरसोय (२४%).

आपल्या समस्यांचे निराकरण व्हावे म्हणून लोकांनी सुचवलेला चार क्षेत्रांचा प्राधान्यक्रम पुढे दिला आहे -

१. **पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता**

२. **अंतर्गत व बाह्य रस्ते**

३. **वीज**

४. **दूरध्वनी**

❑❑❑

# ❖ संक्षिप्त जिल्हा ओळख - कोल्हापूर ❖

कोल्हापूर हे प्राचीन काळापासून प्रसिद्ध असे शहर आहे. येथील पुरातन अशा महालक्ष्मी मंदिरामुळे या शहराला दक्षिणेची काशी असेही संबोधले जाते. हे मंदिर चालुक्य घराण्याच्या कर्णदेवाने बांधल्याचे सांगितले जाते. वास्तुशास्त्राचा उत्कृष्ट नमुना अशी या मंदिराची ख्याती आहे.

कोल्हापूरचा इतिहास ढोबळमानाने तीन कालखंडांमध्ये विभागता येईल. इ.स. १३४७ पर्यंतचा हिंदू राज्यकर्त्यांचा कालखंड, इ.स. १३४७ ते १७०० पर्यंतच मुघल राजवटीचा कालखंड आणि इ.स. १७०० नंतरचा कालखंड.

इ.स. ५०० च्या सुमारास कदंब घराण्याने या भागावर वर्चस्व प्रस्थापित केले. त्यानंतर हे राज्य चालुक्य, राष्ट्रकूट या घराण्यांनी ते चालवले व नंतर ते देवगिरीच्या यादवांच्या अधिपत्याखाली आले.

इ.स. १३४७ साली यादवांचा दिल्लीच्या सुलतानाने पराभव केला. त्यानंतर हा भाग दख्खनच्या बहामनी राजवटीकडे व नंतर विजापूरच्या राजांकडे आला. शिवाजी महाराजांनी पन्हाळगड, विशाळगड किल्ले जिंकून आदिलशाहीला शह दिला. शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने हे किल्ले जिंकून घेतले. मात्र अठराव्या शतकाच्या सुरुवातीस राजाराम महाराजांनी पुन्हा एकदा पन्हाळा जिंकला. त्यानंतर कित्येक वर्ष पन्हाळा ही कोल्हापूर राज्याची राजधानी होती. इ.स. १७८२ मध्ये पन्हाळ्याहून कोल्हापूरला राजधानी हलवण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात सामाजिक बदलांचे एक नवे पर्व सुरू झाले.

१९६० साली महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्याची निर्मिती झाली.


कोल्हापूर जिल्ह्यामध्ये रस्ते व लोहमार्गाचे जाळे असल्याने तसेच अन्य पायाभूत सुविधांचा विकास झालेला असल्याने ते महाराष्ट्रातील प्रमुख औद्योगिक केंद्र बनले आहे.

कोल्हापूर जिल्हा शेतीमध्येदेखील अग्रेसर आहे. या जिल्ह्यामध्ये सहकारी चळवळीची मुळे खेडोपाडी पोहोचलेली आहेत. सहकारी तत्वावर चालणारे अनेक साखर कारखाने, सूत गिरण्या, दुग्ध प्रकल्प जिल्ह्यामध्ये आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यात ग्रामीण भागातून ७५% लोक रहातात. कुणबी, मराठा, जैन, लिंगायत या जातीचे लोक बहुसंख्येने आढळतात. हरिजनांचे प्रमाणदेखील बऱ्यापैकी आहे.

वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ३५,१५,४१३ इतकी आहे.

# कोल्हापूर जिल्हा



A
B
C
D
1
2
3
4
5
चांदल
ढाकाळ
गोठणा
रिसूळ
देवरुख
उदगिरी
मालगाव
गोलिकणे
सांगली
रत्नागिरी
आंबा
येळवन
कांटे
अणस्कुरा
कोडोळी
किणी
वडगाव
सादोले
कुंभोज
कोथळी
जयसिंगपूर
पन्हाळा
आसुर्ले
वाडी रत्नागिरी
टोप
माले
रुकडी
शिरोली
चिपरी
तिळवणी
शिरढोण
गणेशवाडी
कुरुंदवाड
इचलकरंजी
पट्टणकोडोली
हुपरी
रेंदाळ
दतवाड
ठाकळी
कोल्हापूर
बीड
कागल
सांगाव
नदगाव
राशिवडे
घोटवडे
वाळवे
खेबवडे
आवळी
लखमापूर
सरवडे
मुरगुड
आसगाव
रामनवाडी
गारगोटी
बिद्री
मुदरगड
कडगाव
गडहिंग्लज
हरळी
हलकर्णी
महागाव
मडिलगे
हातिवडे
लाटगाव
चितळे
अडकूर
शिरगाव
मागनवाडी
पिळणी
तडसिनहाळ
देवरवाडी
सुप
ढकोली
पार्ले
कर्नाटक
सिंधुदुर्ग
गोवे
अरब सागर
1:700,000

# कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वेक्षित गावे

## (अ) चंदगड तालुका

| | |
|---|---|
| १. शिनोळी बुद्रुक | २. महिपाळ गड |
| ३. सुपे | ४. तडशिनहाळ |
| ५. हाजगोळी | ६. माडवळे |
| ७. बसर्गे | ८. करंजगाव |
| ९. पाटणे | १०. सुंडी |
| ११. मांडेदुर्ग | १२. मुरकुटेवाडी |
| १३. तावरेवाडी | १४. बागिलगे |
| १५. नरेवाडी | १६. गुडेवाडी |
| १७. दाटे | १८. हलारवाडी |
| १९. कुर्तनवाडी | २०. बेळेभाट |
| २१. कोरज | २२. कोनेवाडी |
| २३. सातवणे | २४. वाळकुळी |
| २५. शिरगाव | |

## (ब) हातकणंगले तालुका

| | |
|---|---|
| १. निलेवाडी | २. बिरदेवनगर |
| ३. जुने चावरे | ४. नविन चावरे |
| ५. अंबप | ६. अंबपवाडी |
| ७. कापुरवाडी | ८. तासगाव |
| ९. संभापूर | १०. कासारवाडी |
| ११. भेंडवडे | १२. वाठार तर्फ उदगाव |
| १३. लक्ष्मीवाडी | १४. माधवनगर |
| १५. बिरदेववाडी | १६. शिवपुरी |
| १७. नेज | १८. माणगाववाडी |
| १९. मुडशिंगी | २०. मजले |

## ❖ संक्षिप्त जिल्हा ओळख - गडचिरोली ❖

गडचिरोली हा महाराष्ट्राच्या सर्वात पूर्वेकडे वसलेला विदर्भातील जिल्हा. या जिल्ह्याच्या पूर्वेला छत्तीसगड तर दक्षिणेला आंध्रप्रदेश आहे. तसेच पश्चिमेला चंद्रपूर तर उत्तरेला भंडारा हे जिल्हे आहेत. हा जिल्हा पूर्वी चंद्रपूर किंवा चांदा जिल्ह्याचा एक भाग होता. मात्र प्रशासकीय सोयीसाठी तसेच कृषी व औद्योगिक विकास झपाट्याने व्हावा म्हणून ऑगस्ट १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून चंद्रपूर व गडचिरोली असे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले. गडचिरोली जिल्ह्यामध्ये एकूण १० तालुके आहेत ते पुढीलप्रमाणे - गडचिरोली, आरमोरी, कुरखेडा, धानोरा, देसाईगंज, एटापल्ली, भामरागड, सिरोंचा, अहेरी आणि चामोर्शी.

गडचिरोली जिल्ह्याचा इतिहास चंद्रपूरच्या इतिहासाशी जोडला गेलेला आहे. हा भाग राष्ट्रकूट घराण्याच्या अधिपत्याखाली होता. त्यांच्या कालखंडात मार्कंडा येथे हेमाडपंथी शैलीतील मंदिर बांधण्यात आले. राष्ट्रकूट घराण्यानंतर या भागावर कल्याणी येथील चालुक्य, धार येथील परमार, देवगिरीचे यादव तसेच वरंगळच्या काकातिया घराण्याने सत्ता गाजवली. त्यानंतर चंद्रपूरच्या गोंड घराण्याच्या अधिपत्याखाली हा प्रदेश आला. तेराव्या शतकात खांडक्या बल्लाळ शाह याने चंद्रपूर येथे आपली राजधानी वसवली. त्यानंतर नागपूरच्या भोसले घराण्याने या भागावर आपले अधिराज्य प्रस्थापित केले. १८५४ मध्ये येथे ब्रिटिश राजवटीचा अंमल सुरू झाला. ब्रिटिशांनी १९०५ मध्ये गडचिरोली तालुका निर्माण केला.

१९५६ साली भाषावार प्रांत रचनेमुळे चंद्रपूर जिल्हा मध्यप्रदेशकडून मुंबई प्रांतात समाविष्ट केला गेला. १९६० साली महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर हा जिल्हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग बनला.

गडचिरोली जिल्ह्याचा ७८% भूभाग जंगलांनी व्यापलेला आहे. येथील जंगलातून बांबू व तेंदू पत्ता यापासून प्रमुख उत्पन्न मिळते. जिल्ह्यामध्ये खनिज साठा भरपूर प्रमाणात आहे. मात्र अजूनही येथे सापडणाऱ्या लोह, मँगेनिज, अभ्रक यासारख्या खनिजांचे व्यावसायिक तत्वावर उत्खनन केले जात नाही. जिल्ह्यामध्ये फारसा औद्योगिक विकास झालेला नाही. केवळ आष्टी व देसाईगंज येथे कागद कारखाने आहेत.

वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ९,६९,९६० एवढी आहे. जिल्ह्याच्या १० तालुक्यातून सुमारे १४२१ गावांमधून आदिवासी जनसंख्या आढळते. एकूण लोकसंख्येच्या ३८% लोकसंख्या आदिवासींची आहे. माडिया, गोंड, परधान या जमाती मुख्यत्वाने आढळतात.

जिल्ह्याचा कृषी व औद्योगिक क्षेत्रात फारसा विकास झालेला नाही. शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या देखील मागासलेपण आढळते. जंगल प्रदेश, आंध्र व छत्तीसगड या राज्यांना लागून असलेली सीमा यामुळे या जिल्ह्यातील सिरोंचा, एटापल्ली, भामरागड व इतर तालुक्यातून नक्षलवादाचा प्रभाव असल्याचे दिसते.

## गडचिरोली जिल्ह्यातील सर्वेक्षित गावे


### (अ) सिरोंचा तालुका

| | |
|---|---|
| १. पातागुडम | २. कोपेल्ला |
| ३. सोमनपल्ली | ४. टेकडा मोटला |
| ५. गुम्मलकोंड | ६. सुकरेल्ली |
| ७. तुमनूर माल | ८. आयपेंटा |
| ९. चित्तुर | १०. असरअल्ली |
| ११. वडदम | १२. पोचमपल्ली |
| १३. कोतापल्ली | १४. लक्ष्मीदेव पेंटा |
| १५. अंकिसा | १६. पेंटीपाका |
| १७. लांबडपल्ली | १८. नंदीगाव |
| १९. लक्ष्मीपूर | २०. नगरम् |
| २१. रामानुजपूर | २२. जानमपल्ली |

### (ब) एटापल्ली तालुका

| | |
|---|---|
| १. घोटसूर | २. वडसा कला |
| ३. तोडसा | ४. दिंडवी |
| ५. सोहगाव | ६. कांदळी |
| ७. मोरावाही | ८. कसूरवाही |
| ९. चौकीवाडा | १०. सेवारी |
| ११. कोटमी | १२. एटावाही |
| १३. वागेझरी | १४. पुन्नुर |
| १५. पेटा | १६. कोठी |
| १७. कमके | १८. वट्टेगट्टा |
| १९. एकरा बुद्रुक | २०. कुद्री |
| २१. ताडपल्ली | २२. आलेंगा |
| २३. दोड्डा | २४. पेठा |
| २५. झुर्री | |

# गडचिरोली जिल्हा



A
B
C
D
1
2
3
4
5
गडचिरोली
चंद्रपूर
भा
र
त
मध्य प्रदेश
आंध्र प्रदेश
मसेली
कोरची
बोरगाव
गुधेकासा
अंबागड चौकी
गोटाटोला
देवरी
कोटगुल
मानपूर
कुर्खेडा
रामगड
पुराडा
वडसा
गेवर्धा
काडोली
सोनसारी
मानपूर
वैरागड
देऊळगाव
दौंडी
मुरुमगाव
धानोरा
पोलो
वाळद
मुरुमगाव
आरमोरी
मेंडकी
तळोधी
तळोधी रोड
नवरगाव
आलेवाही
शंकरपूर
नागभीड
ब्रह्मपुरी
दिघोरी
मारोती
पाथरी
विहीरगाव
मूल
सावली
चिचपल्ली
डोंगरगाव
कारवाफा
हनसायली
प्रोटेगाव
कुनघाडा
मुरखळा
चिचोड
तेक्का
मुरूमी
रोपी
जेवळी
मोरोडा
पुराडापूर
आसुटी
घोट
चाकंपल्ली
मुलचेरा
कोठरी
पोंभुर्णा
अकसापूर
विठ्ठलवाडा
तोहोगाव
आष्टी
रेगडी
मारोडी
बामनपल्ली
हेडरी
सुरजागड
एटापल्ली
उदेरा
पुरकाहूर
कोठी
दिरंगी
हेटी
लहरी
भामरागड
गोंगवाडा
लेंका
वेलगुरू
आल्लापल्ली
मेडपल्ली
अहेरी
बोरलगुडा
चाकणगट्टा
कोसल्ली
राजाराम
कमलापूर
देवळमारी
अंबालमारी
रेपनपल्ली
गोविंदगाव
जिमालगट्टा
बामनपल्ली
देचली
मुकबेली
कुमु
सुंदा
आंधप्रदेश
सिरसा
बामणी
सिरकोंडा
जिंगपूर
कोपेला
सिरोंचा
आमदेली
पातागुडम
अरादा
अंकिसा
आसरल्ली
भोपाळपटनम
माडेड
विजापूर
मासपूर
जयपुरम
गोपाल
कोठापूर
सिरपूर
परळकोट
कुदेकोन्ही
परळी
1:1,200,000

# ❖ संशोधन पद्धती ❖

महाराष्ट्रामधून जी माहिती गोळा करण्यात आली त्यासाठी पुढील पद्धतीचा वापर करण्यात आला.

क्षेत्रकार्य सुरु करण्याआधी त्या जिल्ह्याविषयी तसेच तेथील तालुक्यांविषयी माहिती गोळा करण्यात आली. त्यामध्ये जिल्हा, तालुक्याचे नकाशे, ओळखीच्या स्थानिक व्यक्तींचे पत्ते वगैरेचा समावेश होता.

संशोधन समन्वयक तालुक्याच्या ठिकाणी जाऊन स्थानिक महत्वाच्या व्यक्तींशी संपर्क करत असे. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांच्या ओळखीने स्थानिक परिस्थिती, वेगळी बोली भाषा या सर्व गोष्टी लक्षात घेऊन दोन किंवा तीन पदवीधर तरुणांची निवड केली जात होती. त्या तरुणांना एक संपूर्ण दिवस प्रश्नावली संदर्भात प्रशिक्षण दिले जायचे. प्रश्नावलीतील प्रश्न कसे विचारायचे, त्यातून कोणती माहिती मिळणे आवश्यक आहे, स्थानिक बोली भाषेतून ते प्रश्न कसे विचारता येतील यार्ची चर्चा केली जायची. इंग्रजीमध्ये असलेल्या प्रश्नावलीचे स्थानिक बोलीभाषेत भाषांतर करून घेतले जायचे व त्याचा सराव करून घेतला जायचा. सिरोंचा तालुक्यात तेलगु बोलता येणाऱ्या तर एटापल्ली तालुक्यात माडिया बोली येणाऱ्या तरुण पदवीधरांची निवड केली गेली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाकडून तालुक्यातील रस्त्यांचा नकाशा घेऊन,तालुक्याच्या मुख्यालयापासून ते सीमेपर्यंत असलेला सर्वात जास्त लांबीचा रस्ता स्थानिक व्यक्तींच्या सल्ल्याने निवडला जायचा. गावांना भेटी देण्यासाठी स्थानिक जीप चार दिवसांसाठी भाड्याने घेतली जायची.

कामाच्या पहिल्या दिवशी निवडलेल्या मार्गावर जीप मधून प्रवास केला जायचा. जाताना वाटेत लागणारी सर्व गावे त्यांचे मुख्य रस्त्यापासूनचे अंतर, अंदाजे लोकसंख्या, एकूण घरे याबद्दलच्या माहितीची नोंद केली जायची. अशा प्रकारे तालुका मुख्यालयापासून तालुक्याच्या सीमेपर्यंत प्रवास केला जायचा. ही माहिती गोळा केल्यानंतर एन.सी.ए.ई.आर.ने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार नोंद केलेल्या गावांच्या यादीतून २५ गावांची निवड केली जायची.

त्यानंतर निवड केलेल्या गावांना भेट दिली जायची गावातील सार्वजनिक ठिकाणी - चावडी, मंदिर, समाज मंदिर अशा ठिकाणी गावकऱ्यांची सभा बोलवली जायची. सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील,

ग्रामपंचायत सदस्य व गावातील इतर सन्माननीय व्यक्तींच्या उपस्थितीत सभा घेतली जायची. रामराम, नमस्कारासारख्या औपचारिकता व्हायच्या. सभेमध्ये सर्व गावकऱ्यांना संशोधन गटाची ओळख करून दिली जायची, गावामध्ये येण्याचे प्रयोजन सांगितले जायचे तसेच पायाभूत सोयीसुविधांच्या अभ्यासाची पूर्ण कल्पना दिली जायची व त्यांच्याकडून सहकार्य मागितले जायचे. गावकऱ्यांनी प्रश्न विचारण्यास संमती दिल्यानंतर प्रश्नावलीतील प्रश्न विचारण्यास सुरुवात केली जायची.

लोकांना स्थानिक बोलीभाषेतून प्रश्न विचारले जायचे. एक संशोधन सहाय्यक प्रश्न विचारायचा तर दुसरा त्याची उत्तरे नोंदवायचा. लोकांना प्रश्न न समजल्यास, अधिक माहिती हवी असल्यास, शंका असल्यास, संशोधन समन्वयक त्या गोष्टींचे निराकरण करत असे. भरून झालेली प्रश्नावली संशोधन समन्वयक तपासत असे.

प्रश्नावली भरून झाल्यानंतर उपस्थित लोकांचे आभार मानून सभा संपत असे. त्यानंतर लोकांच्या बरोबर गावातून फेरफटका मारला जायचा. गावातील अंतर्गत रस्ते, सार्वजनिक दूरध्वनी, अनधिकृत वीज जोड, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, सार्वजनिक स्वच्छता याबाबत निरीक्षण करून नोंदी केल्या जायच्या, आवश्यकता वाटल्यास लोकांना प्रश्न विचारले जायचे.

गावातून फिरून आल्यानंतर पुन्हा सर्वांचे आभार मानून पुढील गावाकडे प्रयाण व्हायचे.

अशा प्रकारे क्षेत्रकार्यामधून प्रश्नावली भरून गोळा करण्यात आलेली आकडेवारी संगणकामध्ये विंडोज एक्सेल या पॅकेजमध्ये भरण्यात आली. महाराष्ट्रातील १२ गावांच्या आकडेवारीचे संगणकाच्या मदतीने विश्लेषण करून तयार केलेल्या तक्त्यांचा वापर अहवालामध्ये करण्यात आला.

❑❑❑

## ❖ अभ्यास करताना आलेल्या अडचणी ❖

१. एन.सी.ए.ई.आर. ने तालुक्यातील गावे निवडताना मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली होती. मात्र ही मागदर्शक तत्वे पाळणे सर्वच तालुक्यातून शक्य झाले नाही.

(अ) तालुक्यातील सर्वात जास्त लांबीच्या रस्त्याचे चार भाग पाडून त्यातून प्रत्येकी ६ गावे निवडायची होती.

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील सर्वात जास्त लांबीचा रस्ता सिरोंचा ते पातागुडम हा ६४ किमी लांबीचा होता. पहिल्या ३१ किमी अंतराच्या टप्प्यात एकूण २४ गावे होती तर पुढच्या ३४ किमीच्या अंतरामध्ये जंगल प्रदेश असल्याने केवळ ४ गावे होती.

(ब) कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील गावे दाट वस्तीची होती. या गावातून सुमारे ७००० पेक्षा जास्त लोकसंख्या होती. त्यामुळे तालुक्यातील सर्वात मोठ्या लांबीच्या रस्त्यावर असलेल्या १६ गावांमधूनच माहिती घेता आली. (सर्वेक्षणात ५००० पेक्षा कमी लोकवस्ती असलेल्या गावातून माहिती घ्यायची होती) कमीत कमी २० गावांची माहिती गोळा करणे आवश्यक असल्याने उरलेली चार गावे दुसऱ्या रस्त्यावरची घ्यावी लागली.

२. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा व एटापल्ली या तालुक्यांमधून आदिवासी बहुसंख्येने आढळतात. सकाळी लवकर उठून न्याहारी करून जंगलामध्ये शिकारीला अथवा जंगल उत्पादने गोळा करायला आदिवासी लोक जात असल्याने गावात सभेसाठी १५-२० माणसे मिळणे अवघड व्हायचे.

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वेक्षण ऑक्टोबर महिन्यात करण्यात आले. त्यावेळेस शेतीची कामे ऐन बहरात होती त्यामुळे काही गावातून हिंडून जरी लोकांना गोळा केले तरी आकडा दहाच्या पुढे जात नसे.

३. एकूण घरे, लोकसंख्या याबद्दलची माहिती ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नव्हती. तालुका पातळीवर तहसिलदार कार्यालयाकडे २००१ सालच्या जनगणनेची माहिती उपलब्ध होती परंतु अधिकृतपणे माहिती जाहीर न करण्यात आल्याने तेथून देखील माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे लोकसंख्येची माहिती गावच्या सभेतच लोकांकडून घेण्यात आली.

४. काही गावांमधून अनधिकृत वीज जोडाच्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आला त्यावेळेस गैरसमजातून गावातील दोन गटांमध्ये जोरदार वादावादी झाली.

❑❑❑

# ❖ क्षेत्रकार्य निरीक्षणे ❖

## १. कोल्हापूर जिल्हा

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व हातकणंगले या दोन तालुक्यातून माहिती गोळा करण्यात आली. हातकणंगले तालुका पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे प्रातिनिधीक रूप म्हणता येईल तर चंदगड तालुका कोकण विभागाशी जवळीक साधणारा, जिल्ह्यातल्या इतर तालुक्यांच्या मानाने मागासलेला.

हातकणंगले तालुक्यातील मुख्य पिके म्हणजे ऊस, ज्वारी, भुईमूग. चंदगड तालुक्यात पाऊस जास्त पडत असल्याने ऊस व भुईमूगाच्या जोडीला भात व रताळे ही पिके घेतली जातात. या तालुक्यातील शेती माल जवळच असलेल्या बेळगावच्या बाजारपेठेतच पाठवला जातो. त्यामुळे तालुक्यातील लोकांचा कोल्हापूरपेक्षा बेळगावशीच जास्त संपर्क आहे.

जिल्ह्यातील गावांमधून दूध उत्पादनाचा व्यवसायदेखील मोठ्या प्रमाणावर चालतो.

### रस्ते व वाहतूक

कोल्हापूर जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीय महामार्ग अत्यंत चांगल्या स्थितीत असल्याचे आढळून आले. जिल्ह्यातून मुंबई-बंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग (क्रमांक ४) जातो. सर्वेक्षित गावांपैकी चंदगड तालुक्यातील काही गावे वगळता बाकी सर्व गावे डांबरी रस्त्याने राज्य महामार्गाशी जोडलेली असल्याचे दिसले.

गावाला जोडणाऱ्या बाह्य रस्त्यांचा दर्जा समाधानकारक असल्याचे, त्यावर फारसे खड्डे नसल्याचे संशोधन गटाने प्रत्यक्ष पाहिले, लोकांनीदेखील त्याबद्दल समाधान व्यक्त केले.

बऱ्याच गावांच्या आतील अंतर्गत रस्ते १०-१५ वर्षापूर्वीच डांबरी झाले असल्याचे लोकांनी सांगितले. मात्र देखभाल व दुरुस्तीसाठी अनुदान उपलब्ध न झाल्याने सध्या या रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. जागोजागी खड्डे पडले असून पावसाळ्यामध्ये पाणी साठते.

चंदगड तालुक्यातील कर्नाटक राज्याच्या सीमेलगतच्या गावांमध्ये अंतर्गत तसेच बाह्य रस्ते विकसित झाले नसल्याचे अभ्यास पहाणीत दिसून आले. ही गावे एकदम शेवटच्या टोकाला वसलेली असल्याने सरकारी अधिकारी व लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करतात असे या गावातील लोकांनी सांगितले.

लोकांना प्रवासासाठी एस.टी., बस, जीप किंवा स्थानिक भाषेतील 'वडाप', मॅटाडोर, सहा आसनी रिक्षा यासारखे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. खेडेगावातील अनेक जण मोटारसायकलींचा देखील वापर करताना दिसतात. मालवाहतूक मुख्यत्वे ट्रॅक्टर अथवा टेंपोमधून केली जाते.

## वीज

सर्वेक्षित गावांमधून वीज पुरवठा नियमितपणे सुरु असल्याचे दिसून आले. मात्र आठवड्यातून तीन दिवस आठ तास याप्रमाणे भारनियमन केले जाते.त्याशिवाय वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. लोकांनी चुकीच्या वीज देयकांबद्दल मात्र तक्रारी केल्या त्यामध्ये मीटर रिडिंग न घेता वीज देयक पाठवणे, कमी वीज वापरली जात असताना जास्त रकमेचे वीज देयक भरायला सांगणे वगैरे गोष्टींचा समावेश होता. येथील लोकांनी तीन ऐवजी एकच दिवस भारनियमन करण्याची सूचना केली.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनतेची वीज देयक भरण्याची ऐपत असल्याने बहुतेकांनी अधिकृतपणे वीज जोड घेतला होता. चोरून वीज वापरणाऱ्या लोकांची संख्या अत्यल्प.

## दूरध्वनी

सर्वेक्षणादरम्यान गावांमधून सार्वजनिक दूरध्वनी फारसे आढळून आले नाहीत आणि ज्या गावातून सार्वजनिक दूरध्वनी होते ते बव्हंशी बंद अवस्थेतच असल्याचे दिसले.

खाजगी दूरध्वनींच्याबाबत मात्र जिल्ह्याने आघाडी घेतल्याचे दिसते. सर्व गावातून खाजगी दूरध्वनी असल्याचे पहायला मिळाले. दूरसंचार खात्याने नविन जोडासाठी भरावी लागणारी अनामत रक्कम दोन हजार रुपयांवरून पाचशे रूपयांपर्यंत खाली आणल्याने अनेक लोकांनी नविन दूरध्वनी जोड घेतले. दूरध्वनी सेवा सुरळीतपणे चालू असल्याचे अनेक गावातून चर्चेदरम्यान सांगण्यात आले.

सर्वेक्षणानिमित्त प्रवास करत असताना बी.एस.एन.एल. (भारत संचार निगम लिमिटेड) मार्फत भूमिगत केबल टाकण्याचे काम चालू असल्याचे बघायला मिळाले.

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता

अनेक गावातून नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पिण्याचे पाणी पुरवण्यात येत असल्याचे दिसून आले. गावात पाणीपुरवठा योजना आहे हे दुरुनच पाण्याची साठवण टाकी बघून ओळखता येत असे. या पाणीपुरवठा योजनादेखील १०-१५ वर्षापूर्वीच झालेल्या आहेत. मात्र गावांची लोकसंख्या वाढल्याने आता अधिक क्षमतेच्या पाणीपुरवठा योजनांची गरज भासू लागली आहे.

जिल्ह्यातील काही गावांना पंचगंगा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. या नदीचे पाणी प्रदुषित होत असल्याने अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असल्याची तक्रार लोकांनी केली.

कोल्हापूर जिल्ह्यात ग्रामीण भागातून संडासांचा वापरदेखील मोठ्या प्रमाणावर होत आहे.

एकंदरीत पहाता कोल्हापूर जिल्ह्यामध्ये चारही क्षेत्रांमध्ये अनेक सुधारणा झाल्या असल्याचे दिसून येते. ऊस, भुईमूग, रताळे यासारख्या नगदी पिकांमुळे ग्रामीण भागात आलेली सुबत्ता, सहकार क्षेत्रामध्ये झालेली प्रगती, शिक्षणाचा वाढलेला स्तर, मुंबई व पुणे यासारख्या महानगरांशी असलेला संबंध, राजकीय जागरूकता या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणजे आज दिसत असलेली जिल्ह्याची प्रगती.

## २. गडचिरोली जिल्हा

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा व एटापल्ली या दोन तालुक्यातून सर्वेक्षणाद्वारे माहिती गोळा करण्यात आली. सिरोंचा हा तालुका आंध्रप्रदेशला लागून असल्याने तेथे तेलगू संस्कृतीचा प्रभाव फार मोठा आहे. तालुक्यातील लोकांचे नातलग आंध्र प्रदेशातच जास्ती. जवळची बाजारपेठ मंचेरिअल (आंध्र प्रदेश). एटापल्ली तालुक्याचा पूर्व भाग छत्तीसगडला लागून आहे.

या दोन्ही तालुक्यात आदिवासींची संख्या जास्त आहे. माडिया, माडिया गोंड, राजगोंड वगैरे जमातीचे लोक रहातात. पावसाळ्यात शेती करणे तर वर्षाच्या उरलेल्या काळात शिकार करणे, नदीतील मासेमारी, जंगल उत्पादने गोळा करणे हाच उद्योग. येथे बराचसा भूभाग जंगलाने व्यापलेला आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यात शेजारच्या आंध्रप्रदेशातून नक्षलवाद्यांनी शिरकाव केला आहे.

उन्हाळ्याच्या हंगामात तेंदूपत्ता गोळा करणे हा एक महत्त्वाचा व्यवसाय. त्यातून आदिवासींना रोख पैसे मिळतात. एप्रिल-मे महिन्यात हंगामामध्ये ठेकेदार येऊन तेंदूपत्ता विकत घेतात. ५-६ वर्षांपूर्वी दर हजारी ४० रुपये असा दर होता. ठेकेदारांकडून आदिवासींचे शोषण केले जात असे. भाव वाढवण्याची मागणी करूनही दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे चिडून नक्षलवाद्यांनी दोन ठेकेदारांची हत्या केली त्यामुळे तेंदुपत्ताचे भाव वाढवण्यात आले. हे भाव वाढत जाऊन आता दर हजारी १४० रुपये असा झाला आहे.

एक माणूस दिवसभरात सहा-सात हजार पाने गोळा करतो. कुटुंबातील चार जणांनी ७-८ दिवस पाने गोळा केल्यास साधारणपणे २५,०००-३०,००० रुपये मिळतात. हीच काय ती आदिवासींची रोख कमाई. वर्षभर त्यावरच गुजराण करावी लागते. नक्षलवादामुळे आदिवासींना झालेला हा एकमेव फायदा असे म्हणता येईल.

येथील आदिवासी टोला (पाडे/वाडी) दूरदूर वसलेले आहेत. त्यामुळे येथे ग्रुप ग्रामपंचायतीच आढळून येतात. एका ग्रुप ग्रामपंचायतीतील गावे ७-८ किलोमीटरच्या परिघामध्ये वसलेली आहेत. त्यामुळे सर्वच गावांमध्ये पायाभूत सोयीसुविधा विकसित होऊ शकलेल्या नाहीत.

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी गावातून क्षेत्रकार्य करताना अनुभवण्यात आलेली निरीक्षणे पुढे दिली आहेत.

## रस्ते व वाहतूक

एटापल्ली ते पेंढरी हा रस्ता ६० किलोमीटरचा, येथे एस.टी. बस अथवा खासगी प्रवासी जीप सोडल्या तर दुसरे कोणतेही वाहतुकीचे साधन उपलब्ध नाही. रस्त्यावरून तुरळक प्रमाणात वाहतूक. एटापल्ली-पेंढरी रस्त्याच्या १० किलोमीटरचा भाग बी. आर. ओ. (बॉर्डर रोडस् ऑर्गनायझेशन) या संस्थेने बांधलेला रस्ता एकदम गुळगुळीत, खड्डे विरहित, प्रवास करताना पोटातले पाणीदेखील हलणार नाही. याउलट उरलेला रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारांच्या मदतीने पूर्ण केलेला. या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले, कमी दर्जाचे साहित्य वापरून बनवलेले. दोन्ही रस्त्यांच्या बांधकामातील फरक स्पष्टपणे दिसतो जाणवतो. हा रस्ता गेल्या ८-१० वर्षातच बांधला गेला आहे.

सिरोंचा ते पातागुडम ६५ किलोमीटरचा रस्ता. त्यातील सुरुवातीचे ३१ किलोमीटर डांबरी रस्ता असरअलीपर्यंत. या रस्त्यावर जीप व एस.टी. बसेस धावतात तर पुढील ३४ किलोमीटरचा रस्ता कच्चा, धुळीचा, जंगलातून जाणारा. या रस्त्याच्या सुरुवातीचा काही भाग राष्ट्रीय महामार्ग म्हणून विकसित करण्याचे काम बी.आर.ओ. मार्फत होत आहे. हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६ नांदेड ते जगदालपूर असा जोडण्यात येत आहे.

सिरोंचा, एटापल्ली व अन्य काही तालुके नक्षलवादग्रस्त आहेत. नक्षलवाद्यांचा येथे नविन रस्ते तयार करण्यास विरोध आहे. रस्ते झाले तर पोलिसांना जंगलात असलेल्या गावांपर्यंत सुलभतेने पोहोचता येईल व त्यामुळे हालचालींवर मर्यादा पडतील म्हणून रस्ते तयार करण्यास त्यांचा विरोध आहे असे सांगण्यात आले. या विरोधामुळेच रस्त्यांचे कंत्राट घेणाऱ्या काही स्थानिक कंत्राटदारांच्या हत्या करण्यात आल्या त्यामुळे रस्त्यांचे काम करण्यास कोणी पुढे येईना. म्हणून राज्य सरकारने या भागातील काम बी.आर. ओ. कडे सोपवले अशी माहिती स्थानिक लोकांनी दिली.

मुख्य रस्ता सोडला तर अन्य कोणत्याही रस्त्यांचा विकास झाला नसल्याचे दिसून आले. गाव व मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते कच्चेच आहेत. त्यामुळे पावसाळ्यामध्ये अनेक गावांचा बाह्यजगाशी संपर्क तुटतो. निम्म्यापेक्षा जास्त गावातून वर्षातील केवळ ६-८ महिने एस.टी.बस. अथवा जीपची वाहतूक चालते. येथील लोक मुख्यत्वे पायी चालत अथवा सायकलने प्रवास करतात. एटापल्ली व सिरोंचा येथे खाजगी जीपने प्रवासी वाहतूक चालते. परंतु जीप चालकांकडून महिन्याला सुमारे ३००० रुपयाचा हप्ता पोलिस वसूल करतात. हप्ता दिला नाही तर पोलिसांकडून त्रास दिला जातो.

## वीज

एटापल्ली तालुक्यातील वडसा कला हे गाव. ८ वर्षापूर्वीच विजेचे खांब उभारून तारा खेचण्यात आल्या मात्र अजूनही वीज पुरवठा सुरु करण्यात आलेला नाही. गावचा सरपंच चिडून म्हणाला, "खांब उभारून, तारा खेचून उपयोग काय? आठ वर्ष झाली तरी आम्ही अंधारातच बसलेलो आहोत. एक तर वीज पुरवठा तरी सुरु करावा नाहीतर विद्युत मंडळाने खांब, तारा वगैरे काढून घेऊन जावेत. आम्हाला विजेची गरज नाही."

विद्युत मंडळाच्या कारभाराचे हे उदाहरण प्रातिनिधीकच म्हटले पाहिजे. याशिवाय सर्व गावातून चुकीच्या वीज देयकांबद्दल तक्रारी करण्यात आले.

सिरोंचा तालुक्यात जंगलामध्ये वसलेल्या गावातून तीन वर्षापूर्वीच वीज पोहोचल्याची नोंद कागदोपत्री करण्यात आली आहे. मात्र एकाही गावकऱ्याला त्याचा लाभ मिळू शकला नाही. कारण वीजवाहक तारांवर झाडे पडून तारा तुटल्या. वन विभाग झाडांच्या फांद्या कापण्यासाठी परवानगी देत नाही. त्यामुळे गावात वीज येऊनही तेथील लोक चिमणीचाच वापर करत आहेत.

म.रा.वि. मंडळ व वनखाते यांच्यामध्ये समन्वय नसल्याने आदिवासींचे नुकसान होत आहे.

याशिवाय अनेक गावातून ऐपत नसल्याने गावात वीज येऊनही अनेक आदिवासींची घरे दिव्याच्या प्रकाशाने उजळू शकलेली नाहीत.

## दूरध्वनी

गडचिरोली जिल्ह्यामध्ये मागासलेपणामुळे दूरध्वनींचे जाळे फारसे विकसित झालेले नाही. गावातून खाजगी दूरध्वनी अभावानेच आढळतात. तेथे सार्वजनिक दूरध्वनी गावांमध्ये असल्याचे दिसून येते. त्यापैकी बहुतांश बंद अवस्थेत आहेत.

पूर्वी एटापल्ली तालुक्यात काही दूरध्वनी जोड ग्रामीण भागातून होते. मात्र नक्षलवाद्यांनी लोकांच्या भावना भडकावून दूरध्वनीच्या तारा कापून टाकल्या. एटापल्ली या तालुक्याच्या ठिकाणी २५६ जोड देण्याची क्षमता असलेले नविन इलेक्ट्रॉनिक दूरध्वनी केंद्र वर्ष २००० मध्ये सुरू झाले. एप्रिल २००१ पर्यंत केवळ १०७ जोड देण्यात आले होते. खेडेगावातून १२ सार्वजनिक दूरध्वनी जीसॅट तंत्रज्ञान वापरून बसवण्यात आले होते. मात्र सर्वच्या सर्व बंद आहेत.

सिरोंचा तालुक्यात देखील एम.ए.आर.आर. तंत्रज्ञान वापरून १३ गावातून सार्वजनिक दूरध्वनी ग्रामपंचायतीमध्ये बसवण्यात आले. प्रत्येक जोड बसवण्यासाठी सुमारे १,२५,००० रुपये खर्च आला.

महिनाभर दूरध्वनी सेवा व्यवस्थित चालली. नंतर दूरध्वनी यंत्रणेसाठी वापरण्यात आलेल्या सौर पॅनेलची चोरी सर्व गावातून झाली. त्यानंतर ते दूरध्वनी तसेच पडून आहेत. पोलीस तपास चालू आहे.

आदिवासींना शिकार करण्याची फार हौस. काही गावातून खांबावरून तारा घेऊन दूरध्वनी बसवण्यात आले होते. शिकारीची हौस असलेल्या आदिवासींनी या दूरध्वनीच्या तारा कापल्या व त्यातून फासे, जाळी बनवून शिकार करण्यास सुरुवात केली.

वरील सर्व उदाहरणांवरून असे दिसते की दूरध्वनीच्या साधनांची योग्य ती काळजी न घेतल्याने सरकारचा पैसा प्रचंड प्रमाणात गुंतून राहिला ज्यापासून ना फायदा झाला सरकारला ना लोकांना.

सर्वेक्षणादरम्यान आदिवासी भागातील लोकांशी बोलताना असे जाणवले की दूरध्वनी ही त्यांच्या दृष्टीने अजिबात प्राधान्य देण्याजोगी गोष्ट नाही. त्यांच्या जीवन शैलीसाठी त्याची आवश्यकताही नाही.

क्षेत्रकार्य करताना राज्य महामार्गाच्या कडेने दूरध्वनीसाठी भूमिगत केबल टाकण्याचे काम भारत संचार निगम लिमिटेड तर्फे चालू असल्याचे बघायला मिळाले.

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता

गडचिरोली जिल्ह्यात बोटावर मोजण्याइतक्या गावातून नळपाणीपुरवठा योजना पहायला मिळाल्या. बहुतांश गावातून हातपंप व विहिरी हेच पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत. उन्हाळ्यामध्ये विहिरी आटत असल्याने लांबून पाणी आणावे लागत असल्याचे चित्र काही गावातून पहायला मिळाले.

सांडपाण्यासाठी गटारे, संडास यासारख्या गोष्टी अपवादानेच पहायला मिळाल्या.

क्षेत्रकार्याच्या एकंदरित अनुभवावरून असे वाटते की पायाभूत सोयीसुविधांच्या बाबतीत गडचिरोली जिल्हा अतिमागास आहे. आर्थिक व सामाजिक मागासलेपण, शिक्षणाचा अभाव, बाह्य जगताशी असलेला मर्यादित संपर्क, आदिवासींचा बुजरेपणा, राजकीय नेतृत्वाची उदासीनता, नक्षलवादाचा प्रभाव या सर्व घटकांचा एकत्रित परिपाक म्हणजे जिल्ह्याचे मागासलेपण.

क्षेत्रकार्यात केलेल्या निरीक्षणांच्या जोडीला सर्वेक्षणातून गोळा करण्यात आलेली पायाभूत सोयीसुविधांबाबतची आकडेवारी पाहिली म्हणजे गडचिरोली जिल्ह्याचे मागासलेपण व कोल्हापूर जिल्ह्याचे पुढारलेपण ठळकपणे पुढे येईल.

❑❑❑

# ❖ महाराष्ट्र : अभ्यास पाहणीचे निष्कर्ष ❖

महाराष्ट्रामधून कोल्हापूर व गडचिरोली या दोन जिल्ह्यांमधून माहिती गोळा केली गेली. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा व एटापल्ली या दोन तालुक्यातील ४७, तर कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व हातकणंगले या तालुक्यातील ४५ अशा एकूण ९२ गावांमधून प्राथमिक माहिती घेण्यात आली. या पाहणीतून जे निष्कर्ष ठळकपणे पुढे आले त्याचा तुलनात्मक गोषवारा पुढीलप्रमाणे :

## लोकसंख्या

तक्ता क्र.१ : जिल्हावार अभ्यासण्यात आलेली लोकसंख्या

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| एकूण अभ्यासलेली लोकसंख्या | ३०,४९३ | ८१,०६८ | १,११,५६१ |
| पुरुष | १५,२५३ | ४२,६९५ | ५७,९४८ |
| % | ५०% | ५२.७% | ५१.९% |
| स्त्रिया | १५२४० | ३८,३७३ | ५३,६१३ |
| % | ५०% | ४७.३% | ४८.१% |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित गावांमधून अभ्यासण्यात आलेली लोकसंख्या दर्शविली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील गावे दाट लोकसंख्येची आहेत. या जिल्ह्यामध्ये एका मोठ्या गावठाणातच घरे बांधण्याकडे लोकांचा कल दिसतो. येथे एकत्र कुटुंब पद्धती दिसते. गडचिरोली जिल्ह्यामध्ये जंगलभाग मोठ्या प्रमाणात आहे. येथील वस्ती विखुरलेल्या स्वरुपात असते. एका गावामध्ये फारच थोडी घरे असतात तसेच आदिवासींमध्ये विभक्त कुटुंब पद्धती असल्याने येथील गावे विरळ वस्तीची आहेत. म्हणूनच कोल्हापूरमध्ये ४५ गावातून ८१,०६८ एवढी लोकसंख्या तर गडचिरोलीमधल्या ४७ गावांमधून केवळ ३०,४९३ एवढीच लोकसंख्या असल्याचे आढळले.

### तक्ता क्र.२ : गावाची सरासरी लोकसंख्या

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| गावाची सरासरी लोकसंख्या | ६४८ | १८०१ | १२१२ |
| पुरुष | ३२४ | ९४८ | ६२९ |
| % | ५०% | ५२.७% | ५१.९% |
| स्त्रिया | ३२४ | ८५२ | ५८२ |
| % | ५०% | ४७.३% | ४८.१% |

तक्ता क्र. २ मध्ये सर्वेक्षित गावांची सरासरी लोकसंख्या दिलेली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील गावाची सरासरी लोकसंख्या ६४८ तर कोल्हापूरमध्ये १८०१, म्हणजे जवळजवळ तिप्पट आहे. गडचिरोली जिल्ह्याचा बराचसा भाग जंगलाने व्यापलेला आहे तसेच तेथे छोट्या छोट्या टोलांमधून (पाडा/वस्ती) लोक रहात असल्याने गावांची सरासरी लोकसंख्या कमी असल्याचे आढळते.

महाराष्ट्र राज्यासाठीची गावाची सरासरी लोकसंख्या सुमारे १२१२ एवढी आहे.

### तक्ता क्र.३ : अनुसूचित जातींची लोकसंख्या

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| एकूण अभ्यासलेली लोकसंख्या | ३०,४९३ | ८१,०६८ | १,११,५६१ |
| अनुसूचित जातींची लोकसंख्या | ४,२८६ | ११,९९५ | १६,२८१ |
| पुरुष | २,१३५ | ६,३५४ | ८,४८९ |
| स्त्रिया | २,१५१ | ५,६४१ | ७,७९२ |
| गावातील सरासरी अनुसूचित जातींची लोकसंख्या | ९१ | २६६ | १७६ |
| अनुसूचित जातींची टक्केवारी | १४.०५% | १४.७९% | १४.५०% |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित केलेल्या गावांमधील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येचा तपशील दिला आहे. विदर्भातील गडचिरोली व पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील गावांमधून अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण जवळजवळ सारखेच म्हणजे सुमारे १४.५% आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील गावामध्ये सरासरी ९१ लोक तर कोल्हापूरमध्ये सरासरी २६६ लोक अनुसूचित जातीचे असल्याचे पहायला मिळाले.

**तक्ता क्र.४ : अनुसूचित जमातींची (आदिवासी) लोकसंख्या**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| एकूण अभ्यासलेली लोकसंख्या | ३०,४९३ | ८१,०६८ | १,११,५६१ |
| अनुसूचित जमातींची लोकसंख्या | १२,८७० | १०० | १२,९७० |
| पुरुष | ६,४९८ | ५२ | ६,५५० |
| स्त्रिया | ६,३७२ | ४८ | ६,४२० |
| गावातील सरासरी अनुसूचित जमातीची लोकसंख्या | २७४ | २ | १४१ |
| अनुसूचित जमातीची टक्केवारी | ४२.२% | ०.१% | ११.६% |

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आदिवासी केवळ २ गावातून आढळले व ते कातकरी जमातीचे होते. या जिल्ह्यामध्ये आदिवासींचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे केवळ ०.१% एवढे आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये माडिया, माडिया गोंड या जमाती ग्रामीण भागातून बहुसंख्येने आढळतात. म्हणूनच सर्वेक्षित गावांमधून ४२.२% एवढी आदिवासी लोकसंख्या असल्याचे आपल्याला दिसते.

तक्ता क्र.५ : गावातील घर संख्या व स्थलांतर

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| गावातील सरासरी घरे | १२२ | २६५ | १९२ |
| स्थलांतर | ३ | १८ | १० |

वरील तक्त्यावरून स्पष्टपणे दिसते की कोल्हापूर जिल्ह्यातील गावांचा आकार गडचिरोली जिल्ह्यातील गावांच्या आकारापेक्षा मोठा आहे. सर्वसाधारणपणे एकत्र कुटुंब पद्धती आढळणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील गावातून सरासरी २६५ घरे आढळली तर विभुक्त कुटुंब पद्धती असणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यामध्ये एका गावातून सरासरी १२२ घरे आढळली.

प्रश्नावलीमध्ये गावामधून किती लोकांनी कुटुंब कबिला गावातच ठेवून नोकरी धंद्यानिमित्त एकट्याने स्थलांतर केले आहे असा प्रश्न विचारण्यात आला होता.

महाराष्ट्रातल्या आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या अतिमागास अशा आदिवासी बहुल गडचिरोली जिल्ह्यातून अत्यंत कमी स्थलांतर झालेले दिसते. पावसाळी शेती व जंगल उत्पादनावर स्वतःची मुख्यत्वे गुजराण करणाऱ्या या जिल्ह्यामध्ये प्रत्येक गावातून सरासरी तीनच लोकांनी स्थलांतर केल्याचे दिसले. हे स्थलांतर मुख्यत्वे जवळ असलेल्या आंध्र प्रदेशातल्या मोठ्या शहरातून होते.

कोल्हापूर जिल्हा हा महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या पुढारलेला जिल्हा मानला जातो. या जिल्ह्यामध्ये रस्ते, रेल्वे तसेच दळणवळण यंत्रणांचा पूर्ण विकास झाला आहे. या जिल्ह्यामधून स्थलांतराचे प्रमाण देखील अधिक आहे. सर्वेक्षणामध्ये असे दिसून आले की कोल्हापूर जिल्ह्यातून एका गावातून सरासरी १८ लोकांनी नोकरी धंद्यासाठी पुणे मुंबईसारख्या महानगरात स्थलांतर केले आहे.

महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर असे दिसते की एका गावामध्ये सरासरी १९२ घरे आहेत तर सरासरी दहा लोक नोकरी धंद्यासाठी मोठ्या शहराकडे स्थलांतर करतात.

## रस्ते व वाहतूक क्षेत्र

स्वातंत्र्यानंतरच्या ५४ वर्षामध्ये गडचिरोली व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांची रस्ते व वाहतूक क्षेत्रात कशा पद्धतीने वाढ झाली आहे, कोणकोणत्या सोयी झाल्या आहेत, अजून कुठंवर टप्पा गाठायचा आहे ते आपण आता पाहू.

या क्षेत्रामध्ये गावातील व गावाबाहेरचे रस्ते, त्यांची अवस्था, प्रवासासाठी उपलब्ध असणारी साधने, त्यासाठी येणारा खर्च, दुरावस्थेची कारणे, करावयाच्या उपाययोजना आदि गोष्टींवर प्रश्न विचारून गावातील लोकांकडून माहिती घेण्यात आली. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे -

**तक्ता क्र. ६ : राष्ट्रीय व राज्य महामार्गापासूनचे सरासरी अंतर**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| राज्य महामार्गापासूनचे अंतर किमी | २८.७ | ३.१ | १६.२ |
| राष्ट्रीय महामार्गापासूनचे अंतर किमी | १९२.६ | २१.० | १०८.७ |

महाराष्ट्राच्या अगदी एका टोकाला असलेल्या गडचिरोली जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय व राज्य महामार्गांचे जाळे सर्वदूर पसरलेले दिसत नाही. या जिल्ह्याच्या सीमेला लागूनच छत्तीसगड व आंध्रप्रदेश ही राज्ये असल्याने रस्ते विकासावर काही मर्यादा पडल्याचे दिसते. गडचिरोली जिल्ह्यातील सर्वेक्षित गावांपासून राज्यमहामार्ग सरासरी २८.७ किमी अंतरावर होता तर राष्ट्रीय महामार्ग १९२.६ किमी अंतरावर होता. जिल्ह्याचा विकास खुंटित होण्याचे हे देखील महत्त्वाचे कारण आहे. नक्षलवादाचा प्रभाव असल्याने देखील रस्ते विकासावर मर्यादा आल्या आहेत.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात मात्र रस्त्यांचे जाळे सर्वदूर पसरलेले दिसते. जिल्ह्यामधून मुंबई-बंगलोर हा राष्ट्रीय महामार्ग जात असल्याने जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यास हातभार लागत आहे. या जिल्ह्यामध्ये सर्वेक्षित गावांपासून राज्य महामार्ग सरासरी केवळ ३.१ किमी. वर तर राष्ट्रीय महामार्ग गावापासून सरासरी २१ किमी अंतरावर होता.

महाराष्ट्र राज्याची आकडेवारी पाहिली असता असे दिसते की गावापासून राज्यमहामार्ग सरासरी १६.२ किमी तर राष्ट्रीय महामार्ग सरासरी १०८.७ किमी दूर आहे.

तक्ता क्र.७ : गावात ये-जा करणारे दैनंदिन प्रवासी

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| दैनंदिन प्रवासी नसलेली गावे | १७ | ० | १७ |
| १ ते ५ व्यक्ती | २३ | २ | २५ |
| ६ ते १० व्यक्ती | १ | ७ | ८ |
| ११ ते २०व्यक्ती | ४ | ८ | १२ |
| २१ ते ३० व्यक्ती | १ | ११ | १२ |
| ३१ ते ५० व्यक्ती | ० | ४ | ४ |
| ५१ पेक्षा जास्त व्यक्ती | १ | १३ | १४ |
| **सरासरी दैनंदिन प्रवासी** | **५** | **७४** | **३९** |

खेडेगावामधील किती लोक गावामधून दररोज ये-जा करतात व रस्त्यांचा वापर करतात ही माहिती मिळवण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ४७ पैकी १७ गावातून दररोज नियमितपणे गावातून प्रवास करणारे लोक आढळले नाहीत. गावातून सरासरी केवळ ५ प्रवासी गावातून दररोज नियमितपणे येत जात असल्याचे दिसले. जिल्ह्यामध्ये फारसे उद्योगधंदे नसल्याने, बाहेरच्या जगाशी फारसा संपर्क नसल्याने दैनंदिन प्रवाशांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामध्येदेखील शिक्षक व अन्य सरकारी सेवकांचा भरणाच अधिक.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एका गावातून सरासरी ७४ व्यक्ती आपल्या दैनंदिन कामासाठी नियमितपणे ये-जा करताना दिसले. यामध्ये शिक्षक, सरकारी सेवकांबरोबरच कारखान्यातील कामगार, दूधवाले, दुसऱ्या गावच्या शाळेत शिकणारे विद्यार्थी व इतरांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात सरासरी एका गावातून ३९ लोक आपल्या दैनंदिन कामासाठी नियमितपणे ये-जा करताना दिसतात.

तक्ता क्र. ८ : सरासरी किमान व कमाल प्रवास खर्च (रुपये /किमी)

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| किमान प्रवास खर्च रु. | ०.८२ | ०.५५ | ०.६९ |
| कमाल प्रवास खर्च रु. | ०.९८ | ०.६३ | ०.८१ |

वरील तक्त्यामध्ये प्रति किलोमीटर प्रवासासाठी येणारा किमान व कमाल खर्च दर्शवला आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये खाजगी वाहतूक नगण्यच. लोकांना एस.टी. बसवरच अवलंबून रहावे लागते. या जिल्ह्यात प्रवासासाठी थोडे जास्तच पैसे मोजावे लागतात. एक किलोमीटर प्रवासासाठी सरासरी किमान ८२ पैसे तर कमाल ९८ पैसे एवढा खर्च येतो.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये खाजगी व सरकारी वाहतूक सेवांचा विकास झाला आहे. लोकांना वाहतुकीसाठी निरनिराळे पर्याय उपलब्ध आहेत व स्पर्धेमुळे इथल्या प्रवासी वाहतुकीचे दरही कमी असल्याचे दिसते. या जिल्ह्यात एक किलोमीटरसाठी सरासरी किमान ५५ पैसे तर कमाल ६३ पैसे एवढाच खर्च येतो.

महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास इथे प्रवास खर्चासाठी एक किलोमीटरला किमान ६९ पैसे तर कमाल ८१ पैसे मोजावे लागतात.

तक्ता क्र. ९ : सरासरी किमान व कमाल माल वाहतूक (रुपये /किमी/क्विंटल)

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| किमान मालवाहतूक खर्च रु. | १२.३९ | २.५१ | ७.५५ |
| कमाल मालवाहतूक खर्च रु. | १५.०५ | २.५१ | ८.९२ |

प्रवास खर्चाप्रमाणेच गडचिरोली जिल्ह्यामध्ये माल वाहतूक देखील बरीच महाग आहे. अविकसित रस्ते व दूरवर असलेली बाजारपेठ याचा हा परिणाम असल्याचे दिसते.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये एक क्विंटल माल एक किलोमीटर वाहून नेण्यासाठी किमान १२.४० रुपये तर कमाल १५ रुपये खर्च येतो. तर कोल्हापूरमध्ये त्यासाठी केवळ २.५० रुपये मोजावे लागतात. कोल्हापूर

जिल्ह्यामध्ये रस्ते व वाहतूक क्षेत्राचा विकास झाला आहे त्याचबरोबर शेतीमालासाठी जवळच बाजारपेठ उपलब्ध असल्याने माल वाहतुकीचा खर्च कमी येत असल्याचे दिसते.

महाराष्ट्रासाठी सरासरी काढली असता एक क्विंटल माल एक किलोमीटर वाहून नेण्यासाठी किमान ७.५५ रुपये तर कमाल ८.९२ रुपये खर्च येतो.

**तक्ता क्र. १० : प्रवासासाठीची वाहतुकीची साधने**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| पायी चालणे | ४६ | ३९ | ८५ |
| % | ९७.९ % | ८६.७ % | ९२.४ % |
| एस.टी.बस | २४ | ३६ | ६० |
| % | ५१.१% | ८०% | ६५.२% |
| बैलगाडी | २२ | १ | २३ |
| % | ४६.८ % | २.२ % | २५ % |
| जीप/टेंपो/रिक्षा | ९ | १२ | २१ |
| % | १९.२ % | २६.७ % | २२.८ % |
| खाजगी बस | २ | २ | ४ |
| % | ४.३ % | ४.४ % | ४.४ % |
| मोटार सायकल | ० | १४ | १४ |
| % | ० % | ३१.१ % | १५.२ % |

सर्वेक्षित जिल्ह्यांमध्ये प्रवासांसाठी कोणकोणत्या वाहतूक साधनांचा वापर केला जातो तो वरील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये बहुतांश लोक (९८%) पायीच प्रवास करतात. एस. टी. बस (५१%) व बैलगाडी (४७%) या साधनांचा देखील मोठ्या प्रमाणावर केला जातो. जीप अथवा रिक्षांचा वापर केवळ १९% गावातूनच होत असल्याचे दिसले. गडचिरोली मध्ये बहुतांश खेडी मुख्य रस्त्यापासून बरीच आत असल्याने वाहतुकीच्या साधनांचा कमी प्रमाणात वापर होताना दिसतो.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ८७% लोक अजूनही पायीच प्रवास करतात. मात्र त्याचबरोबर ८०% लोक एस. टी. बसने देखील प्रवास करतात. ३१% लोक मोटारसायकलने तर २७% लोक जीपसारख्या खाजगी सुविधांचा वापर करतात. आधुनिकीकरणामुळे प्रवासासाठी बैलगाडीचा वापर करण्याची प्रथा मागे पडल्याचे दिसते.

महाराष्ट्रासाठी पुढीलप्रमाणे प्रवासी साधनांचा वापर होतो. पायी चालणे (९२%) एस. टी. बस (६५%) बैलगाडी (२५%) , जीप/रिक्षा (२३%), मोटारसायकल (१५%)

**तक्ता क्र. ११ : गावातील अंतर्गत रस्त्यांचा दर्जा**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| अतिशय चांगला दर्जा | १ | १ | २ |
| % | २.१% | २.१ % | २.१ % |
| कच्चा परंतु चांगला दर्जा | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| कच्चा व कमी दर्जा | २८ | २२ | ५० |
| % | ५९.६% | ४८.९% | ५४.४% |
| पक्का पण खराब दर्जा | ० | ५ | ५ |
| % | ०% | ११.१% | ५.४% |
| अतिशय खराब दर्जा | १५ | १३ | २८ |
| % | ३१.९% | २८.९% | ३०.४% |
| अर्धा कच्चा,अर्धा पक्का | १ | १६ | १७ |
| % | २.१% | ३५.६% | १८.५% |

प्रश्नावलीमध्ये गावातील अंतर्गत रस्त्यांच्या स्थितीबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. लोकांनी दिलेली उत्तरे वरील तक्त्यात दर्शवली आहेत.

ही बाब लक्षणीय आहे की दोन्ही जिल्ह्यातील प्रत्येकी केवळ एका गावातून अंतर्गत रस्त्यांचा दर्जा चांगला असल्याचे सांगण्यात आले.

गडचिरोली जिल्ह्यातील २८ गावातून (६०%) असे सांगण्यात आले की गावाच्या आतील रस्ते कच्चे असून अत्यंत कमी दर्जाचे आहेत. तर आणखी १५ गावातून (३२%) असे सांगण्यात आले की गावाच्या आतील रस्ते अत्यंत खराब दर्जाचे आहेत. पावसाळ्यामध्ये तर रस्त्यावरून चालणेदेखील अवघड होऊन बसते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्येदेखील अशीच परिस्थिती आढळली. २२ गावातून (४९%) असे सांगण्यात आले की अंतर्गत रस्ता कच्चा व अत्यंत कमी दर्जाचा आहे, तर हा रस्ता अतिशय खराब असल्याचे १३ गावातून (२९%) सांगण्यात आले. ५ गावातून (११%) असे आढळून आले की गावाच्या आतले रस्ते जरी १०-१५ वर्षापूर्वी डांबरी करण्यात आले होते तरी योग्य देखभाल न केल्याने रस्ते उखडून त्याची आता दुरावस्था झाली आहे.

महाराष्ट्राचा विचार केल्यास ५० गावातून (५४%) कच्चे व अत्यंत कमी दर्जाचे तर २८ गावातून (३०%) अतिशय खराब झालेले अंतर्गत रस्ते आढळले. केवळ २ गावातून (२%) अंतर्गत रस्ते अतिशय चांगल्या दर्जाचे असल्याचे सांगण्यात आले.

**तक्ता क्र. १२ : अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| ग्रामपंचायत | ३७ | ४५ | ८२ |
| % | ७८.७% | १००% | ८९.१% |
| पी. डब्ल्यु. डी. | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.२% |
| गावातील लोक स्वत: | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| देखभाल व दुरुस्ती नाही | ६ | ० | ६ |
| % | १२.८% | ०% | ६.५% |

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सर्व गावातून अंतर्गत रस्त्यांची देखभाल ग्रामपंचायत करत असल्याचे सांगण्यात आले. तर गडचिरोलीमध्ये विविध प्रकारची उत्तरे मिळाली - ग्रामपंचायत (७९%) , पी. डब्लु. डी. (६%), गावकरी (२%) सहा गावातून अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती होत नसल्याचे सांगण्यात आले.

गावातील अंतर्गत रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी प्रामुख्याने ग्रामपंचायतीची असते. मात्र पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने देखभाल होऊ शकत नाही, याबद्दल बहुतांश गावातून अगतिकता तसेच संताप व्यक्त करण्यात आला.

**तक्ता क्र. १३ : गावाला जोडणाऱ्या रस्त्यांचा दर्जा**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| चांगल्या दर्जाचा पक्का रस्ता | ५ | ६ | ११ |
| % | १०.६% | १३.३% | १०.१% |
| खराब दर्जाचा पक्का रस्ता | १ | ४ | ५ |
| % | २.१% | ८.९% | ५.४% |
| अर्धा पक्का अर्धा कच्चा रस्ता | ३ | ११ | १४ |
| % | ६.४% | २४.४% | १५.२% |
| खराब दर्जाचा कच्चा रस्ता | १९ | १८ | ३७ |
| % | ४०.४% | ४०.०% | ४०.२% |
| अति खराब दर्जाचा रस्ता | २१ | १३ | ३४ |
| % | ४४.७% | २८.९% | ३७% |
| दुरुस्ती न झालेला रस्ता | ० | २ | २ |
| % | ०.०% | ४.४% | २.२% |

अंतर्गत रस्त्यांच्या स्थितीबरोबरच गावाला जोडणाऱ्या बाहेरच्या रस्त्यांबाबत माहिती घेण्यात आली. अंतर्गत रस्त्यांप्रमाणेच या रस्त्यांची अवस्था देखील फारशी चांगली नव्हती.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये १९ गावांमधून (४०%) बाहेरचे रस्ते कच्चे व खराब दर्जाचे होते. एका गावामध्ये (२%) पक्का परंतु खराब दर्जाचा रस्ता होता. २१ गावांमधून (४५%) बाहेरच्या रस्त्याचे अति

खराब दर्जाचा रस्ता असे वर्णन करण्यात आले. पावसाळ्यामध्ये हा रस्ता वापरणे कठीण होते अशी तक्रार लोकांनी केली. केवळ ५ गावातून (११%) गावाला जोडणारा रस्ता पक्का व चांगल्या दर्जाचा असल्याचे लोकांनी सांगितले.

अशा प्रकारचे गावाला जोडणारे रस्ते असल्यावर पावसाळ्यात गावांचा संपर्क तुटत असेल तर आश्चर्य वाटायला नको.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पण थोड्याफार फरकाने हेच चित्र पहायला मिळते. १८ गावातून (४०%) बाह्य रस्ता हा कच्चा असून खराब दर्जाचा असल्याचे सांगितले तर १३ गावातून (२९%) बाह्य रस्त्याचे अति खराब रस्ता असे वर्णन करण्यात आले. ४ गावातून (९%) बाह्य रस्ता जरी पक्का डांबरी असला तरी खराब असल्याचे सांगण्यात आले. केवळ ६ गावातून (१३%) बाह्य रस्त्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले, बाह्य रस्ता हा पक्का डांबरी असून त्याचा दर्जा अतिशय चांगला असल्याचे गावकऱ्यांनी संशोधन गटाला सांगितले.

महाराष्ट्राच्या गावातील बाह्य रस्त्यांचे वर्गीकरण थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल - खराब दर्जाचा कच्चा रस्ता (४०%), अति खराब दर्जाचा रस्ता (३७%) अर्धा कच्चा व अर्धा पक्का रस्ता (१५%) तर चांगल्या दर्जाचा पक्का रस्ता (१०%).

**तक्ता क्र. १४ : गावाला जोडणाऱ्या रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती**

| **जिल्हा** | **गडचिरोली** | **कोल्हापूर** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| पी. डब्ल्यु. डी. | ३४ | २६ | ५९ |
| % | ७२.५% | ५७.८% | ६५.२% |
| जिल्हा परिषद | ७ | २२ | २९ |
| % | १४.९% | ४८.९% | ३१.५% |
| गावातील लोक स्वत: | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.३% |
| वनखाते | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.३% |
| कोणीच देखभाल करत नाही | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.३% |

गावाला जोडणाऱ्या बाह्यरस्त्यांची दुरुस्ती व देखभाल राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे केली जाते असे बहुतांश गावातून सांगण्यात आले - गडचिरोली (७३%), कोल्हापूर (५८%) काही गावांमधून जिल्हा परिषदेमार्फत देखभाल होत असल्याचे लोकांनी सांगितले - गडचिरोली (१५%), कोल्हापूर (४९%).

गडचिरोली मधून ३ गावातून (६%) वनखाते तर तेवढ्याच गावातून गावातील लोक स्वत:च बाह्य रस्त्यांची देखभाल करत असल्याचे सांगितले. रस्त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सरकारची असली तरी गडचिरोलीमधील ३ गावांनी कोणीच देखभाल करत नसल्याचे परखड मत व्यक्त केले.

गावातील अंतर्गत व बाह्य रस्त्यांची स्थिती कशी आहे हे पाहिल्यानंतर आता रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे कोणकोणती आहेत, लोकांनी त्याबद्दल काय सांगितले आहे ते जरा पाहू.

**तक्ता क्र. १५ : रस्त्यांच्या दुरावस्थेची कारणे**

| **जिल्हा** | **गडचिरोली** | **कोल्हापूर** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| राज्य सरकारचे दुर्लक्ष | ३२ | १८ | ५० |
| % | ६८.१% | ४०% | ५४.४% |
| अपुरा निधी | ९ | ३७ | ४६ |
| % | १९.२% | ८२.२% | ५०% |
| भ्रष्टाचार | ७ | ६ | १३ |
| % | १४.९% | १३.३% | १४.१% |
| देखभालीचा अभाव | २ | १२ | १४ |
| % | ४.३% | २६.७% | १५.२% |
| दर्जेदार काम केले जात नाही | ० | ७ | ७ |
| % | ०% | १५.६% | ७.६% |
| कामाचा निधी दुसरीकडे वळवला जातो | १ | १ | २ |
| % | २.१% | २.२% | २.२% |
| राजकीय पाठिंबा नाही | २ | ० | २ |
| % | ४.३% | ०% | २.२% |
| कंत्राटदाराकडून काम | २ | ० | २ |
| % | ४.३% | ०% | २.२% |
| माहित नाही | ५ | ० | ५ |
| % | १०.७% | ०% | ५.४% |

रस्त्यांच्या असलेल्या दुरावस्थेची लोकांनी अनेक कारणे सांगितली. गडचिरोली जिल्ह्यामध्ये सांगण्यात आलेली मुख्य कारणे म्हणजे - रस्ते विकासाकडे होत असलेले राज्य शासनाचे दुर्लक्ष (६८%), रस्ते विकसनासाठी मिळणारा अपुरा निधी (१९%), रस्ते बांधकामात होणारा भ्रष्टाचार (१५%). शासकीय कर्मचारी व कंत्राटदार यांचं साटंलोटं असतं त्यामुळे भ्रष्टाचार होतो व त्याचा परिणाम कमी दर्जाचे साहित्य वापरून रस्ते बांधण्यात होतो. असे रस्ते टिकत नाहीत व वारंवार दुरुस्ती करावी लागते, असे प्रातिनिधीक मत अनेक गावातून ऐकायला मिळाले.

इतर कारणांमध्ये - रस्त्यांची देखभाल योग्य प्रकारे होत नाही (४%) राज्य शासन स्वत: रस्ते न बांधता कमी दर्जाचे साहित्य वापरणाऱ्या कंत्राटदाराला काम देते (४%) रस्त्यांसाठी आलेला निधी अन्य कामांसाठी वळवला जातो (२%).

५ गावांमधून (११%) लोकांकडून रस्त्यांच्या दुरावस्थेच्या कारणांबद्दल माहित नाही असे उत्तर मिळाले. ही सर्व गावे मुख्य रस्त्यापासून दूर, अत्यंत मागासलेली अशी होती. बाहेरच्या जगताशी फारसा संबंध नसल्याने हे आदिवासी लोक विकास कामांबद्दल चर्चा देखील करू शकत नाहीत असे संशोधन गटास आढळून आले.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये या चित्रामध्ये थोडाफार फरक पडलेला दिसतो. इथल्या गावकऱ्यांनी रस्त्यांच्या दुरावस्थेची सांगितलेली कारणे पुढीलप्रमाणे - रस्ते विकसनासाठी मिळणारा अपुरा निधी (८२%), रस्ते विकासाकडे होत असलेले राज्य शासनाचे दुर्लक्ष (४०%), रस्त्यांच्या सुयोग्य देखभालीचा अभाव (२७%), रस्ता तयार करताना दर्जेदार काम केले जात नाही (१६%), रस्त्याच्या कामात होत असलेला भ्रष्टाचार (१३%).

आपण महाराष्ट्राची सरासरी आकडेवारी पाहिली असता पुढील चित्र आपल्यासमोर येते - रस्ते बांधणीत राज्य शासनाचे होत असलेले दुर्लक्ष (५४%), रस्ते विकसनासाठी अपुरा निधी (५०%), भ्रष्टाचार (१४%), रस्त्यांची अपुरी देखभाल (१५%) रस्ते तयार करताना दर्जेदार काम केले जात नाही (७%).

रस्त्यांच्या दुरावस्थेवर मात करून गावातील अंतर्गत व बाह्य रस्ते तयार करण्यासाठी व त्याची योग्य देखभाल व दुरुस्ती व्हावी म्हणून खेडेगावातील लोकांनी काही उपाययोजना देखील सुचवल्या आहेत. या सूचना पुढील तक्त्यामध्ये दिल्या आहेत.

तक्ता क्र. १६ : गावातील रस्ता सुधारणेसाठी उपाययोजना (ग्रामस्थांच्या सूचना)

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| निधी उपलब्ध केला पाहिजे | १७ | ३८ | ५५ |
| % | ३७.२% | ८४.४% | ५९.८% |
| चांगल्या दर्जाचे काम झाले पाहिजे | ९ | १३ | २२ |
| % | १९.२% | २८.९% | २३.९% |
| सरकारने योग्य देखभाल केली पाहिजे | १४ | ५ | १९ |
| % | २९.८% | ११.१% | २०.७% |
| निर्णय व देखरेख प्रक्रियेत लोकसहभाग | ९ | ३ | १२ |
| % | १९.१% | ६.७% | १३.०% |
| कंत्राटदाराऐवजी पी.डब्ल्यु.डी.ने काम करावे | ५ | १ | ६ |
| % | १०.६% | २.२% | ६.५% |
| चांगल्या दर्जाचे रस्ते तयार करून त्याची योग्य देखभाल | ६ | ० | ६ |
| % | १२.८% | ०% | ६.५% |
| भ्रष्टाचार दूर केला पाहिजे | २ | २ | ४ |
| % | ४.३% | ४.४% | ४.४% |
| ग्रामपंचायतीकडे काम सोपवले पाहिजे | ३ | १ | ४ |
| % | ६.४% | २.२% | ४.३% |
| लोकांना योग्य माहिती | १ | १ | २ |
| % | २.१% | २.२% | २.२% |
| कंत्राटदाराकडून कामाच्या दर्जाची हमी घेतली पाहिजे | ० | २ | २ |
| % | ०% | ४.४% | २.२% |

गडचिरोली जिल्ह्यामध्ये १७ गावातील (३६%) लोकांनी गावातील रस्त्यांच्या कामासाठी पुरेशा प्रमाणात ग्रामपंचायतीला निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. ३०% गावातील लोकांनी रस्त्याच्या होणाऱ्या कामांवर सरकारी अधिकाऱ्यांनी योग्य देखभाल केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. १९% ग्रामस्थांनी रस्ते बांधणीच्या निर्णय व देखरेख प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी लोकसहभागावर भर दिला आहे. काही गावांनी कंत्राटदारांऐवजी सार्वजनिक बांधकाम खाते (११%) व ग्रामपंचायत (६%) यांनीच रस्ते बांधावेत असे सुचवले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ८४% गावातून लोकांनी गावाच्या रस्ते बांधणीकरता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. १३ गावातून (२९%) रस्ते बांधणीचे काम चांगल्या दर्जाचे झाले पाहिजे अशी आग्रही मागणी करण्यात आली. ११% गावातून रस्ते बांधणीच्या कामावर सरकारने काटेकोरपणे देखभाल करावी अशी सूचना केली आहे. ३ गावातून (७%) रस्तेबांधणीच्या निर्णय व देखरेख प्रक्रियेत लोकसहभागाची मागणी केली आहे.

महाराष्ट्रासाठीच्या आकडेवारीचा विचार केला असता पुढील गोष्टी ठळकपणे समोर येतात - रस्ते बांधणीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करणे (६०%), चांगल्या दर्जाची रस्तेबांधणी (२४%), सरकारकडून रस्ते बांधणी कामावर काटेकोर नजर (२१%), रस्ते बांधणी निर्णय व देखरेख प्रक्रियेत लोकसहभाग (१३%). लोकांनी पारदर्शकता आणून लोकसहभाग वाढवण्यासाठी गावकऱ्यांची समिती स्थापन करून रस्तेबांधणीच्या कामात या समितीची मदत घ्यावी अशी सूचना केली. यामुळे दबाव गट तयार होऊन रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार होणार नाही व कामाचा सुयोग्य दर्जा राखला जाईल असे सांगितले.

ही गोष्ट उद्बोधक आहे की केवळ ४ गावातूनच भ्रष्टाचार दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. इतर सूचना पुढीलप्रमाणे - कंत्राटदारांपेक्षा सा. बां. विभाग किंवा ग्रामपंचायतीतर्फे रस्ते बांधणी, रस्त्याच्या कामाबद्दल लोकांना योग्य माहिती आणि कंत्राटदाराकडून कामाच्या दर्जाची हमी.

## दूरसंचार क्षेत्र

दळणवळण क्षेत्रामध्ये दूरसंचार माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. गेल्या दशकापासून भारतामध्ये दूरसंचार क्षेत्राचा झपाट्याने विकास होत आहे. खाजगीकरणामुळे या क्षेत्रातील स्पर्धा वाढली आहे. या स्पर्धेमुळे शहरी भागातील ग्राहकांना खूप फायदा झाला आहे. मात्र महाराष्ट्रातील खेडेगावांमधून दूरसंचार क्षेत्राची वर्ष २००१ मध्ये काय स्थिती होती, ग्रामीण भागात दूरसंचार क्षेत्राची कितपत प्रगती झाली आहे हे पाहण्यासाठी पुढील माहिती उपयुक्त ठरेल.

**तक्ता क्र. १७ : गावातील सार्वजनिक दूरध्वनी उपलब्धता**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| उपलब्ध नाही | ३३ | २२ | ५५ |
| १ दूरध्वनी जोड | १३ | २० | ३३ |
| २-४ जोड | १ | ३ | ४ |
| **सरासरी सार्वजनिक दूरध्वनी उपलब्धता** | ०.३ | ०.६ | ०.४५ |

ग्रामीण भागातून बहुतांश गावातून उपलब्ध असलेली सार्वजनिक दूरध्वनी सेवा म्हणजे ग्रामपंचायतीच्या कार्यालयातील दूरध्वनी किंवा हमरस्त्याच्या गावांमध्ये असलेले सार्वजनिक एस. टी. डी. बूथ.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये सुमारे ७०% गावातून सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध नाही. १३ गावातून १ दूरध्वनी उपलब्ध होता तो ग्रामपंचायतीचा. तर एका गावात ग्रामपंचायतीचा व एस. टी. डी. बूथ असे दोन दूरध्वनी आढळले. म्हणजेच एका गावातून सरासरी ०.३ सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध होते अथवा ३ गावांमागे एक सार्वजनिक दूरध्वनी.

सार्वजनिक दूरध्वनींच्या बाबतीत कोल्हापूर जिल्ह्यातली परिस्थिती बरी म्हणायची. इथे ५०% गावातून सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध नव्हता तर ४४% गावातून एक दूरध्वनी उपलब्ध होता. २ पेक्षा जास्त सार्वजनिक दूरध्वनी केवळ ३ गावातून आढळले. सरासरी एका गावातून ०.६ सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध होते अथवा ३ गावांमागे दोन सार्वजनिक दूरध्वनी.

महाराष्ट्राच्या गावातून सरासरी ०.४५ सार्वजनिक दूरध्वनी उपलब्ध होते. म्हणजेच दोन गावांमध्ये एक सार्वजनिक दूरध्वनी .

**तक्ता क्र. १८ : खाजगी दूरध्वनींची उपलब्धता**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| उपलब्ध नाही | ४५ | ० | ४५ |
| १ जोड | ० | २ | २ |
| २-४ जोड | १ | १ | २ |
| ४ पेक्षा अधिक जोड | १ | ४२ | ४३ |
| **सरासरी खाजगी दूरध्वनी उपलब्धता** | ०.१९ | ४४ | २१.६ |

दूरध्वनी क्षेत्राच्या बाबतीत गडचिरोली जिल्हा अतिमागासच म्हटला पाहिजे. देशभरात दूरध्वनींचे जाळे सर्वदूर पसरत असले घरोघरी खाजगी दूरध्वनी जोड दिले जात असले तरी गडचिरोली जिल्हा मात्र त्यापासून दूरच दिसतो. या जिल्ह्यामध्ये केवळ २ गावातून दोन पेक्षा अधिक खाजगी दूरध्वनी आढळले. उरलेल्या सुमारे ९६% गावातून खाजगी दूरध्वनी नाहीच. गडचिरोलीमध्ये सरासरी खाजगी दूरध्वनींची उपलब्धता प्रत्येक गावामागे केवळ ०.१९ असल्याचे दिसते म्हणजेच दर पाच गावांमागे एक खाजगी दूरध्वनी.

गडचिरोली जिल्ह्याच्या दूरसंचार क्षेत्रातील मागासलेपणाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्ह्याचे पुढारलेपण उठून दिसते. या जिल्ह्यामधील सर्व सर्वेक्षित गावांमधून खाजगी दूरध्वनी असल्याचे आढळले. आणि त्यापैकी बहुतांश ९५% गावांमधून ४ पेक्षा अधिक खाजगी दूरध्वनी आहेत. जिल्ह्यामध्ये सरासरी खाजगी दूरध्वनींची उपलब्धता प्रत्येक गावामागे ४४ एवढी असल्याचे दिसले.

महाराष्ट्र राज्यामध्ये सरासरी खाजगी दूरध्वनींची उपलब्धता २१.६ एवढी असल्याचे दिसते.

गावामधून सार्वजनिक तसेच खाजगी दूरध्वनी किती प्रमाणात उपलब्ध आहेत हे आपण पाहिले. मात्र उपलब्ध दूरध्वनींचा वापर किती प्रमाणात केला जातो हे पहाणे निश्चितच उद्‌बोधक ठरेल.

तक्ता क्र. १९ : दूरध्वनी सेवेचा वापर

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| कोणीच उपयोग करत नाही | ४५ | ० | ४५ |
| १-१० व्यक्ती | १ | १३ | १४ |
| ११-२० व्यक्ती | १ | ११ | १२ |
| २०+ व्यक्ती | ० | २१ | २१ |
| आठवड्यातून किमान एकदा दूरध्वनी सेवेचा वापर करणाऱ्या व्यक्तींची सरासरी | ०.६३ | ४९.५ | २४.५ |

गावातील किती व्यक्ती आठवड्यातून किमान एकदा तरी बाहेर दूरध्वनी करतात असा प्रश्न ग्रामीण भागातील लोकांना विचारण्यात आला होता. यामध्ये तालुका, बाजाराच्या अथवा अन्य ठिकाणहून दूरध्वनी करणाऱ्यांचादेखील समावेश होता. ग्रामीण भागातील लोक किती प्रमाणात दूरध्वनीचा वापर करतात हे पहाण्याचा मुख्य हेतू या प्रश्नामागे होता.

वरील तक्त्यावरून असे दिसते की गडचिरोली जिल्ह्यामध्ये दूरध्वनीचा वापर करणारे लोक अत्यंत थोडे आहेत. असे लोक केवळ २(४%) गावातूनच आढळून आले. तर आठवड्यातून किमान एकदा दूरध्वनी सेवेचा वापर करणाऱ्या व्यक्तींची सरासरी केवळ ०.६ एवढीच होती.

कोल्हापूर जिल्ह्यामधील सर्व खेडेगावातून दूरध्वनीचा वापर करणारे लोक असल्याचे दिसते. आठवड्यातून किमान एकदा तरी दूरध्वनी सेवेचा वापर करणाऱ्या व्यक्तींची सरासरी ५० एवढी असल्याचे बघायला मिळते.

महाराष्ट्राचे चित्र बघितले असता आठवड्यातून किमान एकदा दूरध्वनी सेवेचा वापर करणाऱ्या व्यक्तींची सरासरी २५ इतकी आहे.

तक्ता क्र. २० : संभाषणासाठी द्यावे लागणारे सरासरी मूल्य

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| द्यावे लागणारे सरासरी मूल्य रुपये | - | २.४० | २.४० |

गडचिरोली जिल्ह्यामध्ये दूरध्वनी सेवेचा वापर नगण्य असल्याने संभाषणासाठी द्याव्या लागणाऱ्या सरासरी मूल्याबद्दल माहिती मिळवणे शक्य झाले नाही. यामागे दोन कारणे आहेत - जवळजवळ सर्व गावामधून सार्वजनिक दूरध्वनी नादुरुस्त होते व जेथे खाजगी दूरध्वनी उपलब्ध होते तेथे लोकांकडून पैसे घेतले जात नव्हते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये लोकांना तीन मिनिटांच्या स्थानिक संभाषणासाठी सरासरी २.४० रुपये एवढे मूल्य द्यावे लागते.

तक्ता क्र.२१ : मोबाईल दूरध्वनीबद्दलची माहिती

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| माहित नाही | ४४ | ४० | ८४ |
| % | ९३.६% | ८८.९% | ९१.३% |
| फक्त नाव ऐकले आहे | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| टी.व्ही.वर पाहिले आहे | १ | १ | २ |
| % | २.१% | २.२% | २.२% |
| गावातील काही लोकांना माहित आहे | १ | ४ | ५ |
| % | २.१% | ८.९% | ५.४% |

खेडेगावातील बहुतांश लोकांना मोबाईल दूरध्वनीबद्दल माहिती नसल्याचे आढळले.

गडचिरोली जिल्ह्यात ९४% लोकांना अजिबात माहिती नव्हती तर प्रत्येकी २% गावातील लोकांनी नाव ऐकल्याचे व टीव्हीवर पाहिल्याचे सांगितले.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ८९% लोकांना मोबाईल दूरध्वनीबद्दल माहिती नव्हती तर ९% गावातील काही लोकांना माहिती असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्रामध्ये ९१% गावातील लोकांना मोबाईल दूरध्वनीबद्दल माहिती नाही तर ५% गावातील लोकांना थोडीफार माहिती आहे.

**तक्ता क्र.२२ : इंटरनेटबद्दलची माहिती**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| माहित नाही | ४६ | ४४ | ९० |
| % | ९७.९% | ९७.८% | ९७.८% |
| टी.व्ही.वर पाहिले आहे | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| गावातील काही लोकांना माहित आहे | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |

गडचिरोलीमध्ये जवळजवळ ९८% गावातील लोक इंटरनेट तंत्रज्ञानाबद्दल अनभिज्ञ आहेत. केवळ २% गावातील काही लोकांनी टीव्हीवर पाहिल्याचे सांगितले.

इंटरनेटबद्दलची माहिती कोल्हापूर जिल्ह्यातील लोकांपर्यंत पण पोहोचले नसल्याचे दिसते.

तक्ता क्रमांक २३ मध्ये दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे दिली आहेत.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये दूरध्वनी अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. दूरध्वनीबद्दल माहिती असलेले व वापर करणारे अत्यल्प प्रमाणात आहेत. त्यामुळेच ५५% गावातून लोकांना दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे देता आली नाहीत. यामागे अति मागासलेपण हेच मुख्य कारण आहे.

## तक्ता क्र.२३ : दूरध्वनी सेवेच्या सद्यस्थितीची कारणे

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| दूरसंचार खात्याचे दुर्लक्ष | ११ | १२ | २३ |
| % | २३.४% | २६.७% | २५.०% |
| देखभाल नाही | २ | ४ | ६ |
| % | ४.३% | ८.९% | ६.५% |
| आवश्यक निधीचा अभाव | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| भ्रष्टाचार | १ | २ | ३ |
| % | २.१% | ४.४% | ३.३% |
| कमी क्षमतेचे केंद्र | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| कमी मनुष्यबळ | ० | २ | २ |
| % | ०% | ४.४% | २.२% |
| दूरध्वनी साहित्याची चोरी | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.३% |
| इतर कारणे | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| काहीही सांगू शकत नाही | २६ | ० | २६ |
| % | ५५.३% | ०% | २३.९% |
| गैर लागू | ४ | २ | ६ |
| % | ८.५% | ४.४% | ६.५% |
| सेवेबद्दल समाधानी | ० | ३० | ३० |
| % | ०% | ६६.७% | २७.६% |

२३% गावातून दूरसंचार खात्याचे दुर्लक्ष होत असल्याने खेडेगावातील दूरसंचार सेवा चांगली नाही असे ऐकायला मिळाले.

दूरसंचार सेवेच्या दु:स्थितीची इतर कारणे पुढीलप्रमाणे - योग्य देखभाल नाही (४%), आवश्यक निधीचा अभाव (२%), भ्रष्टाचार (२%). ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक दूरध्वनी बसवलेल्या ३ गावांमधून असे सांगण्यात आले की बॅटरी भारित करण्यासाठी लागणारे सौर तक्ते गावातून चोरून नेण्यात आले त्यामुळे दूरध्वनी चालत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मात्र वेगळेच चित्र बघायला मिळते. येथे सर्व खेडेगावातून दूरध्वनी पोहोचला आहे. ३० गावातील (६७%) ग्रामस्थांनी सांगितले की गावातील दूरध्वनी यंत्रणा व्यवस्थित चालत असून आपण या सेवेबद्दल समाधानी आहोत.

जी गावे दूरसंचार खात्याच्या सेवेबद्दल समाधानी नाहीत त्यांनी पुढील कारणे दिली - खात्याचे दुर्लक्ष (२७%) नियमितपणे देखभाल केली जात नाही (९%) आणि भ्रष्टाचार (४%).

जर आपण महाराष्ट्रासाठीची आकडेवारी बघितली तर असे दिसते की २८% गावे दूरध्वनी सेवेबद्दल समाधानी आहेत. २५% गावातून, दूरसंचार खात्याचे दुर्लक्ष होत असल्याने दूरध्वनी सेवा विस्कळितपणे सुरू असल्याचे सांगण्यात आले. इतर दिलेली कारणे पुढीलप्रमाणे - देखभाल नाही (७%), भ्रष्टाचार (३%), अपुरे मनुष्यबळ (२%), कमी क्षमतेचे केंद्र (१%), निधीचा अभाव (१%).

दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांनी अनेक उपाययोजना सुचवल्या आहेत त्या तक्ता क्रमांक २४ मध्ये मांडल्या आहेत.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये बहुतांश गावातून सार्वजनिक वा खाजगी दूरध्वनी नाहीतच. म्हणून २३ गावातून (४९%) लोकांनी गावामध्ये सार्वजनिक दूरध्वनी बसवण्याची प्रामुख्याने मागणी केली आहे. हा दूरध्वनी सर्व लोकांना सोयीचे होईल अशा ठिकाणी बसवावा अशी सूचना त्यांनी केली आहे. ३४% गावातील लोकांनी सेवेमध्ये सुधारणा व्हावी अशी मागणी केली आहे. मात्र ही सुधारणा कशाप्रकारची असावी याबद्दल काही भाष्य केलेले नाही. इतर सूचनांमध्ये - भूमिगत वाहिन्या टाकणे (४%), सुरक्षित ठिकाणी दूरध्वनी जेणेकरून चोरी होणार नाही (४%), माहिती नसल्याने ११ गावातून (२३%) सुधारणांविषयी सूचना मिळाल्या नाहीत.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये बहुतांश गावातून दूरध्वनी सेवा व्यवस्थित चालत असल्याने ३३ गावातून (७३%) कोणत्याही सूचना सुधारणेसाठी मिळाल्या नाहीत. इतर सूचना अशा - सेवेमध्ये सुधारणा (९%), योग्य देखभाल (९%), मनुष्यबळ वाढवणे (७%), भ्रष्टाचाराला आळा (४%).

तक्ता क्र.२४ : दूरध्वनी सेवा सुधारण्यासाठी उपाययोजना (ग्रामस्थांच्या सूचना)

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| सेवेमध्ये योग्य सुधारणा | १६ | ४ | २० |
| % | ३४.१% | ८.९% | २१.७% |
| योग्य देखभाल | १ | ४ | ५ |
| % | २.१% | ८.९% | ५.४% |
| मनुष्यबळ वाढवणे | ० | ३ | ३ |
| % | ०% | ६.७% | ३.३% |
| भ्रष्टाचाराला आळा | ० | २ | २ |
| % | ०% | ४.४% | २.२% |
| भूमिगत दूरध्वनी वाहिन्या | २ | ० | २ |
| % | ४.३% | ०% | २.२% |
| सुरक्षित ठिकाणी दूरध्वनी | २ | ० | २ |
| % | ४.३% | ०% | २.२% |
| कर्मचारी वर्गाची गावात उपलब्धता | १ | २ | ३ |
| % | २.१% | ४.४% | ३.३% |
| नविन दूरध्वनी केंद्र उभारणे | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| ग्रामपंचायतीत सार्व. दूरध्वनी बसवणे | २३ | ० | २३ |
| % | ४८.९% | ०% | २५% |
| उपाय न सुचविलेली गावे | ११ | ३३ | ४४ |
| % | २३.४% | ७३.३% | ४७.८% |

## विद्युत क्षेत्र

वीज हा एक आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासामध्ये विद्युत क्षेत्राने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विजेवर चालणाऱ्या निरनिराळ्या घरगुती उपकरणांमुळे विजेची मागणी सतत वाढत चालली आहे. राज्य सरकारच्या आकडेवारीप्रमाणे १९९९ साली राज्यातील सर्व गावांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे.

गेल्या दोन तीन वर्षांमध्ये मागणीच्या प्रमाणात वीज उत्पादन होत नसल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. दाभोळ वीज प्रकल्पाचा घोळ तर सर्वश्रुतच आहे. दिवसेंदिवस वीज टंचाई व त्यामुळे भारनियमन वाढतच आहे. या पार्श्वभूमीवर वर्ष २००१ महाराष्ट्रातल्या खेडेगावातील परिस्थिती समजून घेणे खचितच मनोरंजक ठरेल.

**तक्ता क्र.२५ : घरगुती वीज जोड टक्केवारी**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| (अ) मीटर सहित वीज जोड | २३.८% | ७७.३% | ६०.२% |
| (ब) मीटर विना वीज जोड | ९.०% | ४.५% | ५.८% |
| वीज जोड असलेली एकूण घरे | ३२.८% | ८१.८% | ६६% |
| वीज जोड नसलेली एकूण घरे | ६७.२% | १८.२% | ३४% |

सर्वेक्षित गावांमधील घरांमधून किती प्रमाणात वीज उपलब्ध आहे हे वरील तक्त्यात दाखविले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागात केवळ २४% घरातून मीटरसहित वीज जोड असल्याचे दिसून आले. तर ९% लोक दुसऱ्याच्या घरातून अथवा वीजवाहक तारांवर आकडा टाकून वीज घेत असल्याचे आढळले. अशाप्रकारे फक्त ३३% घरातूनच वीज पोहोचली आहे. तर बहुतांश म्हणजे ६७% घरे अंधारातच असून रॉकेलचे दिवे, चिमण्या, कंदिल यांचा वापर रात्रीच्या वेळेस लोक करत असल्याचे पहायला मिळाले.

जंगलामध्ये वसलेली दुर्गम गावे, गरीबी असल्याने क्रयशक्तीचा अभाव, म.रा.वि.मं. चा गैरकारभार यामुळे अजूनही दोन तृतीयांश घरातून वीज पोहोचायची आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये त्यामानाने फारच चांगली स्थिती आहे. ७७% घरातून मीटरसहित वीज जोड आहेत तर केवळ ५% घरामध्ये इतरांकडून अथवा आकडा टाकून वीज घेतली जाते. सुमारे १८% घरांमध्ये अजूनही वीज पोचली नसून लोक अजूनही चिमणी, कंदिल या साधनांचा वापर करताना दिसतात.

महाराष्ट्र राज्यात ६०% लोकांकडे मीटरसहित वीजजोड आहेत तर ६% लोक मीटर न घेता वीजेचा वापर करतात. ३४% लोक मात्र अजूनही अंधारातच आहेत.

**तक्ता क्र.२६ : गावातील किरकोळ धंद्यासाठी वीज वापर**

| **जिल्हा** | **गडचिरोली** | **कोल्हापूर** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| गैरलागू | ५ | ० | ५ |
| % | १०.६% | ०% | ५.४% |
| किरकोळ धंदा नसलेली गावे | ३६ | ३ | ३९ |
| % | ७६.६% | ६.६% | ४२.४% |
| १ उद्योग | ५ | ९ | १४ |
| % | १०.६% | २०% | १५.२% |
| २-४ उद्योग | ० | २८ | २८ |
| % | ०% | ६२.२% | ३०.४% |
| ४ पेक्षा अधिक उद्योग | १ | ५ | ६ |
| % | २.१% | ११.१% | ६.५% |
| **सरासरी किरकोळ धंद्यासाठी वीज जोड/गाव** | ०.२ | २.४ | १.३ |

गावामध्ये पिठाची गिरणी, इस्त्री दुकान व अन्य छोट्या धंद्यासाठी किती प्रमाणात विजेचा वापर होतो याबद्दल प्रश्न विचारला होता.

गडचिरोली जिल्ह्यातील सर्वेक्षित ४७ गावांपैकी ५ गावांमध्ये तर अजूनही वीज पोचलेली नाही अथवा वीज पोहोचूनही काही कारणाने वीजपुरवठा खंडित झाला आहे. उरलेल्या सुमारे ७७% गावांमध्ये वीजेवर चालणारा कोणत्याही प्रकारचा किरकोळ धंदा गावात नाही. केवळ ६ गावांमधून किरकोळ उद्योगांसाठी वीज वापर होत असल्याचे पहायला मिळाले. गडचिरोली जिल्ह्यामध्ये विजेवर चालणारे सरासरी ०.२ किरकोळ उद्योग आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये केवळ ३ गावांमधून विजेवर चालणारा कोणत्याही प्रकारचा किरकोळ धंदा नाही. बाकीच्या सर्व गावातून पिठाची गिरणी, इस्त्रीचे दुकान, वेल्डिंगचे दुकान यासारखे किरकोळ धंदे आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील गावांमधून विजेवर चालणारे सरासरी २.४ किरकोळ उद्योग आहेत.

महाराष्ट्रामध्ये गावामधून विजेवर चालणाऱ्या किरकोळ धंद्यांची सरासरी १.३ इतकी आहे.

**तक्ता क्र.२७ : औद्योगिक कारणांसाठी विजेचा वापर**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| गैरलागू | ५ | ० | ५ |
| % | १०.६% | ०% | ५.४% |
| होय | ० | ४ | ४ |
| % | ०% | ८.९% | ४.३% |
| नाही | ४२ | ४१ | ८३ |
| % | ८९.४% | ९१.१% | ९०.२% |

वरील तक्त्यामध्ये गावाच्या हद्दीत असलेल्या लघु उद्योगांसाठी किती प्रमाणात विजेचा वापर होतो ते दाखवले आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ५ गावात तर वीज उपलब्ध नाहीच. उरलेल्या गावातूनदेखील कोणत्याही प्रकारचा लघु उद्योग नाही. तर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ४ गावातून (९%) विजेवर चालणारे लघुउद्योग असल्याचे पहायला मिळाले.

तक्ता क्र.२८ : विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| पंखा | २१ | १८ | ३९ |
| % | ४४.७% | ४०% | ४२.४% |
| दूरदर्शन संच | १५ | ४४ | ५९ |
| % | ३१.९% | ९७.८% | ६४.१% |
| टेपरेकॉर्डर | १२ | ४२ | ५४ |
| % | २५.५% | ९३.३% | ५८.७% |
| मिक्सर | १ | १३ | १४ |
| % | २.१% | २८.९% | १५.२% |
| फ्रीज | ३ | २ | ५ |
| % | ६.४% | ४.४% | ५.४% |
| कूलर | ९ | ० | ९ |
| % | १९.५% | ०% | ९.८% |
| रेडिओ | ० | ३० | ३० |
| % | ०% | ६६.७% | ३२.६% |
| इस्त्री | ० | ७ | ७ |
| % | ०% | १५.६% | ७.६% |

वरील तक्त्यामध्ये किती गावांमधून विजेवर चालणाऱ्या घरगुती उपकरणांचा वापर केला जातो ते दर्शविले आहे. ही आकडेवारी घरगुती उपकरणे असलेल्या घरांची टक्केवारी दर्शवत नसून केवळ किती गावांपर्यंत या वस्तू पोहोचल्या आहेत हे सांगते.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये सर्व गावांमध्ये कागदोपत्री वीज पोहोचली असली तरी केवळ ३३% घरांमधूनच वीज असल्याचे आपण बघितलेच. त्यामुळे फारच थोड्या गावातून विजेवर चालणाऱ्या

उपकरणांचा वापर होत असल्याचे बघायला मिळाले. त्यातल्या त्यात वापरली जाणारी उपकरणे म्हणजे पंखा (४५%), दूरदर्शन (३२%), टेपरेकॉर्डर (२६%) आणि कूलर (२०%).

कोल्हापूर जिल्ह्यात बहुतांश घरातून वीज पोहोचली असल्याने व लोकांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने निराळे चित्र पहायला मिळते.

गावातून आढळलेल्या विविध उपकरणांची टक्केवारी पुढीलप्रमाणे - दूरदर्शन (९८%), टेपरेकॉर्डर (९३%), रेडिओ (६७%), पंखा (४०%), मिक्सर (२९%). यामध्ये मुख्यत्वे वीजेवर चालणाऱ्या करमणुकीच्या साधनांचा समावेश असल्याचे दिसते.

खेडेगावातून किती लघुउद्योग गावाच्या हद्दीत आहेत हे आपण पाहिलेच. आता हे उद्योग वीज पुरवठा खंडित झाल्यास विजेच्या मागणीची पूर्तता कशी करतात ते पाहू.

**तक्ता क्र.२९ : विजेच्या मागणीची पूर्तता**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| गैरलागू | ४७ | ४१ | ८८ |
| % | १००% | ९१.१% | ९५.६% |
| जनरेटरचा वापर | ० | २ | २ |
| % | ०% | ४.४% | २.२% |
| काहीही करत नाहीत | ० | २ | २ |
| % | ०% | ४.४% | २.२% |

गडचिरोली जिल्ह्यामध्ये कोणत्याही प्रकारचा लघुउद्योग नाही. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये केवळ ४ गावातून विजेवर चालणारे लघुउद्योग आहेत. यापैकी २ लघुउद्योग वीज पुरवठा खंडित झाल्यास डिझेल जनरेटरचा वापर उत्पादन चालू ठेवण्यासाठी करतात. तर दोन लघुउद्योग जनरेटरचा वापर न करता केवळ राज्य विद्युत मंडळावर अवलंबून असतात. मात्र या भागात विजेचे फारसे भारनियमन केले जात नाही असे सांगितले गेले. लघुउद्योग असल्याने वीज पुरवठा सहसा खंडित केला जात नाही.

**तक्ता क्र.३० : दर दिवसाची विजेची उपलब्धता**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| गैरलागू | ५ | ० | ५ |
| १-१० तास | १२ | ८ | २० |
| १०-१५ तास | ५ | ५ | १० |
| १५ तासापेक्षा अधिक | २५ | ३२ | ५७ |
| **सरासरी उपलब्ध वीज तासामध्ये** | १४.८ | १७.२ | १६ |

दिवसातून २४ तासापैकी किती तास वीज उपलब्ध असते असा प्रश्न गावातील लोकांना विचारण्यात आला होता. ही माहिती वरील तक्त्यात दिली आहे.

गडचिरोली जिह्यामध्ये २५% गावे अशी आहेत की जिथे १० तासापेक्षा कमी वीज उपलब्ध असते तर ५०% गावांना १५पेक्षा अधिक तास वीज मिळते. जिल्ह्यातील गावांमधून दिवसाच्या २४ तासांपैकी सरासरी १४.८ तास वीज उपलब्ध असते. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १८% गावांना दहा तासापेक्षा कमी वीज पुरवठा होतो तर ७५% गावांना १५ तासापेक्षा अधिक वीज मिळते. या जिल्ह्यामध्ये २४ तासांपैकी सरासरी १७.२ तास वीज गावांमध्ये उपलब्ध असते.

महाराष्ट्र राज्यातील खेडेगावातून २४ तासापैकी सरासरी १६ तास वीज उपलब्ध असते.

**तक्ता क्र.३१ : आठवड्यातील विजेची उपलब्धता**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| गैरलागू | ५ | ० | ५ |
| १ दिवस | ० | ० | ० |
| २-४ दिवस | २८ | ७ | ३५ |
| ५ दिवस किंवा त्यापेक्षा अधिक | १४ | ३८ | ५२ |
| **आठवड्यात सरासरी उपलब्ध वीज** | ३.४ | ५ | ४.२ |

आठवड्यातील सात दिवसांपैकी किती दिवस वीज उपलब्ध असते हे वरील तक्त्यात दर्शविले आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ६०% गावातून, २-४ दिवसच वीज मिळते, बाकी सर्व दिवस गायब असते असे सांगण्यात आले. आठवड्यातून सरासरी ३.४ दिवस म्हणजे केवळ निम्मे दिवसच गावकऱ्यांना वीज उपलब्ध होत असल्याचे आढळते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये परिस्थिती त्यामानाने चांगली असून सुमारे ३८ गावातून (८४%) पाच किंवा त्यापेक्षा अधिक दिवस वीज उपलब्ध असल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली. आठवड्यातून सरासरी ५ दिवस वीज उपलब्ध असते.

महाराष्ट्रामध्ये आठवड्यातून सरासरी ४.२ दिवस वीज उपलब्ध असते.

**तक्ता क्र.३२ : पावसाळ्यात विजेची उपलब्धता**

| **जिल्हा** | **गडचिरोली** | **कोल्हापूर** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| गैरलागू | ५ | ० | ५ |
| ० दिवस | १३ | ० | १३ |
| १-१० दिवस | १ | ० | १ |
| ११-२० दिवस | ५ | १ | ६ |
| २१-३० दिवस | ११ | ० | ११ |
| ३१-४० दिवस | ० | १ | १ |
| ४१-५० दिवस | १ | १० | ११ |
| ५१ दिवसापेक्षा अधिक | ११ | ३३ | ४४ |
| **सरासरी उपलब्ध वीज** | **२९.२** | **६६.८** | **४६** |

प्रश्नावलीमध्ये पावसाळ्यात तीन महिन्यांपैकी (९० दिवसांपैकी) अंदाजे किती दिवस वीज उपलब्ध असते असा प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आला होता. त्याची आकडेवारी वरील तक्त्यात दिली आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये सुमारे ७५% खेड्यातून ३० पेक्षा कमी दिवस वीज उपलब्ध असते. त्यातील सुमारे २८% गावांनी पावसाळ्यामध्ये एकही दिवस गावामध्ये वीज नसल्याचे सांगितले. पाऊस व

वादळामुळे वीजवाहक तारांवर झाडांच्या फांद्या पडून वीज पुरवठा पावसाळ्याच्या सुरुवातीला खंडित होतो. मग ही दुरुस्ती पावसाळा संपल्यावरच केली जाते असे लोकांनी सांगितले. पावसाळ्यामध्ये ९० दिवसांपैकी सरासरी २९ दिवसच वीज मिळते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पावसाळ्यामध्ये वीज पुरवठा फारसा विस्कळीत होत नाही असे दिसते. तरी देखील पावसाळ्याच्या तीन महिन्यापैकी सरासरी ६७ दिवस वीज पुरवठा सुरळीत असतो.

महाराष्ट्राची सरासरी बघितली असता पावसाळ्याच्या ९० दिवसापैकी ४६ दिवस वीजपुरवठा ग्रामीण भागात चालू असल्याचे दिसते.

वरील तक्त्यांवरून असे दिसते की गडचिरोली असो वा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण भागातील खेडेगावांना वीज पुरवठा अपुऱ्या प्रमाणात होत आहे. यापुढील काळातील वीज टंचाई व भारनियमनाचा फटका ग्रामीण भागालाच बसणार आहे. त्यामुळे शेतीपंपाना होणाऱ्या वीज पुरवठ्यात कपात होऊन सामान्य शेतकरी भरडला जाणार आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी वेळीच पावले उचलणे गरजेचे आहे.

**तक्ता क्र. ३३ : वीज देयकाची रक्कम**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| रु. ५० पर्यंत | ४ | ० | ४ |
| ५१-७५ रु. | ७ | १ | ८ |
| ७६-१०० रु. | १५ | २३ | ३८ |
| १०१-१५० रु. | ६ | १९ | २५ |
| १५१-२०० रु. | ३ | १ | ४ |
| रु. २०१ पेक्षा अधिक | ७ | १ | ८ |
| **सरासरी वीज देयकाची रक्कम रुपये** | **१२९.१** | **१२१.१** | **१२५** |

गावामध्ये जे लोक मीटरसहित वीज जोड घेऊन वीज वापरतात त्यांना सरासरी किती रुपये वीज देयकापोटी दरमहा भरावे लागतात हे वरील तक्त्यामध्ये मांडले आहे.

सर्वसाधारणपणे वीज देयकाची रक्कम रु. ५० ते रु. २०० च्या दरम्यान असल्याचे आढळले.

गडचिरोली जिल्ह्यातील लोक वीज देयकापोटी दरमहा सरासरी १२९ रुपये भरत होते तर कोल्हापूर जिल्ह्यात हीच रक्कम जरा कमी म्हणजे १२१ रुपये एवढी होती.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनता सरासरी दरमहा १२५ रुपये वीजदेयकापोटी भरत आहे.

वीजदेयकासंबंधी प्रश्न विचारत असताना बहुतांश गावातील लोकांनी म.रा.वि.मं.बद्दल तक्रारी केल्या. या तक्रारीमध्ये खालील गोष्टींचा समावेश होता. मीटर रिडिंग न घेता वीज देयक देणे, वीज देयकाची रक्कम वीज वापरापेक्षा खूपच जास्त असणे, कर्मचाऱ्यांचा अरेरावीपणा, वीजदेयक थकित राहिल्यास वीज तोडणे वगैरे.

कित्येक जणांनी भरमसाठ वीज देयकांना कंटाळून स्वत:हून वीज तोडण्यास सांगून कंदिल वा चिमणीच्या प्रकाशात रहाण्याचे पसंत केल्याचे सांगितले.

**तक्ता क्र.३४ : नविन वीज जोड घेण्यासाठी लाच**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| होय | ३८ | १५ | ५३ |
| % | ८१% | ३३% | ५८% |
| नाही | ९ | ३० | ३९ |
| % | १९% | ६७% | ४२% |

वरील तक्त्यावरून म.रा.वि.मं.मध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण किती आहे ते ठळकपणे दिसून येते.

अतिमागास गडचिरोली जिल्ह्यामध्ये ८१% गावातून असे सांगण्यात आले की नविन वीज जोड घेण्यासाठी मंडळाच्या कर्मचाऱ्यांना लाच द्यावीच लागते अन्यथा काम वेळेवर केले जात नाही. भ्रष्टाचाराचे हे प्रमाण लक्षणीय आहे.

त्यामानाने कोल्हापूर जिल्ह्यात भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १५ गावातून (३३%) कर्मचारी नविन वीज जोड घेण्यासाठी लाच मागतात असे गावकऱ्यांनी सांगितले.

महाराष्ट्राचा विचार केला तर नविन वीज जोड घेण्यासाठी ५८% गावातील लोकांना लाच द्यावी लागते असे चित्र पहायला मिळते. भ्रष्टाचाराचे हे चित्र अत्यंत निराशाजनक आहे.

### तक्ता क्र.३५ : वीजजोड - लाचेची रक्कम

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| रु. ५० पर्यंत | १७ | ८ | २५ |
| ५१-७५ रु. | ० | ० | ० |
| ७६-१०० रु. | ८ | ३ | ११ |
| १०१-१५० रु. | २ | ० | २ |
| १५१-२०० रु. | ४ | २ | ६ |
| रु. २०१ पेक्षा अधिक | ३ | २ | ५ |
| **सरासरी दिलेली लाचेची रक्कम** | २०२.५ | १५६.६ | १८९.५ |

गडचिरोली व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वीज मंडळाच्या कारभारात भरपूर भ्रष्टाचार आहे हे आपण पाहिले. आता जरा किती प्रमाणात लोकांना लाच द्यावी लागते ते पाहू.

वरील तक्त्यामध्ये नविन वीजजोड घेण्यासाठी वीज मंडळाचे कर्मचारी किती लाच घेतात हे दाखवले आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये लाचेपोटी दिली गेलेली सरासरी रक्कम २०२.५० रुपये एवढी तर कोल्हापूरमध्ये सुमारे १५७ रुपये इतकी होती.

महाराष्ट्र राज्यात नविन वीज जोड घेताना वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांना सरासरी १९० रुपये द्यावे लागतात असे दिसून आले.

वीज मंडळातील भ्रष्टाचार निपटून काढल्या शिवाय वीज टंचाईवर मात करणे शक्य होणार नाही असे दिसते.

अनियमित वीज पुरवठ्याची कारणे कोणकोणती आहेत याबद्दल खेडेगावातील लोकांनी आपआपली मते मांडली आहेत त्याचा गोषवारा पुढील तक्त्यात दिला आहे.

## तक्ता क्र.३६ : वीज पुरवठा अनियमिततेची कारणे

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| म.रा.वि.मं.कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष | ११ | १३ | २४ |
| % | २३.४% | २८.९% | २६.१% |
| कमी वीज उत्पादन | ० | १७ | १७ |
| % | ०% | ३७.८% | १८.५% |
| कर्मचारी येत नाहीत | १३ | ० | १३ |
| % | २७.७% | ०% | १४.१% |
| भ्रष्टाचार | ० | १२ | १२ |
| % | ०% | २६.७% | १३% |
| जास्त वीज जोड, कमी पुरवठा | ३ | ३ | ६ |
| % | ६.४% | ६.७% | ६.५% |
| तक्रारींची दखल घेत नाहीत | २ | ४ | ६ |
| % | ४.३% | ८.९% | ६.५% |
| शहरांना व कारखान्यांना जास्त वीज पुरवठा | १ | ३ | ४ |
| % | २.१% | ६.७% | ४.४% |
| विजेच्या तारांवर झाडांच्या फांद्या पडणे | २३ | ० | २३ |
| % | ४९% | ० | २५% |
| जंगलामधील गाव | ८ | ० | ८ |
| % | १७% | ० | ८.७% |
| उपकेंद्र फार दूर आहे | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| विजेची चोरी | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| देखभाल नाही | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| उत्तर दिले नाही | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.३% |
| विजेचा योग्य पुरवठा | ० | ९ | ९ |
| % | ०% | २०% | ९.८% |

गडचिरोली जिल्ह्यामध्ये २३ गावातील (४९%) लोकांनी वीज वाहक तारांवर झाडे पडल्याने वीज पुरवठ्यात व्यत्यय येत असल्याचे सांगितले आहे. गावे जंगलात असल्यामुळे वीज पुरवठ्यात व्यत्यय येत असल्याची तक्रार १७% गावातील लोकांनी केली आहे. वीज वाहक तारांमधील दोष शोधून काढणे व नियमित वीजपुरवठा करणे या गोष्टी वीजमंडळाच्या कर्मचाऱ्यांना शक्य होत नाहीत. यापुढे जाऊन वीज पुरवठ्याबाबत तक्रार केल्यास वीज मंडळाचे कर्मचारी वेळेवर येत नाहीत अशी प्रतिक्रिया १३ गावातून (२८%) ऐकायला मिळाली. याचबरोबर राज्य विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांपासून ते खालच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण दुर्लक्ष करत असल्याची खंत सुमारे २३% गावातून व्यक्त करण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्यातील गावांमधून अनियमित वीजपुरवठ्याची खालील कारणे लोकांनी दिली - राज्य सरकारकडूनच विजेचे कमी उत्पादन होत असल्याने वीज टंचाई होत आहे (३८%), महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष (२९%). याचबरोबर ९% गावातून वीज मंडळाचे कर्मचारी तक्रारींची दखल घेत नाहीत असे सांगण्यात आले. तर तीन गावातून (७%) शहरांना व कारखान्यांना नियमित पुरवठा केला जातो तर ग्रामीण भागातून भारनियमन केले जाते, शहरी व ग्रामीण भागामध्ये जाणीवपूर्वक भेदभाव केला जातो असा वीज मंडळाविरुद्ध आरोप करण्यात आला.

बऱ्याच गावातून लोकांनी विजेच्या अनियमित पुरवठ्याबद्दल तक्रारी केल्या असल्या तरी कोल्हापूर जिल्ह्यातील ९ गावातून (२०%) लोकांनी वीजपुरवठा नियमित होत असून त्याबद्दल कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले, हे विशेषच म्हटले पाहिजे.

महाराष्ट्राचा विचार केला तर मुख्यत्वेकरून अनियमित वीज पुरवठ्याची पुढील कारणे बघायला मिळतात. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे दुर्लक्ष होत आहे (२६%), वीज उत्पादन कमी झाल्याने पुरवठ्यात व्यत्यय (१८%), तक्रार दाखल करूनही कर्मचारी येत नाहीत, (१४), म.रा.वि.मं.च्या कारभारात भ्रष्टाचार आहे (१३%). जास्त वीज जोड असून विजेचा पुरवठा मात्र कमी आहे (७%), लोकांनी केलेल्या तक्रारींची दखल घेतली जात नाही (७%).

सुमारे १०% गावांनी वीज पुरवठा योग्य प्रमाणात असल्याचे व त्याबद्दल काहीही तक्रार नसल्याचे सांगितले.

आता आपण ग्रामीण भागातील वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी ग्रामस्थांनी कोणकोणत्या उपाययोजना सुचवल्या आहेत ते पाहू.

तक्ता क्र.३७ : सुरळीत वीज पुरवठ्यासाठी उपाय योजना

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| म.रा.वि.मं.च्या कामात सुधारणा व योग्य देखरेख | ३७ | १५ | ५२ |
| % | ७८.७% | ३३.३% | ५६.५% |
| गावासाठी अधिक क्षमतेचे रोहित्र | ७ | ३ | १० |
| % | १४.९% | ६.७% | १०.९% |
| भ्रष्टाचाराला आळा | २ | ७ | ९ |
| % | ४.३% | १५.६% | ९.८% |
| वीज उत्पादनात वाढ | ० | ७ | ७ |
| % | ०% | १५.६% | ७.६% |
| वीजवाहक तारांजवळील झाडे कापणे | ६ | ० | ६ |
| % | १२.८% | ०% | ६.५% |
| वीज चोरीस आळा | १ | ३ | ४ |
| % | २.१% | ६.७% | ४.४% |
| नियमित देखभाल | ० | ३ | ३ |
| % | ०% | ६.७% | ३.३% |
| तक्रारींवर सत्वर कार्यवाही | २ | ० | २ |
| % | ४.३% | ०% | २.२% |
| वनखात्याकडून परवानगी | २ | ० | २ |
| % | ४.३% | ०% | २.२% |
| वीज वितरणात सुधारणा | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| खाजगीकरण | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| गावाला वीज पुरवठा व्हावा | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |
| विशेष सूचना न करणारी गावे | ७ | २० | २७ |
| % | १४.९% | ४४.४% | २९.४% |

गडचिरोली जिल्ह्यामध्ये बहुतांश म्हणजे ३७ गावातून (७९%) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कामात सुधारणा होणे आवश्यक असल्याचे आणि अधिकाऱ्यांनी योग्य देखरेख करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले आहे. १५% गावांनी वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा टाळण्यासाठी गावामध्ये अधिक क्षमतेचे रोहित्र बसवण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यामधील बरीचशी गावे जंगलात असल्याने झाडाच्या फांद्या वीजवाहक तारांवर पडून वारंवार खंडित होतो यासाठी १३% गावांनी नियमितपणे वीजवाहक तारांजवळील झाडे कापण्याची शिफारस केली आहे. मात्र झाडांच्या फांद्या कापायच्या तर वनखात्याची परवानगी आवश्यक असते म्हणूनच ४% गावातून त्यासाठी सूचना आली आहे. सुरळीत वीजपुरवठा चालू राहण्यासाठी वीजमंडळ व वनखाते यांच्यामध्ये समन्वय असणे अत्यंत आवश्यक आहे. सध्यातरी या समन्वयाअभावी कागदोपत्री सर्व गावातून वीज पोहोचली असली तरीदेखील जिल्ह्यातली अनेक खेडी अंधारातच आहेत.

इतर सूचना पुढीलप्रमाणे - वीज मंडळातील भ्रष्टाचाराला आळा घालणे (४%), तक्रारींवर सत्वर कार्यवाही (४%) व वीज चोरीस आळा (२%).

गडचिरोली जिल्ह्यातील काही गावे अत्यंत मागासलेली आहेत त्यामुळेच १५% गावातून वीज पुरवठा सुधारणेसाठी करावयाच्या उपाययोजनांबद्दल सूचना पुढे येऊ शकल्या नाहीत.

कोल्हापूर जिल्ह्यामधूनदेखील १५ गावातून (३३%) म.रा.वि.मंडळाच्या कामात सुधारणा होण्याची व अधिकाऱ्यांकडून योग्य देखरेखीची अपेक्षा लोकांनी व्यक्त केली आहे. सुमारे १६% गावातून वीज उत्पादनात वाढ करण्याची तसेच मंडळातील भ्रष्टाचाराला आळा घालण्याची मागणी करण्यात आली आहे. ७% गावांनी वीज यंत्रणेची नियमित देखभाल आणि वीज चोरीला आळा घालण्याची सूचना केली आहे. तसेच गावांसाठी अधिक क्षमतेचे रोहित्र बसवण्याबद्दल सुचवले आहे.

जिल्ह्यातील सुमारे २० गावांनी (४४%) कोणत्याही प्रकारच्या विशेष सूचना केलेल्या नाहीत. त्यामध्ये वीजपुरवठा नियमित असणाऱ्या गावांचाच समावेश अधिक आहे.

महाराष्ट्रासाठीच्या सूचनांचा गोषवारा पुढीलप्रमाणे - महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कामात सुधारणा व अधिकाऱ्यांद्वारे योग्य देखरेख (५७%), गावामध्ये अधिक क्षमतेचे रोहित्र बसवणे (११%), मंडळातील भ्रष्टाचारास आळा घालणे (१०%), राज्यातील वीज उत्पादन वाढवणे (८%), वीज चोरीस प्रतिबंध करणे (४%).

## पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता क्षेत्र.

सर्व लोकांना वर्षभर शुद्ध पिण्याचे पाणी प्यायला मिळणे हा त्यांचा मुलभूत हक्कच आहे. गावामध्ये सार्वजनिक स्वच्छता असेल, शुद्ध पिण्याचे पाणी सर्व ऋतुत प्यायला मिळाले तर साथीच्या आजारांची भीती अजिबात रहाणार नाही.

सर्वेक्षणाद्वारे वर्ष २००१ मध्ये ग्रामीण भागातून पिण्याच्या पाण्याची काय परिस्थिती आहे, लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी कोणकोणते स्त्रोत उपलब्ध आहेत, त्यापैकी किती चालू, किती बंद, नळ, पाणी पुरवठा योजना किती गावातून झाल्या आहेत, किती लोकांना उन्हाळ्यात पाणी खरेदी करावे लागते, किती गावातून गटारे, संडास यासारख्या सोयी आहेत, त्यांची सध्याची अवस्था काय आहे याबद्दलची माहिती ग्रामस्थांकडून घेण्यात आली. या माहितीचे तपशीलवार विवेचन पुढील तक्त्यांमधून केले आहे.

**तक्ता क्र. ३८ : पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| विहिर | ३८ | २९ | ६७ |
| % | ८०.८% | ६४.४% | ७२.८% |
| नदी | ६ | ६ | १२ |
| % | १२.८% | १३.३% | १३% |
| हातपंप | ४७ | ३४ | ८१ |
| % | १००% | ७५.५% | ८८% |
| इतर (झरा, ओहोळ, तळे वगैरे) | ३ | ५ | ८ |
| % | ६.४% | ११.१% | ८.७% |
| सार्वजनिक नळ | ५ | ३१ | ३६ |
| % | १०.६% | ६८.९% | ३९.१% |
| घरगुती नळजोड | ३ | २६ | २९ |
| % | ६.४% | ५७.५% | ३१.५% |

गडचिरोली जिल्ह्यातील सर्व सर्वेक्षित गावांमधून पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप उपलब्ध होते. त्याचबरोबर ३८ गावांमधून (८१%) लोक विहिरीवरून पण पाणी भरत होते. याशिवाय १३% गावातून नदीवरून तर ३ गावातून (६%), ओहोळ, तळे यासारख्या स्त्रोतांमधून पाणी भरले जायचे.

गडचिरोली जिल्ह्यात केवळ ५ गावातून (११%) सार्वजनिक नळ होते तर ३ गावातून (६%) घरगुती नळजोड पहायला मिळाले. नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या बाबतीतदेखील जिल्ह्याचे मागासलेपण दिसून येते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक स्त्रोत उपलब्ध असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. जिल्ह्यामध्ये ७६% गावातून हातपंप, ६४% गावातून विहिरी, १३% गावातून नदी आणि ११% गावातून इतर स्त्रोत पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध असल्याचे आढळून आले.

वरील तक्त्यावरून हे देखील स्पष्ट होते की कोल्हापूर जिल्ह्यातील गावांमधून नळाद्वारे पाणीपुरवठा देखील बऱ्याच गावातून होत आहे. ३१ गावातून (६९%) पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक नळ तर २६ गावातून (५७%) घरगुती नळजोड लोकांकडे असल्याचे पहायला मिळते.

महाराष्ट्रामधील निरनिराळ्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचा गोषवारा पुढीलप्रमाणे - हातपंप ८८%, विहिरी ७३%, नदी १३% आणि इतर स्त्रोत ९%.

राज्यामध्ये ३९% गावातून सार्वजनिक नळ तर ३२% गावांमधून घरगुती नळ जोड उपलब्ध असल्याचे दिसून येते.

आता आपण सर्वेक्षित गावांमध्ये एकूण किती हातपंप होते व त्यापैकी किती चालू स्थितीत होते याची आकडेवारी पाहू.

**तक्ता क्र.३९ : एकूण व चालू हातपंप**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| एकूण हातपंप | १५६ | १८५ | ३४१ |
| प्रत्येक गावात सरासरी हातपंप | ३.३ | ४.१ | ३.७ |
| चालू हातपंप | ११२ | १६६ | २७८ |
| **चालू असणाऱ्या हातपंपांची टक्केवारी** | ७१.८% | ८९.७% | ८१.५% |

गडचिरोली जिल्ह्यात ४७ गावांमधून एकूण १५६ हातपंप होते. म्हणजेच प्रत्येक गावातून सरासरी ३.३ एवढे हातपंप होते त्यापैकी ११२ हातपंप चालू होते. जिल्ह्याची चालू असणाऱ्या हातपंपांची टक्केवारी काढली असता सुमारे ७२% हातपंप चालू असल्याचे व उरलेले २८% हातपंप बंद असल्याचे दिसून येते. नादुरुस्त हातपंपांचे प्रमाण फारच आहे. या आकडेवारीवरून जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा निष्क्रिय असल्याचे स्पष्ट होते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ४५ गावांतून १८५ हातपंप होते. म्हणजेच प्रत्येक गावात सरासरी ४.१ हातपंप होते. जिल्ह्यामध्ये चालू असणाऱ्या हातपंपांची टक्केवारी ९०% एवढी येते. याचाच अर्थ जिल्ह्यामध्ये नादुरुस्त हातपंपांचे प्रमाण अतिशय कमी आहे (१०%) व सरकारी कर्मचारी त्याबाबत वेळीच कार्यवाही करत असावेत असा होतो.

महाराष्ट्र राज्यात सरासरी प्रत्येक गावामागे ३.७ हातपंप असल्याचे दिसून आले. एकूण हातपंपांपैकी सुमारे ८२% हातपंप चालू स्थितीत असल्याचे आकडेवारी दर्शवते.

तक्ता क्रमांक ४० मध्ये सर्वेक्षित गावांमध्ये असलेल्या नळपाणीपुरवठा योजना व योजना उभारणीस मदत करणाऱ्या संस्थांची माहिती दिली आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये केवळ ६ गावातून (१३%) नळपाणीपुरवठा योजना कार्यान्वित होत्या. उरलेली ८७% गावे मात्र त्यापासून वंचितच आहे.

या सहा गावातील नळ पाणीपुरवठा योजनांपैकी ३ योजनांना जिल्हा परिषदेकडून, २ योजनांना ग्रामपंचायतीकडून अर्थसहाय्य मिळाल्याचे लोकांनी सांगितले. एका गावातील योजना संपूर्णपणे लोकवर्गणीतून करण्यात आल्याची माहिती मिळाली.

कोल्हापूर जिल्ह्यातील ३५ गावातून (७८%) नळ पाणीपुरवठा योजनेतून लोकांना पिण्याचे पाणी मिळत असल्याचे पहायला मिळाले. जिल्ह्यातील २२% गावातून अशी योजना अजून व्हायची आहे.

३५ गावातील पाणीपुरवठा योजनांपैकी २३ (५१%) योजना जिल्हा परिषद, ६ योजना ग्रामपंचायत व ५ योजना राज्य सरकारच्या मदतीने पूर्ण केल्या गेल्या. एका गावच्या योजनेत खाजगी पाईप वापरून योजना पूर्ण करण्यात आली.

महाराष्ट्राची सरासरी बघता असे दिसते की ४५% गावातून लोकांना नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा होत आहे तर ५५% गावे अजूनही त्यापासून वंचित आहेत.

तक्ता क्र.४० : नळ पाणीपुरवठा योजना

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| **नळ पाणी पुरवठा योजना** | | | |
| असलेली गावे | ६ | ३५ | ४१ |
| % | १२.८% | ७७.८% | ४४.६% |
| नसलेली गावे | ४१ | १० | ५१ |
| % | ८७.२% | २२.२% | ५५.४% |
| **योजना उभारणीस मदत** | | | |
| राज्यसरकार | ० | ५ | ५ |
| % | ०% | ११.१% | ५.४% |
| जिल्हा परिषद | ३ | २३ | २६ |
| % | ६.४% | ५१.१% | २८.३% |
| ग्रामपंचायत | २ | ६ | ८ |
| % | ४.३% | १३.३% | ८.७% |
| लोकवर्गणी | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| खाजगी पाईप वापरून | ० | १ | १ |
| % | ०% | २.२% | १.१% |

पुढील तक्त्यामध्ये पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे अंतर किलोमीटरमध्ये दर्शविले आहे. यावरून पाणी आणण्यासाठी लोकांना विशेषकरून ग्रामीण भागातील महिलांना किती दूरपर्यंत जावे लागते याची कल्पना येईल.

तक्ता क्र.४१ : पाण्याच्या स्त्रोताचे गावापासूनचे अंतर (किमी)

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| गावामध्ये स्त्रोत | १२ | २१ | ३३ |
| ०.१-१ किमी | २० | १ | २१ |
| १-१.५ किमी | १० | १२ | २२ |
| १.५-२ किमी | १ | ७ | ८ |
| २ किमी पेक्षा अधिक | २ | ४ | ६ |
| **स्त्रोताचे सरासरी अंतर किमी** | ०.७८ | १.६९ | १.१५ |

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ४७ पैकी १२ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत गावातच होता. तर २० खेड्यातील महिलांना पाणी भरण्यासाठी १ कि.मी. दूरपर्यंत जावे लागत होते. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे सरासरी अंतर काढले असता ते सुमारे ८०० मीटर एवढे येते.

कोल्हापूर जिल्ह्यातील ४५ पैकी २१ गावांमध्ये गावाच्या आतच पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत असल्याचे दिसून आले. पाण्याच्या स्त्रोताचे सरासरी अंतर १.७ किलोमीटर एवढे आहे.

महाराष्ट्र राज्याची सरासरी बघितली असता गावापासून पाण्याच्या स्त्रोताचे अंतर जवळजवळ १.२ किलोमीटर दूर असल्याचे दिसते.

तक्ता क्र.४२ : दुर्भिक्ष असताना उन्हाळ्यात पाणी खरेदी

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| **पाणी खरेदी -** | | | |
| होय | ६ | २ | ८ |
| % | १२.८% | ४.५% | ८.७% |
| नाही | ४१ | ४३ | ८४ |
| % | ८७.२% | ९५.५% | ९१.३% |
| **खरेदीमूल्य रु. प्रति १०० लिटर** | ८.६० | ७.५० | ८.४० |

प्रश्नावलीमध्ये उन्हाळ्यामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष असताना गावकऱ्यांना पाणी खरेदी करावे लागते का असा प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आला होता. या माहितीची आकडेवारी वरील तक्त्यातून मांडण्यात आली आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ६ गावांमधून (१३%) पाण्याचे दुर्भिक्ष असताना पाणी खरेदी करावे लागत असल्याचे सांगण्यात आले. या पाणी खरेदीचे सरासरी मूल्य ८.६० रुपये प्रति १०० लिटर एवढे असल्याचे पाहणीत आढळले. उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असणारी ही गावे जंगलामध्ये दुर्गम भागात वसलेली होती.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये त्यामानाने पाणी टंचाई कमी असल्याचे दिसते. केवळ २ गावातील (५%) लोकांनी उन्हाळ्यामध्ये पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे सांगितले. या पाणी खरेदीसाठी लोकांना १०० लिटर पाण्यासाठी सरासरी ७.५० रुपये मोजावे लागत असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्रामध्ये उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष असताना ९% गावातून लोकांना पाणी विकत घ्यावे लागते. या पाणी खरेदीसाठी ८.४० रुपये प्रति १०० लिटर एवढा खर्च लोकांना सोसावा लागतो.

**तक्ता क्र.४३ : ग्रामपंचायतीला द्यावी लागणारी पाणीपट्टी**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| **पाणीपट्टी वसुली** - होय | ४७ | ४५ | ९२ |
| नाही | ० | ० | ० |
| **पाणीपट्टीची वार्षिक रक्कम रु.** | | | |
| रु. २५ पर्यंत | २७ | ६ | ३३ |
| २५-५० रुपये | १९ | ३ | २२ |
| ५१-७५ रुपये | ० | २१ | २१ |
| रु. ७५ पेक्षा अधिक | १ | १४ | १५ |
| **सरासरी वार्षिक पाणीपट्टी रु.** | **२२.४१** | **१२९.२०** | **७४.०५** |

दोन्ही जिल्ह्यातील सर्व गावांमधून ग्रामपंचायतीमार्फत पाणीपट्टीची वसुली होत असल्याचे दिसून आले. पाणीपट्टीचे दर २५ रुपयांपासून ते ३६० रुपयांपर्यंत असल्याचे आढळले. हा आकार हातपंप, सार्वजनिक नळ, घरगुती नळ याप्रमाणे बदलत असल्याची माहिती मिळाली.

वरील तक्त्यामध्ये गावामधून प्रत्येक घरातून सरासरी किती पाणीपट्टी ग्रामपंचायतीला मिळते याचे वर्गीकरण दाखवले आहे.

गडचिरोली जिल्ह्यामधून एका घरामागे सरासरी २२ रुपये वार्षिक पाणीपट्टी ग्रामपंचायतीला मिळते तर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये हीच पाणीपट्टी १२९ रुपये एवढी आहे. या जिल्ह्यामध्ये बहुतांश गावातून नळपाणीपुरवठा योजना कार्यान्वित असल्याने पाणीपट्टीचे दर पण जास्त आहेत.

महाराष्ट्रातील गावातून घरामागे सरासरी ७४ रुपये वार्षिक पाणीपट्टी ग्रामपंचायतीला मिळत असल्याचे दिसते.

**तक्ता क्र.४४ : पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधान**

| **जिल्हा** | **गडचिरोली** | **कोल्हापूर** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| समाधानी आहे | ५ | १२ | १७ |
| % | १०.६% | २६.७% | १८.५% |
| समाधानी नाही | ४२ | ३३ | ७५ |
| % | ८९.४% | ७३.३% | ८१.५% |

सर्वेक्षित गावातील लोकांना आपण पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधानी आहात का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाचे उत्तर वरील तक्त्यातून मांडण्यात आले आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील केवळ ५ गावांनी (११%) सध्याच्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधानी असल्याचे सांगितले आहे तर ८९% गावांनी असमाधान व्यक्त करून आणखीन सोयी सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधान व्यक्त करणाऱ्या गावांची संख्या तुलनेने अधिक आहे - १२ गावे (२७%) तरीदेखील ७३% गावातील लोकांनी असमाधान व्यक्त करताना आहे त्या सोयींमध्ये आणखीन सुधारणा अथवा नविन सोयींची मागणी केली आहे.

महाराष्ट्रातील १९% गावांनी सध्याच्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल समाधानी तर ८१% गावांनी असमाधानी असल्याचे सांगितले आहे.

**तक्ता क्र.४५ : गावातील अंतर्गत रस्त्याच्या बाजूची गटारे**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| गटारे - | | | |
| अजिबात नाहीत | ३३ | १८ | ५१ |
| % | ७०.२% | ४०% | ५५.४% |
| थोड्या प्रमाणात आहेत | ३ | १७ | २० |
| % | ६.४% | ३७.८% | २१.७% |
| संपूर्ण गावात आहेत | ६ | ७ | १३ |
| % | १२.८% | १५.६% | १४.१% |
| आहेत परंतु बुजलेली | ५ | ३ | ८ |
| % | १०.६% | ६.७% | ८.७% |

गावातील अंतर्गत रस्त्यांच्या बाजूला असलेल्या गटारांची आकडेवारी वरील तक्त्यामध्ये दर्शवली आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ३३ गावांमधून (७०%) गटारे अजिबात नाहीतच. ६ गावांमध्ये (१३%) अंतर्गत रस्त्याच्या बाजूच्या गटारांचे काम सर्व गावातून झाले आहे तर ३ गावात (६%) गटारे थोड्या प्रमाणात बांधण्यात आली आहेत. ५ गावातून (११%) गावच्या अंतर्गत रस्त्याच्या बाजूला गटारे असल्याचे परंतु ती बुजल्याचे सांगण्यात आले.

कोल्हापूर जिल्ह्यातील ४०% गावातून अंतर्गत रस्त्याच्या बाजूने गटारे अजिबातच नाहीत. ३८% गावातून थोड्या प्रमाणात तर केवळ १६% गावातून सर्व रस्त्यांच्या बाजूने आहेत. ७% गावातून गटारे बुजली असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्रासाठीची आकडेवारी पुढीलप्रमाणे - अंतर्गत रस्त्याच्या बाजूने गटारे अजिबात नसलेली गावे (५५%), थोड्या प्रमाणात गटारे असलेली गावे (२२%), संपूर्ण गावामध्ये गटारे असलेली गावे (१४%), गटारे बुजलेली गावे (९%).

तक्ता क्र. ४६ : घरातील सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| निचऱ्याची व्यवस्था नाही | ४१ | १८ | ५९ |
| % | ८७.२% | ४०% | ६४.१% |
| शोष खड्डे | ३ | १ | ४ |
| % | ६.४% | २.२% | ४.४% |
| गटारे | ० | १७ | १७ |
| % | ०% | ३७.८% | १८.५% |
| परसबागेत निचरा | ३ | ३ | ६ |
| % | ६.४% | ६.७% | ६.५% |
| बायोगॅस | ० | ६ | ६ |
| % | ०% | १३.३% | ६.५% |

गडचिरोली जिल्ह्यातील ४१ गावांमधून (८७%) घरातून निघणाऱ्या सांडपाण्याच्या निचऱ्याची कोणतीही व्यवस्था असल्याचे आढळून आले तर प्रत्येकी ३ गावांमधून (६%) शोष खड्डे व परसबागेत सांड्पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था केली असल्याचे पहायला मिळाले. घरातील सांडपाण्याचा निचरा गटारामध्ये होत असल्याचे एकाही गावातून दिसून आले नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात तुलनेने बरी व्यवस्था होती. १७ गावातून (३८%) सांडपाण्याचा निचरा गटारांमध्ये ६ गावातून (१३%) सांडपाणी बायोगॅस संयंत्रामध्ये तर ३ गावातून (७%) परसबागेमध्ये सोडले जात असल्याचे आढळले. या जिल्ह्यातील ४०% गावातून अजूनही सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही.

महाराष्ट्रामधील गावांची घराच्या सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था पुढीलप्रमाणे सांगता येईल - निचऱ्याची व्यवस्था नाही (६४%), गटारे (१९%), परसबागेत निचरा (७%), बायोगॅस संयंत्रात निचरा (७%), शोष खड्डे (४%).

तक्ता क्र.४७ : एकूण संडास व त्यांचा वापर

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| एकूण संडास | ९०५ | २२८० | ३१८५ |
| प्रत्येक गावामागे सरासरी संडास | १९ | ५१ | ३४ |
| वापरात असलेले संडास | ३२५ | २०७० | २३९५ |
| **वापरल्या जाणाऱ्या संडासांची टक्केवारी** | ३५.९% | ९०.८% | ७५.२% |
| संडास नसलेली गावे | २८ | ३ | ३१ |
| | ५९.६% | ६.७% | ३३.७% |
| १-५ संडास | ९ | १२ | २१ |
| | १९.१% | २६.७% | २२.८% |
| ६-१० संडास | ५ | ४ | ९ |
| | १०.६% | ८.९% | ९.८% |
| १० पेक्षा जास्त | ५ | २६ | ३१ |
| | १०.६% | ५७.८% | ३३.७% |
| **लोकसंख्या व संडास यांचे गुणोत्तर** | ७७ | ३८ | ४१ |

वरील तक्त्यामध्ये सर्वेक्षित गावांमधून संडास व त्याच्या वापराविषयी गोळा केलेली आकडेवारी मांडण्यात आली आहे. या आकडेवारीचे विश्लेषण करणे मोठे उद्‌बोधक ठरेल.

गडचिरोली जिल्ह्यातील २८ गावांमधून (६०%) संडास अजिबातच नव्हते. ९ गावांमध्ये (२०%) पाचपेक्षा कमी संडास होते तर १० पेक्षा जास्त संडास असलेली केवळ ५ गावे (११%) होती. सर्वेक्षित गावांमधील लोकसंख्या व एकूण संडास यांचे गुणोत्तर काढल्यास दर ७७ लोकांमागे एक संडास असे प्रमाण येते.

गडचिरोली जिल्ह्यात ४७ गावांमधून एकूण ९०५ संडास असल्याची माहिती मिळाली. म्हणजे प्रत्येक गावामध्ये सरासरी १९ संडास होते. एकूण संडासांपैकी केवळ ३२५ संडासच वापरात असल्याचे लोकांनी सांगितले. याचाच अर्थ एकूण संडासांपैकी केवळ ३६% संडासांचाच वापर केला जातो हे प्रमाण फारच कमी आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील केवळ ३ गावातून (७%) संडास नाहीत. १२ गावांमध्ये (२७%) पाचपेक्षा कमी संडास तर ५८% गावातून दहापेक्षा जास्त संडास असल्याचे पहायला मिळाले. सर्वेक्षित गावांमधील लोकसंख्या व एकूण संडास यांचे गुणोत्तर काढल्यास दर ३८ लोकांमागे एक संडास असे प्रमाण येते.

कोल्हापूर जिल्ह्यात ४५ गावांमधून एकूण २२८० संडास असल्याचे दिसले म्हणजेच प्रत्येक गावामध्ये सरासरी ५१ संडास होते. एकूण संडासांपैकी २०७० संडास वापरात असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. एकूण संडासांपैकी वापरल्या जाणाऱ्या संडासांची टक्केवारी काढली असता ९१% एवढी येते. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही खचितच चांगली बाब आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण जनतेने संडासांचा स्विकार केला असल्याचे दिसते तर गडचिरोलीमध्ये संडासांचा वापर मर्यादित प्रमाणातच होत आहे. तेथील लोक अजूनही शौचासाठी जंगलात जाणेच पसंत करतात. नियोजन कर्त्यांनी संडास बांधताना - लोकांना त्याची गरज वाटते का, लोक वापर करतील का, वापर करण्यामध्ये लोकांच्या काय अडचणी आहेत, वापर वाढवण्यासाठी लोकांच्या सूचना, आवडीनिवडी लक्षात घेऊन कशा प्रकारचे संडास बांधता येऊ शकतील यावर विचार केला पाहिजे. नाहीतर योजनेसाठी पैसे आहेत, वर्षभरात एवढे उद्दिष्ट गाठायचे आहे म्हणून संडास बांधून टाका. कागदोपत्री पैसे खर्च होतील, संडास बांधले जातील मात्र लोकांना त्याचा काहीच फायदा होणार नाही. तसेच सरकारचे पैसे (खरं सांगायचं तर लोकांच्याच खिशातून आलेले) वाया जातील.

महाराष्ट्राच्या आकडेवारीचा विचार केला असता असे दिसते की ३४% गावांमधून अजूनही संडास नाहीत. तर ३४% गावांमध्ये १० पेक्षा जास्त संडास आहेत. सरासरी ४१ लोकांमागे १ संडास असे प्रमाण आहे. प्रत्येक गावामधून सरासरी ३४ संडास आहेत आणि बांधलेल्या संडासांपैकी ७५% संडासच वापरले जातात.

पुढे दिलेल्या तक्ता क्रमांक ४८ मध्ये संडास बांधकामास अर्थसहाय्य कुठून मिळाले याची आकडेवारी दिली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील बहुतांश गावातून पंचायत समिती वा जिल्हा परिषदेच्या मदतीने संडास बांधण्यात आले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ६७% गावातील संडास पंचायत समिती/जिल्हा परिषदेच्या अर्थ सहाय्यातून, १३% गावातील संडास ग्रामपंचायत तसेच वैयक्तिकरित्या तर १८% गावातील संडास पूर्णपणे वैयक्तिकरित्या बांधण्यात आले आहेत.

### तक्ता क्र.४८ : संडास बांधकामास अर्थसहाय्य

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| पंचायत समिती/जिल्हा परिषद | १८ | ३० | ५८ |
| % | ३८.६% | ६६.७% | ६३.०% |
| ग्रामपंचायत + व्यक्ती | १ | ६ | ७ |
| % | २.१% | १३.३% | ७.६% |
| वैयक्तिक | ० | ८ | ८ |
| % | ०% | १७.८% | ८.७% |
| गैरलागू | २८ | १ | २९ |
| % | ५९.६% | २.२% | २०.६% |

### तक्ता क्र.४९ : मलनि:सारणाची सोय

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| माहिती उपलब्ध नाही | ३५ | २ | ३७ |
| % | ७४.५% | ४.४% | ४०.२% |
| सेप्टिक टँक | १२ | १५ | २७ |
| % | २५.५% | ३३.३% | २९.४% |
| बायोगॅस | ० | २८ | २८ |
| % | ०% | ६२.२% | ३०.४% |

प्रश्नावलीमध्ये संडासातून मल:निसारणाची सोय कशी केली जाते याबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. त्याची माहिती वरील तक्त्यात दिली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील गावातून असलेले सर्व संडास सेप्टिक टँकला जोडण्यात आले होते.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये विशेष म्हणजे २८ गावातून (६२%) बांधलेले संडास बायोगॅसला जोडण्यात आले होते. त्यापासून मिळणाऱ्या गॅसवर स्वयंपाक करत असल्याची माहिती लोकांनी दिली. १५ गावांमध्ये (३३%) संडास सेप्टिक टँकला जोडण्यात आले होते.

**तक्ता क्र.५० : पावसाळ्यातील मुख्य समस्या**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| अशुद्ध पिण्याचे पाणी | २१ | १३ | ३४ |
| % | ४४.७% | २८.९% | ३७% |
| डासांचा प्रादुर्भाव | ० | २२ | २२ |
| % | ०% | ४८.९% | २३.९% |
| संडास नसल्याने गैरसोय | १ | २१ | २२ |
| % | २.१% | ४६.७% | २३.९% |
| चिखलाने भरलेले रस्ते | ७ | २६ | ३३ |
| % | १४.९% | ५७.८% | ३५.९% |

खेडेगावातील लोकांना पावसाळ्यामध्ये कोणकोणत्या समस्या उद्‌भवतात त्यांची माहिती देण्यास सांगितले होते. त्याची आकडेवारी तक्ता क्र. ५० मध्ये दर्शवली आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये २१ गावांनी (४५%) पावसाळ्यात मिळणारे अशुद्ध पिण्याचे पाणी ही मुख्य समस्या असल्याचे सांगितले त्याचबरोबर ७ गावांनी (१५%) चिखलाने भरलेल्या रस्त्यांबद्दल तक्रार केली.

कोल्हापूर जिल्ह्यातील लोकांनी जास्त प्रमाणात पावसाळी समस्या मांडल्याचे दिसते. यामध्ये ५८% गावांनी चिखलाने भरलेले रस्ते, ४९% गावांनी पाणी साचल्याने होणारा डासांचा प्रादुर्भाव, २१ गावातील (४७%) लोकांनी संडास नसल्याने खासकरून महिलांची होणारी गैरसोय या मुख्य समस्या मांडल्या. १३ गावांनी (२९%) पावसाळ्यात मिळणाऱ्या अशुद्ध पिण्याच्या पाण्याबद्दल तक्रार केली.

महाराष्ट्राचा विचार केला तर पावसाळ्यातील मुख्य समस्या क्रमवार पुढीलप्रमाणे - अशुद्ध पिण्याचे पाणी (३७%), चिखलाने भरलेले रस्ते (३६%), डासांचा प्रादुर्भाव व संडास नसल्याने गैरसोय प्रत्येकी (२४%).

तक्ता क्र.५१ : पाण्याची समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| नविन विहिरी/हातपंप बसवणे | २१ | २ | २३ |
| % | ४४.७% | ४.४% | २५% |
| नळ पाणीपुरवठा योजना | १२ | १६ | २८ |
| % | २५.५% | ३५.६% | ३०.४% |
| पुरेसा निधी उपलब्ध करून देणे | १९ | ० | १९ |
| % | ४०.४% | ०% | २०.७% |
| साठवण टाकी बांधणे | ७ | ५ | १२ |
| % | १४.९% | ११.१% | १३% |
| विहिरीवर पंप बसवणे | ९ | ० | ९ |
| % | १९.२% | ०% | ९.८% |
| नदीतून पिण्यासाठी पाणी उचलणे | २ | ६ | ८ |
| % | ४.३% | १३.३% | ८.७% |
| सध्याच्या स्त्रोतांची दुरुस्ती | ३ | ३ | ६ |
| % | ६.४% | ६.७% | ६.५% |
| विंधन विहिरीवर हातपंप बसवणे | ३ | ० | ३ |
| % | ६.४% | ०% | ३.३% |
| पंपासाठी नियमित वीजपुरवठा | २ | १ | ३ |
| % | ४.३% | २.२% | ३.३% |
| पिण्याच्या पाण्यासाठी तळे/छोटे धरण बांधणे | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| उन्हाळ्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| सूचना न केलेली गावे | २ | १४ | १६ |
| % | ४.३% | ३१.१% | १७.४% |

सर्वेक्षित गावांपैकी बहुतांश गावे पिण्याच्या पाण्याच्या सोयीबद्दल असमाधानी असल्याचे आपण पूर्वीच पाहिले आहे. पाण्याच्या समस्येवर मात करण्यासाठी अनेक गावांनी उपाययोजना सुचवल्या आहेत. या उपाययोजना त्या त्या गावातील स्थानिक परिस्थितीशी निगडीत आहेत. या उपाययोजनांचे वर्गीकरण आपल्याला तक्ता क्र. ५१ मधून पहायला मिळते.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये नविन विहिरी खोदण्याची अथवा नविन हातपंप बसवण्याची मागणी २१ गावातून (४५%) करण्यात आली आहे. त्याचबरोबर १२ गावांमधून (२६%) नळ पाणीपुरवठा योजना गावासाठी करण्याची आग्रही मागणी गावकऱ्यांनी केली आहे. ही आकडेवारी आपल्याला गडचिरोली जिल्ह्यातील गावांमध्ये सध्या पिण्याच्या पाण्याच्या सोयी किती अपुऱ्या आहेत हे पुन:पुन्हा दर्शवते.

४०% गावांमधून पाणी पुरवठ्यासाठी ग्रामपंचायतीला पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा असे सांगण्यात आले. १९% गावातून विहिरीवर पंप बसवण्याची तर १५% गावातून पाण्याची साठवण करण्यासाठी टाकी बांधण्याचे लोकांनी सुचवले आहे. इतर उपाययोजना पुढीलप्रमाणे - नदीतून पाणी उचलणे (४%), सध्याच्या स्त्रोतांची दुरुस्ती (६%), पाणीपुरवठा सुरळीत रहाण्यासाठी नियमित वीजपुरवठा (४%). एका गावाने मात्र उन्हाळ्यामध्ये पाण्याचा टँकर पाठवावा अशी भाबडी पण विदारक सत्यावर प्रकाश टाकणारी मागणी केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १६ गावांनी (३६%) नळपाणी पुरवठा योजनेची मागणी केली आहे. १३% गावांनी नदीवरून पाणी उचलण्याचा तर ५ गावांनी (११%) साठवण टाकी बांधण्याचा विनंतीवजा आग्रह केला आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर लोकांनी सुचवलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे सांगता येतील - नळपाणीपुरवठा योजना (३०%), नविन विहिर/हातपंप बसवणे (२५%) पाणीपुरवठ्यासाठी निधी उपलब्ध करून देणे (२१%), पाण्यासाठी साठवण टाकी बांधणे (१३%).

आत्तापर्यंत आपण रस्ते व वाहतूक, दूरसंचार, विद्युत, पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या चारही क्षेत्रांमध्ये गडचिरोली व कोल्हापूर जिल्ह्यातील खेडेगावातून काय परिस्थिती आहे याचा आढावा घेतला. या सर्वेक्षणाच्या आकडेवारीतून असे दिसते की विदर्भातील आदिवासी बहुल असा गडचिरोली जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा यांच्यामध्ये जमीन अस्मानाचे अंतर आहे. एक जिल्हा अतिमागास तर दुसरा अतिप्रगत. या दोन्हींच्यामध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्हे आहेत. त्यामुळेच या दोहोंच्या आकडेवारीची सरासरी काढली असता महाराष्ट्राचे प्रातिनिधीक चित्र आपल्यापुढे उभे रहाते. राज्याच्या इतर जिल्ह्यातही अशा प्रकारचा अभ्यास केला तरी या चित्रामध्ये फारसा काही बदल होण्याचा संभव नाही.

## क्षेत्र सुधारणा प्राधान्यता

वर्ष २००१ मध्ये केलेल्या अभ्यासामुळे आपल्याला ग्रामीण भागात या चार क्षेत्रांमध्ये सद्यस्थिती काय आहे हे बघायला मिळते. याचबरोबर आपल्याला अजून कुठपर्यंत मजल गाठायची आहे याची पण दिशा मिळते.

आता आपण या चार क्षेत्रांपैकी सर्वात आधी कोणत्या क्षेत्रामध्ये सुधारणा व्हायला पाहिजेत याबद्दल गावकऱ्यांनी सांगितलेला प्राधान्यक्रम पाहू. अर्थात प्राधान्यक्रम ठरवताना लोकांनी त्यांच्यादृष्टीने विचार केला आहे, आपल्या गावात काय आहे काय नाही हे त्यांनी प्राधान्यक्रम ठरवताना लक्षात घेतले आहे. तरीपण सर्वसाधारणपणे लोकांना काय पाहिजे, प्रथम पाहिजे हे यातून स्पष्टपणे दिसते.

लोकांनी दिलेले चार प्राधान्यक्रम पुढील तक्त्यांमधून मांडले आहेत.

**तक्ता क्र.५२ : गावामधील चार क्षेत्रांच्या सुधारणेसाठीचा प्राधान्यक्रम**

**(अ) पहिली प्राधान्यता**

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | २८ | ३१ | ५९ |
| % | ५९.६% | ६८.९% | ६४.१% |
| वीजपुरवठा | ४ | २ | ६ |
| % | ८.५% | ४.४% | ६.५% |
| रस्ते सुधारणा | १४ | १२ | २६ |
| % | २९.८% | २६.७% | २८.३% |
| दूरध्वनी | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |

गडचिरोली जिल्ह्यातील २८ गावांनी (६०%) सर्वप्रथम पिण्याचे शुद्ध पाणी व सार्वजनिक स्वच्छता या गोष्टींना प्राधान्य मिळाले पाहिजे असे सांगितले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये तर ३१ गावामधल्या (६९%) लोकांनी पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता यांना अग्रक्रम दिला आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जरी ७८% गावांमधून नळ पाणीपुरवठा योजना असल्या तरी त्यांनी पिण्याच्या पाण्यालाच प्राधान्य द्यावे हे विशेषच म्हणावे लागेल.

महाराष्ट्रातदेखील ६४% गावांनी पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता या महत्त्वाच्या दोन गोष्टींनाच प्राधान्य दिल्याचे आकडेवारीवरून दिसते.

## (ब) दुसरी प्राधान्यता

| **जिल्हा** | **गडचिरोली** | **कोल्हापूर** | **एकूण** |
|---|---|---|---|
| **एकूण सर्वेक्षित गावे** | ४७ | ४५ | ९२ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | ११ | ४ | १५ |
| % | २३.४% | ८.९% | १६.३% |
| वीजपुरवठा | १५ | ९ | २४ |
| % | ३१.९% | २०% | २६.१% |
| रस्ते सुधारणा | २० | ३० | ५० |
| % | ४२.५% | ६६.७% | ५४.४% |
| दूरध्वनी | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| प्राधान्य दिलेले नाही | ० | २ | २ |
| % | ०% | ४.४% | २.२% |

गडचिरोली जिल्ह्यात दुसरी प्राधान्यता ठरवताना ४३% गावांनी रस्ते सुधारणा तर ३२% गावांनी वीजपुरवठ्यात सुधारणा असे मत व्यक्त केले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात ६७% गावांनी नि:संदिग्धपणे रस्ते सुधारणेला प्राधान्य दिले आहे.

महाराष्ट्रामध्ये गावांनी दुसरी प्राधान्यता (५४%) रस्ते सुधारणेलाच दिली आहे.

### (क) तिसरी प्राधान्यता

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | ७ | ६ | १३ |
| % | १४.९% | १३.३% | १४.१% |
| वीजपुरवठा | २५ | १७ | ४२ |
| % | ५३.२% | ३७.८% | ४५.७% |
| रस्ते सुधारणा | १२ | १ | १३ |
| % | २५.५% | २.२% | १४.१% |
| दूरध्वनी | ३ | १ | ४ |
| % | ६.४% | २.२% | ४.४% |
| प्राधान्य दिलेले नाही | ० | २० | २० |
| % | ०% | ४४.४% | २१.७% |

गडचिरोली जिल्ह्यातील गावांनी वीज पुरवठा सुधारणेला तिसरे प्राधान्य दिले आहे (५३%) तर कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पण वीज सुधारणेलाच तिसरे प्राधान्य असले तरी (३८%) गावांनीच त्याला पसंती दिली आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तरीदेखील सर्वात जास्त गावांनी (४६%) वीजपुरवठा सुधारणेलाच तिसरे प्राधान्य दिले आहे.

ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या जीवनामध्ये दूरध्वनी हा फारसा महत्त्वाचा वाटत नाही.

चौथी प्राधान्यता दूरध्वनी सेवेला मिळाली असल्याचे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते. यामध्ये गडचिरोली (८९%) तर कोल्हापूर (५३%) गावांनी चौथा क्रम दिला आहे.

महाराष्ट्रातदेखील ७२% गावांनी दूरध्वनी सेवेला चौथी प्राधान्यता दिली आहे.

### (ड) चौथी प्राधान्यता

| जिल्हा | गडचिरोली | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण सर्वेक्षित गावे | ४७ | ४५ | ९२ |
| पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| वीजपुरवठा | ३ | १ | ४ |
| % | ६.४% | २.२% | ४.४% |
| रस्ते सुधारणा | १ | ० | १ |
| % | २.१% | ०% | १.१% |
| दूरध्वनी | ४२ | २४ | ६६ |
| % | ८९.४% | ५३.३% | ७१.७% |
| प्राधान्य दिलेले नाही | ० | २० | २० |
| % | ०% | ४४.४% | २१.७% |

अशाप्रकारे सर्वेक्षित गावांच्या आकडेवारीवरून महाराष्ट्रासाठीचा चार क्षेत्रांचा प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे सांगता येईल -

१. **पिण्याचे पाणी व सार्वजनिक स्वच्छता**
२. **गावातील अंतर्गत व बाह्य रस्ते**
३. **वीज**
४. **दूरध्वनी**

❑❑❑

# ❖ समारोप ❖

आत्तापर्यंत आपण गडचिरोली व कोल्हापूर या दोन जिल्ह्यातील पायाभूत सोयीसुविधांचा अभ्यास केला, तुलनात्मक आकडेवारी बघितली. सर्वच क्षेत्रांमध्ये कोल्हापूर जिल्हा गडचिरोलीपेक्षा फारच पुढारलेला असल्याचे दिसते.

कोल्हापूर जिल्ह्यातील गावांमधील तसेच बाह्य रस्ते १०-१५ वर्षापूर्वीच डांबरी केलेले असून अधिक सुस्थितीत आहेत. गावातील लोकांना वाहतुकीसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत त्याचबरोबर प्रवासी तसेच मालवाहतुकीसाठी येणारा खर्च पण कमी आहे. गडचिरोलीमधील बहुतांश रस्ते अजूनही कच्चेच असून तेथे बारमाही वाहतूक फारच थोड्या गावातून चालते. अनेक गावे जंगलात असल्याने लोकांच्या समस्यांमध्ये भरच पडलेली आहे.

दूरसंचार क्षेत्रात गडचिरोली जिल्हा फारच मागे पडला आहे. सार्वजनिक तसेच खाजगी दूरध्वनींच्या उपलब्धतेचे प्रमाण अत्यल्प आहे. याउलट कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गावोगावी असलेल्या खासगी दूरध्वनींचे प्रमाण लक्षणीय आहे.

विद्युत क्षेत्राची आकडेवारी बघितली असता गडचिरोली जिल्ह्यात फारच थोड्या घरातून वीज पोहोचली असल्याचे दिसते. याउलट कोल्हापूर जिल्ह्यातून बव्हंशी घराघरातून वीज पोहोचली आहे. वीज उपलब्धतेच्या बाबतीतदेखील दोन्ही जिल्ह्यात फरक दिसून येतो. विद्युत मंडळातील भ्रष्टाचाराचे प्रमाणसुद्धा कोल्हापूरपेक्षा गडचिरोली जिल्ह्यात जास्त आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील गावागावातून नळ पाणी पुरवठा योजना असून तेथील जनतेला नळाद्वारे पाणीपुरवठा होत आहे. गडचिरोली जिल्ह्यात अशा पाणीपुरवठा योजनांची वानवाच दिसते. या जिल्ह्यामध्ये नादुरुस्त वा बंद असणाऱ्या हातपंपांची टक्केवारीदेखील जास्त आहे. यामुळेच या जिल्ह्यात उन्हाळ्यात पाणी खरेदी करावी लागणाऱ्या गावांची संख्या जास्त असावी. सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत कोल्हापूर जिल्ह्याने आघाडी घेतलेली दिसते. या जिल्ह्यातील बहुतांश गावातून अंतर्गत रस्त्याच्या बाजूने गटारे, घरातील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था तसेच संडास आढळतात. गडचिरोलीमधील गावे अशा सोयींपासून वंचितच आहेत.

सर्व क्षेत्रांमध्ये मागासलेला गडचिरोली जिल्हा स्वातंत्र्यानंतर ५५ वर्षांनंतरही अविकसित का राहिला आहे आणि कोल्हापूर जिल्ह्याने एवढी मजल कशी गाठली आहे याचा विचार आपण केला पाहिजे.

महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा हे प्रांत त्यामानाने मागासलेलेच राहिले आहेत. या भागातील विकासाचा अनुशेष भरून काढण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जात असला तरी अपेक्षित विकासाचे लक्ष्य गाठले जाऊ शकले नाही. अशा विदर्भातील एक जिल्हा गडचिरोली.

गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. तेथे शेती पारंपारिक पद्धतीने केली जाते. शेतीमधून मिळणारे उत्पन्न केवळ कुटुंबाचे पोट भरू शकते. येथे कोणतीही नगदी पिके घेतली जात नाहीत. शेतीमधले प्रगत तंत्रज्ञान अजून येथे पोहोचू शकलेले नाही. म्हणून येथील आदिवासी शेतीबरोबर जंगल उत्पादने, शिकार व मासेमारीवर अवलंबून असतो. जिल्ह्यामध्ये आदिवासींना रोजगार मिळू शकेल असे मोठे कारखाने नाहीत. गडचिरोलीमध्ये मोठ्या प्रमाणावर खनिज साठा असला तरी अजून त्याचे व्यावसायिक तत्त्वावर उत्खनन झालेले नाही.

गडचिरोली जिल्ह्याचा बराच मोठा भूभाग जंगलाने व्यापलेला आहे. लोकसंख्या छोट्या छोट्या पाड्यातून विखुरलेली आहे. साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा जिल्ह्यामध्ये काम करणे म्हणजे शिक्षा आहे असे शासकीय कर्मचाऱ्यांना वाटते त्यामुळे शासकीय योजनांचा अपेक्षित लाभ लोकांपर्यंत पोहोचू शकला नाही. जिल्ह्यातील राजकीय नेतृत्व, लोकप्रतिनिधीदेखील शासकीय सुविधांचा लाभ लोकांपर्यंत पोहोचवण्यास असमर्थ ठरले. आदिवासी हा मूलत:चा स्वभावाने लाजराबुजरा असल्याने स्वत:चे हक्क झगडून मिळवू शकला नाही. त्यातच या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन शेजारील आंध्रप्रदेशातून येऊन नक्षलवादाचा प्रसार जिल्ह्यात झाला. नक्षलवाद्यांनी विरोध केल्याने सुरू होऊ घातलेल्या पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाला खीळ बसली. अशाप्रकारे वरील सर्व कारणांचा एकत्रित परिपाक म्हणजे आज दिसणारा गडचिरोली जिल्हा.

कोल्हापूर हा प्रगत समजल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील अग्रणी जिल्हा. हा जिल्हा पूर्वीपासूनच आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये पुढारलेला राहिला आहे. या जिल्ह्याला शाहू महाराजांसारखे द्रष्टे नेतृत्व मिळाल्याने तेथील जनतेची झपाट्याने प्रगती झाली.

कोल्हापूर जिल्ह्यातील जमीन मोठ्या प्रमाणावर सिंचनाखाली असल्याने तसेच आधुनिक कृषीतंत्रज्ञानाचा वापर करून नगदी पिके घेतली जात असल्याने ग्रामीण भागात समृद्धता बघायला मिळते. येथे खेडेगावातूनही शिक्षणाचा प्रसार झाला आहे. जिल्ह्यामध्ये साखर कारखाने, दूध सोसायट्या सूत गिरणी व इतर उद्योग उभारले गेल्याने स्थानिक लोकांना रोजगार मिळू शकला. पुण्या-मुंबई सारख्या महानगरातून नोकरी व्यवसाय करून गावाकडे पैसा पाठविणाऱ्यांची संख्यादेखील मोठी आहे. जिल्ह्यामध्ये प्रबळ राजकीय नेतृत्व असल्याने गावागावातून विकास कामे पूर्ण झाल्याचे बघायला मिळते. जिल्ह्याच्या विकासामध्ये सहकारी चळवळीचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळेच ग्रामपातळीपर्यंत प्रगती होऊ शकली.

आपण केवळ पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाचा विचार के ला तरी त्यात आपल्याला शहरी-ग्रामीण तसेच ग्रामीण भागातही विभागा-विभागात, जिल्ह्या-जिल्ह्यात इतकेच नव्हे तर तालुका तसेच ग्राम पातळीवरही भेदाभेद असल्याचे, महद्अंतर असल्याचे दिसून येते. त्याची कारणे देखील अनेक आहेत. पण आता प्रश्न असा आहे की ही जी विकासाची दरी आहे ती कशी भरून काढायची? संतुलित विकास कसा साधायचा?

जागतिकीकरण, खाजगीकरण, खुली अर्थव्यवस्था या सर्व गोष्टींमुळे विकासाची सर्व समीकरणेच बदलू पहात आहेत. अशा परिस्थितीत मागास भागाचा विकास त्यातल्या त्यात अशा भागातील आदिवासी व अनुसूचित जातींचा विकास हे एक मोठे आव्हानच आहे.

मागास भागातील पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे येऊन काम करण्याची गरज आहे. अशा कामाचे नियोजन करताना तज्ज्ञांबरोबरच स्थानिक जनतेचा सल्ला लक्षात घेणे गरजेचे आहे. केंद्र व राज्य सरकारने अशा योजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. अशी कामे करताना लोकसहभागावर भर दिला पाहिजे. त्यामुळे कामाचा योग्य दर्जा राखला जाईलच त्याचबरोबर भ्रष्टाचारालाही आळा बसेल. पंचायत राज्य संस्था या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतील.

विकासाच्या गंगेचा लाभ मागास व वंचित समुहाला झाला तरच खरे 'सुराज्य' स्थापन होऊ शकेल.

❑❑❑

## लेखकांसाठी

'हाकारा' त्रैमासिक गेली २२ वर्षे अखंडपणे काढण्यात येत आहे. कै. प्रा. गं. बा. सरदार यांच्या प्रेरणेने सुरु झालेले 'हाकारा' हे मराठी भाषेतील आदिवासी व वंचित समुहांच्या प्रश्नांना वाहिलेले एकमेव नियतकालिक आहे.

हाकारामधून आदिवासी, वंचित समुहांचे जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव कला, विकासाचे प्रश्न तसेच आदिवासी व वंचित समुहांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, संशोधन, सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता, वगैरे सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिद्धी दिली जाईल. आदिवासी विचारवंत व साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे हेच आमचे ध्येय आहे. आपण आपले साहित्य अवश्य पाठवावे, त्याचे स्वागतच होईल.

**- संपादक**

## हाकारा त्रैमासिक आगामी विशेषांक

**खंड २३ : अंक ४ ● ऑक्टोबर-डिसेंबर २००२**

**पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प**
**पर्यायी उपाययोजना अभ्यास**

*****

**खंड २४ : अंक १,२ ● जानेवारी-जून २००३**

**पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प**
**राज्य अहवाल : मध्यप्रदेश**

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

आजीव सभासद ६०० रूपये (फक्त व्यक्तींसाठी)

'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)

'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80





Printed by Janana Prabodhini Mudran Vibhag, Pune-30.